
ONE VASAI
ABOUT
DOWNLOAD
CONTACT
ख्रिस्तायन
ई-अंक ख्रिसमस २५ डिसेंबर २०१४
संपादक: ख्रिस्तोफर रिबेलो

# ख्रिस्तायन

## नाताळ ई-अंक     वर्ष चौथे

## २५ डिसेंबर २०१४

**संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो**

**संपादन साहाय्य**

स्वप्निल रिबेलो

स्मिता ख्रिस्तोफर रिबेलो

अंक सजावट

**राजन जेरोम डिमेलो**

अंक मांडणी व तांत्रिक सहकार्य

**वनवसई टिम**

© सर्व हक्क लेखक व कवींच्या स्वाधीन

**संपर्क / अभिप्राय**

आमच्याशी संपर्क साधावयाचा असल्यास आणि आपल्याला काय आवडलं, काय नाही ते आम्हाला कळवण्यासाठी खालील पत्त्यांवर ई-मेल करा वा फोन करा

ख्रिस्तोफर रिबेलो :- chrisrebello25@gmail.com
(9819436078)

१वसई :- admin@onevasai.com

**आभार**

आमचे सर्व लेखक, कवी, हितचिंतक व प्रसिद्धी देणारे सर्व प्रसार माध्यमे यांचे “ ख्रिस्तायन” तर्फे मन:पूर्वक आभार व नाताळ आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

**या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही**

## अनुक्रमणिका :-

संपादकाच्या लेखणीतून...

**कथा / ललित लेख :-**

**सी.बी.(कैतान) दोडती – माझे तात्या** – श्रद्धांजली - ख्रिस्तोफर रिबेलो.

**घास मुखीचा** – कथा - ख्रि .सी. बी. दोडती

**डायहायड्रोन मोनोक्साईड** - विज्ञान कथा – जोसेफ तुस्कानो

**स्वच्छता ही आत्म्याची अवस्था असते** – ललित – सायमन मार्टिन

**मांडव** – कथा - बेर्नादित रुमाव

**शिक्षणातील विवेक** - ललित – फ्रान्सिस आल्मेडा

**इनवेस्टमेंट** – ललित - सायमन रॉड्रिग्ज

**माहितीचा अधिकार** - ललित - चिन्मय गवाणकर

**आस्वादकाच्या भूमिकेतून** - ललित - इग्नेशियस डायस

**तर्क, गृहीतके आणि मते** – ललित - सचिन मेंडिस

**जन्मदात्री** – ललित - अमर म्हात्रे

**वर्णुका** – ललित - फेलिक्स डिसोजा

**व्हेन ट्रेन लेफ्ट चर्चगेट** – कादंबरी कथानक - केविन आल्मेडा

**बालपणाच्या शीतल आठवणी** – ललित – डॅनिअल मस्करणीस

**धर्मगुरूपदाचं मार्केटिंग** – ललित - सॅबी परेरा

**बहर** – ललित - एमेल आल्मेडा

**दुनिया मे कितना गम है**- ललित - राकेश परेरा

**आंटी आंटी डांसलो, डांसलो** - ललित - सिमसन रॉड्रिग्ज

**आजच्या वसईची पाणी परिस्थिती** - ललित - सचिन मर्ती

**येशू येतोय...** - कथा - ख्रिस्तोफर रिबेलो.

**कविता / चारोळया :-**

| | | |
|---|---|---|
| **ख्रि .सी. बी. दोडती** | **सबिना फोस** | **एडवर्ड डिसोजा** |
| **एमेल आल्मेडा** | **राकेश परेरा** | **जॉन्सन लोपीस** |
| **सुनिल सोकाळकर** | | |

**कलाकुसर :-**

| | | |
|---|---|---|
| **ऑस्टिन डाबरे** | **समीर पावसकर** | **स्टिवन आल्मेडा** |
| **राजेश शिंदे** | **रॉजर रॉड्रिग्ज** | |

**संपादकाच्या लेखणीतून...**

प्रिय बंधू-भगिनींनो, प्रथम आपणा सर्वांना नाताळ सणाच्या अनेक अनेक हार्दिक शुभेच्छा.. पुन्हा एकदा "ख्रिस्तायन"चा हा अंक आपल्यापाशी घेवून येताना खूप आनंद झाला आहे. मराठी साहित्य क्षेत्रात नाताळ अंक रूपी चळवळीचा हा आमचा एक छोटासा प्रयत्न आहे. ह्या रोपट्याला अनेक फांद्या आणि फळे पुढे लगडतील अशी आशा बाळगतोय किंबहुना तसा एक दुर्दम्य विश्वास मनी नक्कीच आहे.

डिसेंबर महिना सुरू झाला की आपल्या चित्तवृती एकदम उल्हासून येतात. मनाला एक चैतन्य प्राप्त होते, मन हौशी होते. कारणही तसेच असते ना... गुलाबी थंडीचे दिवस आणि नाताळ सणाची चाहुल... नाताळ गीतांची धुन कानी पडायला सुरुवात होते... नवीन कपडे खरेदी... केक फराळाची तयारी.. रंगीबेरंगी दिव्यांची रोषणाई... सगळं कसं हवंहवंसं वाटणारं...

अशावेळी मला माझ्या लहानपणीचे दिवस आठवतात, नाताळचा सण जवळ आला की आमचा संपूर्ण गाव तयारीला लागायचा, महिनाभरआदी गावात मिटिंग्ज घेवून नाताळ गोठ्याच्या देखाव्याच्या तयारीसाठी प्लॅनिंग सुरू व्हायचे, सणाच्या दिवशी गावात घेण्यात येणाऱ्या खेळात यावर्षी नवीन काय घ्यायचे, सांस्कृतिक कार्यक्रमाची रूपरेषा कशी असावी याची चर्चा केली जायची. आठवडा अगोदर गोठ्याच्या आखणी-बांधणीला सुरुवात व्हायची. गावातील तरुण-तरुणी गोठ्याचा देखावा उभारत असताना आम्हा लहान मुलांना आपल्याला काय काम येईल ह्याचे औस्तुक्य लागलेले असायचे आणि मग आपणच अधिक किंवा महत्वाचे काम केलेय हे दुसऱ्या मुलांना पटवून देण्याची अहमहिका लागलेली असायची. पण आताच्या मोबाईल आणि इंटरनेटच्या जमान्यात मुले स्वत:हून सोडाच पण बोलावले तरी येत नाही. पण तरीही त्याने नाताळ सणाचा आनंद, हौस आणि मजा काही कमी होत नाही.. प्रत्येक जन आपआपल्या परीने नाताळ सणाची मजा लुटतोच..

आम्हीही ह्याच आनंदात हौसेने मजा लुटण्यासाठी गेली चार वर्षे "ख्रिस्तायन" ऑनलाइन नाताळ अंकाद्वारे सामील होत आहोत. पुर्णपणे नाताळ सणानिमित्ताने प्रकाशित होणारा "ख्रिस्तायन" हा पहिला प्रिंट व एकमेव ऑनलाइन नाताळ अंक आहे.

वसई परिसरातील नव लेखक-कवींना आणि चित्रकारांना आपल्या साहित्य कृतीद्वारे आणि कलेद्वारे लोकांसमोर आणण्यासाठी एक चांगला "प्लॅटफॉर्म" म्हणून हा अंक आहे आणि असणार आहे, पण त्याच बरोबर प्रथितयश लेखक-कवींना सुद्धा आम्ही या चळवळीत सामावून घेतले आहे.. दिवंगत साहित्यिक सी. बी. दोडती, कवी सायमन मार्टिन, विज्ञानलेखक जोसेफ तुस्कानो ललित लेखिका बेर्नादित रुमाव आणि कवियत्री सबीना फोस हे दिग्गज आमच्या या चळवळीत सहभागी झाले आहेत. आमचे मित्र सायमन रॉड्रिग्ज ह्यांनी लागोपाठ चौथ्या वर्षी आमची बोलीभाषा "कादोडी" भाषेतील लेखासह आपला सहभाग दर्शविला आहे.

आपण हा अंक वाचल्यानंतर इतरांनाही कळवा.. आणि आपल्या सूचना आणि अभिप्रायांची देखील आम्ही वाट पाहत आहोत..

आपणा सर्वांना नाताळ सणाच्या आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...

## सी.बी.(कैतान) दोडती – माझे तात्या

ख्रिस्तवासी सी.बी.(कैतान) दोडती माझे मामाकडील चुलत आजोबा, आम्ही सगळे त्यांना तात्या म्हणायचो. त्यांच्या "सावट" या कादंबरीला १९७६-७७ चा महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता, असा पुरस्कार मिळवणारे ते पहिले वसईकर आहेत. सहकारी क्षेत्रातील लफडी आणि खाबुगिरी त्यांनी ह्याच क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या जीवनपटाद्वारे मराठी वाचकांसमोर आणली होती.

तात्यांचा माझ्यावर भारी जीव, कदाचित माझ्या जन्मानंतर त्यांना हा पुरस्कार मिळाला त्यामुळे ते मला 'लकी मॅस्कॉट" मानत असावेत. मी मामाकडे गेलो की त्यांच्याच घरी पडलेला असे. सकाळी उठलो की प्रथम तात्याकडे जायचे, कारण तात्या कामावर जायच्या अगोदर त्यांच्या पुस्तकांच्या कपाटाची किल्ली माझ्याकडे देवून जायचे मग पूर्ण दिवस मी त्यांच्या त्या अभ्यासिकेत अनेक पुस्तकांचा फडशा पाडत असे. इथे मला एक विशेष गोष्ट नमूद करावीशी वाटते ती म्हणजे त्यांनी त्यांच्या मुलाकडे, प्रसादमामाकडे कधी त्यांच्या त्या कपाटाची किल्ली दिली नव्हती, ते स्वत: सोडले तर त्यावेळी त्या कपाटाचा ताबा फक्त माझ्याकडेच असे. वयाच्या ९व्या वर्षापासून पु.ल. देशपांडे, वि.वा. शिरवाडकर, वि.स. खांडेकर ह्या मराठी साहित्य जगतातील दिग्गजांची पुस्तके केवळ तात्यांमुळे वाचण्याचे भाग्य मला लाभले.

आज अग्रणी मासिक असलेल्या "सुवार्ता"च्या उमेदीच्या काळातील जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. ख्रि. बिशप आब्रिओ ह्यांच्या प्रेरणेने आणि नंतर त्यांच्या जोडीने सुवार्ता मासिकासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले होते. आपली रेल्वेची नोकरी सांभाळत १९५६ पासून त्यांच्या शेवटच्या दिवसांपर्यंत जवळजवळ ४० वर्षे त्यांनी मराठी साहित्याची सेवा इमानेइतबारे केली. 'जनपरिवार', 'निरोप्या' अश्या वेगवेगळ्या नियतकालिकातून त्यांच्या कथा, कविता सतत प्रसिध्द होत असत.

काळजाला सलणारे आणि मन व्यथित करणारे जे होते त्यांना शब्दरूप ल्यायला लावून तात्यांनी पहिला वहिला कवितासंग्रह "कंटक किरीट" १९७१ मध्ये प्रकाशित केला, ह्या कवितासंग्रहास ख्यातनाम कवी मंगेश पाडगावकर यांची प्रस्तावना लाभली होती, १९७५ साली वर उल्लेखलेली "सावट" कादंबरी वाचकांसमोर आली, राज्य पुरस्कारप्राप्त या कादंबरीस कै. जयवंत दळवी यांची प्रस्तावना लाभली होती, सहकार क्षेत्राचा प्रस्थापितांनी कसा वणवा लावला होता त्याचे रेखाटन त्यांच्या या कादंबरीतून दिसून येते. "वनसोयरे" या कादंबरीतून आदिवासी स्त्रियांच्या प्रश्नाला त्यांनी वाचा फोडली. एका दलित तरुणाची व्यथा त्यांनी "सरावन" या कादंबरीद्वारे मांडली. आपल्याच सामवेदी ख्रिस्ती समाजाच्या आगळयावेगळया संस्कृतीचे पडद्याआडचे दर्शन "अनोळखी माती" या कादंबरीद्वारे त्यांनी मराठी जगताला घडविले. "संस्कार" कादंबरीद्वारे गरिबीतही चांगले संस्कार कसे फळास येतात याचे वर्णन त्यांनी केले आहे. अतृप्त आत्म्याच्या शापामुळे पडीक राहिलेली जमीन लागवडीखाली आणण्याचा उद्देश देणारी "शापित संपदा" ही त्यांची ओळीने सहावी कादंबरी. आपल्यातील कविला जिवंत ठेवून वेगवेगळ्या नियतकालिकात प्रसिध्द झालेल्या अनेक उत्कृष्ट कविता "श्वास निश्वास" ह्या कविता संग्रहाद्वारे त्यांनी लोकांसमोर आणल्या.

“केळफुलं” या कथासंग्रहाद्वारे आपल्याच गावच्या, वसईच्या मातीतील कथा त्यांनी समोर आणताना विविध समाजजीवनाचे दर्शन घडविले आहे. मुलांसाठीही त्यांनी लेखन केले आहे.

३० मार्च २००५ रोजी त्यांना देवाघरचे बोलावणे आले. त्यांची सहा पुस्तके आणि आत्मचरित्र त्यांच्या अकाली जाण्याने अजूनही अप्रकाशित आहेत. तात्यांना भावपूर्ण श्रद्धांजली..

**सी. बी. दोडती यांची साहित्यसंपदा..**

कंटक किरीट – कविता संग्रह – १९७१

सावट – कादंबरी – १९७५

सरावन – कादंबरी – १९७९

वनसोयरे – कादंबरी – १९८०

अनोळखी माती – कादंबरी – १९८०

संस्कार – कादंबरी – १९८५

केळफुलं – कथासंग्रह – १९८६

श्वास निश्वास - कविता संग्रह – १९९५

शापित संपदा – कादंबरी – १९९८

गट्टी फू – बालगीत संग्रह

कोल्हा बनला देव – बालकथा संग्रह

**अप्रकाशित साहित्य –**

बोरे शबरीची – ललित लेखसंग्रह

रानठिणगी – कथासंग्रह

दौड एका कोळीयाची – चरित्रात्मक कादंबरी

सांध्यदीप – कविता संग्रह

या गोष्टी ऐकू या - बालकथा संग्रह

डोहात पडला चांदोबा - बालगीत संग्रह

आत्मचरित्र

**- ख्रिस्तोफर रिबेलो.**

# घास मुखीचा

पावलू स्टेशनवर उतरला त्यावेळी रात्र बरीच झाली होती. त्याच्या सोबतीचे नेहमीचे पासवाले आज त्याच्या बरोबर नव्हते. घरी येण्याची त्याची नित्याची वेळही टळून गेली होती. उशीर झाल्यामुळे त्याला घरी जाण्याची घाई झाली होती. परंतु मनात घराची ओढ असून देखील त्याची पावले स्टेशनावरच रेंगाळत होती. सर्व प्रवासी निघून गेले तरी तो खांदयावर कावड घेऊन सर्वांच्या मागून मुंगीच्या पावलाने चालत होता. फलाट संपून तो जेव्हा रस्त्यावर आला आणि रस्त्याच्या कडेला एका अंधाऱ्या जागेकडे वळला आणि आपल्या खांद्यावरची कावड ख्रिस्ताने क्रूस जसा खाली ठेवावा त्याप्रमाणे उतरवून त्यातील कोमेजलेला माल त्याने गटारात भरभरा फेकून दिला. आपल्यावर कुणाचे लक्ष नाही ह्याची खात्री पटवून कावडरूपी आपला सदाचाच क्रुस खांदयावर घेवून तो घराची वाट चालू लागला.

जस जसे त्याचे घर जवळ येत होते तस तशी त्याची पावले जड होत होती. त्याच्या पोटात कालवा कालव होत होती. डोक्यात असंख्य विचारांचा काटेरी मुकुट सारखा बोचत होता. सुन्न करीत होता. आज आपण घरी जाऊच नये असे त्याला वाटू लागले. परंतु मुलाबाळांची जबरदस्त ओढ त्याला घराकडेच चुंबकासारखी खेचून घेत होती. आणि त्याचे विचार जरा भन्नाट असले तरी पावले घराकडेच पडत होती. पावलूच्या आजच्या ह्या अवस्थेला कारणही जबरदस्त होते. देवाने आज त्याचा पिच्छा पुरवला होता. जणू आज दैव त्याची सत्वपरिक्षाच पाहणार होते. त्याला कोणत्यातरी मरणाला सामोरे जायचे होते.

पावलू हा मंगल भाटचा गरीब पासवाला. सकाळी उठायचा आणि सर्व वाडीवाडीत पायपीट करीत भटकायचा. भाजीपाला, केळफुलं, तेरी, टाकळा आदी सटरफटर माल जमा करायचा. सुमारे बाराच्या सुमारास घराकडे वळायचा. घरी आपली पत्नी रोजी हिने केलेले शिळेपाके पोटात कसेतरी रिचवायचे आणि मुंबईला धाव मारायची. मुंबईच्या तापलेल्या डांबरी रस्त्यावरून गल्ली बोळातून अनवाणी फिरताना त्याच्या डोळयांतून अक्षरश: रक्ताचे अश्रू ठिपकायचे. परंतु चार कोवळी मुले आणि एक साध्वी पत्नी ही ठेव घरी असल्यामुळे पावलूला आपले ठिपकणारे रक्ताचे अश्रू मोत्याचे वाटत आणि दिवसभर भटकून ह्या मालात चार पैसे मिळाले तर त्याला ती सोडत लागल्या सारखी वाटे. मग तो संध्याकाळी घरी येताना मुलांना खाऊ घेई, जेवणासाठी पाव घेई, स्टेशनावरून जेवणासाठी मिळालीच तर मासळी घेई आणि दुसऱ्या दिवसासाठी किलोभर तांदूळ घेई. रात्री तो येईस्तोवर त्याची मुलं जागत. बायको दारात वाट पहात उभी असे. गोठयातली म्हैस देखील पावलूच्या आवाजाची वाट पाहत कान टवकरून उभी असे. तो आला, त्याने तिच्यापुढे पेंढा टाकला की ती खाण्यास सुरुवात करी. असा हा पावलूचा गोड संसार चालला होता. श्रीमंतीपेक्षा प्राप्त सुखात त्याला अधिक समाधान होते. तो कधी कधी रोजीला सांगे, 'ऐकीला गा? जेजूसच्या खांदयोर खुरूस अन माआ खांदयोर कावड, जेजुसने लोकांना तारला मे बायका पोरांना, मेलो तरी यी कावड हाय तोव तुमी घाबरो नाका.'

पावलूचा आपल्या मुलाबाळांना सदा देत असलेला हा धीर आज मात्र सुटला होता. आज त्याचा माल दिवसभर फिरवून कुणी घेतला नव्हता. खिशात दमडा शिल्लक नव्हता. सकाळीच त्याने सुद्धा उधारीने घरात सकाळच्या जेवणापुरते वाण्याकडून सामान आणले होते. संध्याकाळसाठी वांदेच होते. माल विकला न

गेल्याने त्याच्या पोटातदेखील पाण्याच्या थेंबाव्यतिरिक्त काही गेले नाही. त्याची आतडी भुकेने चरफडत होती. परंतू पावलूला त्याची चिंता नव्हती त्याला मुलाबाळांच्या रात्रीच्या जेवणाचा प्रश्न भेडसावत होता. परत आणलेला माल गटारात फेकल्यानंतर तो जसजसा घराकडे जाऊ लागला तसतसा अजगराने माणूस गिळावा तसा त्याचा सुटलेला धीर त्याला गिळकृत करू लागला. आपली मुलं खाऊची वाट पाहत असतील आज त्याची निराशा होणार. रोजी चुलीवर आंधण ठेवून तांदळाची अपेक्षा करीत असेल. तिला आज निराश करावे लागणार आहे. आज फक्त पेज पिऊन झोपावे लागणार. सबंध दिवसाचा उपाशी असलेला पावलू ह्या विचारातच घराकडे आला बाण लागलेल्या घायाळ पक्ष्यासारखा.

पावलूला लांबून पाहताच मुलांनी 'बाबा आलो! बाबा आलो!' असा एकच गिल्ला केला. आणि ती त्याच्यापुढे धावली. रोजी सुद्धा उत्साहीत होऊन उतावळेपणाने पावलूच्या कावडीकडे झेपावली. पण पावलूच्या उतरलेल्या चेहऱ्याकडे पहाताच उकळी फुटलेले दूध एकदम थंड होऊन गेली. कावडीत काहीच आणलेले नाही. हे तिच्या लक्षात येताच ती खालच्या आवाजात म्हणाली,

'आज कंईच हाडला नायता ! '

'आज माल गटारात टाकोन आलो. खपलोस नाय. जाताना कुणा तोंड बगिलता कुणाला मायीत. आज पोरांना ......'

पावलूच्या तोंडातून काळजी दर्शक शब्द बाहेर पडण्यापूर्वीच रोजीने त्याला सावरीत उत्तर दिले,

‘आजची वेळ भागेदे ओडे साऊळ होते, त्या मे धान केले. उद्याआ उद्या बगो.’ पावलूला बरे वाटले. संसारी बायको असली की घरातली अब्रू अशी सांभाळते. रोजीच्या सांगण्याने त्याचा छातीवरचा मणाचा दगड दूर झाल्यासारखे त्याला वाटले. त्याने त्याच आनंदात आपल्या लहानग्याला उचलले आणि छातीशी आवळून त्याचे पटापटा मुके घेतले. ते मुल त्याच्या खिशाला झोबताच पावलू त्याला सांगू लागला ,

'आज तुला कय हाडला नाय. उद्या गाठयायी पुडी हाडणे हा s s'

पण पावलूची ही तडजोड त्या मुलाला पसंत नव्हती. त्याने आपले नेहमीचे शस्त्र उपसले. ते भोकांड पसरून मोठ मोठ्याने रडू लागले. येवढ्या अपरात्री गावभर मुलाच्या रडण्याने बोंबाबोंब नको म्हणून वेळ न दवडता रोजीने घरात जाऊन सर्वांना जेवण वाढले. जेवायला फक्त चिंचेचे कालवण आणि भाजलेला बोंबील होता. पावलूला सडकून भूक लागली होती. तो त्या रडणाऱ्या मुलाला घेऊनच ताटावर बसला आणि त्यालाच प्रथम घास भरवू लागला. परंतु ते मुल महा हट्टी. ते पायाची आदळ आपट करू लागले. तेव्हा मात्र रोजीचा संताप अनावर झाला आणि तिने रागाच्या भरात एक रपाटा त्याच्या पाठीत घातला. अगोदरच चिडलेले ते पोर मोठयाने ओरडू लागले. त्याचा आवाज इतका मोठयाने होता की शेजारच्या दुमी काकूने ऐकला आणि तिने रोजीला हाक मारून विचारले,

'रोजे ! पोर कं रडते? पासवालो अजून आलो नाय गा ? '

'पासवालो आले गे ! पण यी मेला तहाच सदानकदा रडतास '

रोजीने दूमी काकूला समजावले खरे पण त्यामुळे पावलूची जिज्ञासा जागृत झाली. इतकी रात्र होऊन देखील ही म्हातारी दूमी काकू इकडे कान द्यावयाला जागी कशी ? असा प्रश्न त्याला पडला. त्याने रोजीला विचारले, ‘दूमी काकू अजून निजलीस नाय गा ? जिगाला बगे तिगाळा जागीच हाय ती ?’

त्यावर कपाळाला आठ्या पाडून रोजी म्हणाली, ‘का करदे बिचारी नशिबात आलेले भोग भोगीते. दोन दी झाले त्या दोघांच्या पोटात पेज पण गेली नाय .....’

रोजीच्या ह्या सांगण्याने पावलू चक्रावून गेला. ओठात घालण्यासाठी उचलेला घास थाळीत त्याने तसाच परत ठेवला. त्याच्या पुढे क्षणार्धात दुमिकाकुचा जीवनपट सरकू लागला. ....

दूमी काकू ही त्याच्या शेजारची म्हातारी. तारुण्यात तिने खूप काबाडकष्ट करून इस्टेट कमावली. घरदार बांधले. दोन तीन मुलांना शिकवलं. लग्न केली.. लग्ना नंतर एक दुबईला गेला. एक मुंबईला राहू लागला आणि एक शेतीवाडी सांभाळू लागला. ह्या मुलांच्या विभागणीत त्यांनी आईवडिलांची सुद्धा वाटणी केली. आई एकाकडे तर वडील दुसऱ्याकडे. आयुष्यभर ज्याने एकत्र संसार केला त्यांना असे एकमेकापासून तोडल्यामुळे हृदय एकीकडे आणि शरीर दुसरीकडे अशी दारुण अवस्था त्यांची झाली. मुलांच्या नि सुनांच्या भांडणात ह्या म्हाताऱ्यांची अक्षरश: कुचंबणा होऊ लागली. अखेर ह्या दोघांनी पिकल्या पानांनी एकत्र राहण्याचा निर्णय घेतला आणि मुलांच्या नि सुनांच्या मायावी पाशांतून मुक्त होऊन उरलेले आयुष्य एकमेकांच्या सानिध्यात घालविण्याचे ठरविले, परंतु त्यांच्या जीवाकाळजाच्या मुलांना हा त्यांचा इभ्रतीचा प्रश्न वाटू लागला. आईवडील असे स्वतंत्र राहिले तर समाज आपल्याला फाडून खाईल म्हणून त्यांनी ‘तुम्ही आमच्याकडे रहा‘ असे आईवडिलांना समजाविले परंतु दोघांना एकत्र ठेवण्यात कोणताच मुलगा तयार नसल्याने आणि म्हातारपणी देखील त्यांना राबवून त्यांचा कस घेण्यासाठी मतलबी सुनाना सासू सासरे हवे असल्यामुळे त्या दोघांनी आपल्या आयुष्याच्या अखेरच्या समयी एकत्र राहणेच पसंत केले. ह्या त्यांच्या निर्णयामुळे मुलांनी आता त्यांच्यावर पूर्ण दुर्लक्ष केले आणि जमेल तेव्हा त्यांना जो तो त्यांच्या पोटापाण्यासाठी थोडे थोडके देऊ लागले. ह्यामुळे ह्या पिकल्या पानांना आयुष्यच्या उतरत्या वेळी भूक मारून दिवस काढावे लागले. पावलूच्या डोळ्यासमोर दुमी काकूचा वरील जीवनपट सरकून जाताच त्याच्या हळव्या मनाला वेदना झाल्या. आज दोन दिवस झाले त्यांच्या पोटात कणेरी पेज गेली नाही हे आपल्या पत्नीचे शब्द ऐकून तर त्याचे हृदय भाल्याने टोचावे तसे टोचून निघाले. ह्या दूमी काकूने एकदा आपल्या मुलांना सुद्धा घासभर घातले होते हे त्याला आठवले. तो पाटावरून तसाच उठला. थाळी उचलून हातात घेतली आणि रोजीला म्हणाला,

‘ऐकीला गा ! तू या पोरांना खावड मे पाच मिंनटात आलो.’

‘पण मोडकोभर जेवून तरी जा ना ?’ रोजी भुकेल्या नवऱ्याला समजावीत म्हणाली.

‘नाय आज मा पोट खुप भरले. मुंबईला मे खाऊन झाले तुमी जेवा.’

अस म्हणून त्याने ती थाळी उचलली आणि तो दूमी काकूच्या घराची पायरी चढू लागला.....

**--- ख्रि. सी.बी. दोडती, निर्मळ**

# डायहायड्रोन मोनोक्साईड

"डायहायड्रोन मोनोक्साईड ! एक जबरदस्त जादुई रसायन. ज्याच्याविना माणूस जगू शकत नाही. अन्, अतिप्रमाणात ते माणसाला जगणे अशक्य करून टाकते. "

मुले विचारात पडली : " हा काय विचित्र प्रकार आहे?"  मी पुढे स्पष्टीकरण करीत म्हटले, "हायड्रोजनचे दोन परमाणू आणि ऑक्सीजनचा एक; याने ते संयुग तयार होते. $H_2O$"

"हे तर पाणी !" मुलांनी एक सुरात गिल्ला केला.

"पानी रे पानी....." मी गातच म्हटले.

"तेरा रंग कैसा?" मुलांनी एकसुरात, उत्स्फूर्तपणे साथ दिली.

मग, मी त्यांना दोन पानीकथा ऐकविल्या.

*******

**इ. स. २०३०**

सगळेच डॉक्टर्स खोऱ्याने पैसे कमावतात, असा आपला समज असतो. त्या अपवादामध्ये डॉ. धन्वतरीची गणना होत होती. पण दिवसभर दवाखान्यात बसून माशा मारत बसणे त्यांच्या स्वभावात नव्हते. तेव्हा, त्यांनी आपल्या आवडीचा वाचनाचा छंद जोपासायला सुरुवात केली. नुकताच, त्यांनी 'रीडर्स डायजेस्ट'चा फेब्रुवारी २००८ चा जुना अंक वाचून काढला होता. त्यातील एका लेखात 'भारत ही जागतिक मधुमेहाची राजधानी' बनली असून तेथे अडीच ते चार कोटी मधुमेही आहेत व इ.स. २०३० सालापर्यंत ही संख्या दुप्पट होईल. मधुमेह इथे साथीसारखा पसरतोय, हे सर्वेक्षणातून आढळले होते. जगातल्या प्रत्येक चार मधुमेही रुग्णामागे एक भारतीय इतके हे प्रमाण प्रचंड होते.

डॉ. धन्वतरी काहीसे अस्वस्थ झाले. विचार करता करता त्यांना डुलकी लागली. हळूहळू इ. स. २०३० साल त्यांच्या पुढयात साकारले. सर्वत्र मधुमेही वाढले होते. या व्याधीवर रामबाण उपाय सापडला नव्हता. रुग्ण चंगळवादाला इतके चटावले होते की पथ्यपाणी, व्यायाम इ. करायला राजी नव्हते. डॉक्टर मंडळीची चलती झाली होती.

त्यातच डॉ. धन्वतरीचा तो क्रांतिकारक शोध खूपच गाजला होता. त्यांनी स्वत:ची चार-पाच पॅथॉलॉजी केंद्रे उघडली होती. ते रूग्णाला तपासत नव्हते की औषध देत नव्हते. फक्त पॅथॉलॉजी, प्रयोगशाळांतून दाखला घेऊन आलेल्या रुग्णांचे मूत्र गोळा करीत होते. वास्तविक, ती लघवी ते विकत घेऊन साठवित होते. लघवीत साखर जितकी जास्त, तितक्या प्रमाणात जास्त पैसे त्या रूग्णाला डॉक्टरकडून मिळत.

गोळा केलेले मूत्र एकत्रित करून लगोलग विविध हॉटेल्स, उपहारगृहात रवाना होई. हलवायांच्या दुकानातील माणसे घेऊन जात. कारण पाण्याची वानवा होती. तेव्हा चहा करण्यासाठी हे मूत्र वापरले जाई. साखर सोडता बाकीची नकोशी द्रव्ये सोप्या रसायनिक प्रक्रियेमुळे काढली जायची. त्यामुळे चहासाठी त्यात साखर घालावी लागत नसे. या जैविक साखरेपासुन मिठाईदेखील स्वादिष्ट बने. मुत्रामध्ये आरोग्यदायी गुण असल्याचा आयुर्वेदातील उल्लेख होताच ! त्यामुळे लोकं हा जैविक चहा नि मिठाई पसंत करू लागले होते.

डॉक्टरांच्या या शोधाचा खूप बोलबोला झाला. त्यांनी या शोधाचे एकस्व (पेटंट) मिळविले होते. त्यांची भरभराट होत गेली होती..... ते कृतज्ञ भावनेने उठले व खुर्चीमागे टांगलेल्या व भलामोठा हार घातलेल्या माजी पंतप्रधान, स्व. मोरारजी देसाई यांच्या तसबीरीला हात जोडू लागले.

पण, ती तसबीर तिथे  नव्हती, हे लक्षात आल्यावर ते भानावर आले..... ते काहीही असो, पण एका विज्ञानकथा जन्म लेखकाचा झाला होता, हे ही नसे थोडके !

**इ. स. २०७०**

फसलात ना?   पंच्याऐंशी वर्षाचा म्हातारा वाटलो ना, तुम्हाला? पण, मी नुकतीच पन्नाशी ओलांडलीय. माझी मूत्रपिंड निकामी होत आहेत कारण प्यायला पाणीच नाही.

खर तर, मी इथला सगळ्यात वयोवृद्ध अन आता फारसा जगेनशी आशा नाही.

बालपणीच रम्य जग किती निराळं होत ! झाडाझुडुपानी व्यापलेले बागबगीचे, घराभोवतालचा हिरवागार परिसर, तासातासाला पाण्याने मनसोक्त आंघोळ. आता तर, तेल लावून शरीरावरची कातडी पुसावी लागते. पाण्याचं दुर्भिक्ष्य, दुसरं काय?

बायकांचा केशसंभार म्हणजे त्यांचं सौंदर्यच. आता, बायका केशवपन करताहेत, डोकं धुण्याइतकं सुद्धा पाणी नाहीए, इथे. पाईपाच्या पाण्याने कार धुवायचो. ती गोष्ट मुलांना, आता अविश्वनीय वाटते.

तशा, तेव्हा घोषणा वाचल्या होत्या, ऐकल्या होत्या. भिंतीवर, होर्डिंगवर टी. व्ही.-रेडिओवर : 'पाणी वाचवा, पाणी जिरवा'

आता विहिरी–नाले सुकलेत, धरणाचे पाणी गढूळलंय, जमिनीच्या पोटात निर्वात गोळे जमलेत.

उदयोगधंदे पाण्याविना ठप्प झालेत. बेकारी शिगेला पोहचलीय. समुद्राचं खारं पाणी शुद्ध करणाऱ्या संयत्रात मोजका रोजगार उपलब्ध तेवढाच अन 'पिण्यासाठी पाणी' हाच पगाराचा एक हिस्सा.

रस्त्यातून चोरूनमारून छोट्यामोठ्या भांडयात पाणी नेणारे हल्लेखोरांचे, लुटारूंचे बळी होताहेत. खाद्यान तर सगळंच कृत्रिम स्वरूपाचं.

तेव्हा, दिवसाला आठ ग्लास पाणी प्यायचो आता, अर्ध्या ग्लासचा कोटा जेमतेम मिळतो.

कपडे एकदा वापरुन फेकून देतो, सर्वत्र कचऱ्याची घाण वाढवितो. पाण्याविणा मलविसर्जन होत नाही अन सेप्टिक टाक्या तुबंत आहेत.

पाण्याविणा चिपाड झालेल्या देहावरचे सुरकुतलेले, विद्रूप चेहरे ओझोनच्या फाटल्या थरातून बरसणाऱ्या अतिनील किरणांनी भाजून निघताहेत.

सुकलेल्या शरीराचे विशीतले तरुण चाळीशीचे वाटताहेत. पाणी नाही, झाडाझुडूपाविना ऑक्सीजन वायुचा लोप. माणसाची बौद्धिक क्षमता ऱ्हास होतेय. नवीन शोध लागणं मुश्किल होऊन बसलंय अन पाण्याची निर्मिती करणं, कुणाला जमलंय?

त्रुटीग्रस्त शुक्राणूद्वारे निपज वाढतेय – अपंग, मतिमंद नि निरोगी अपत्यांची.

प्रती प्रौढापाठी मिळणाऱ्या मर्यादित १३७ घनमीटर हवेसाठी कर भरावा लागतोय सरकारला, तेही 'व्हेंटिलेटेड झोन' समोर रांगा लावून.

सौरउर्जेवर भकभकणारी यांत्रिके

फुप्फुसे पुरवितात हवा, तीही खालच्या दर्जाची

पण काय करणार? जगायचं तर आहे ! आयुष्यच कमी होत होत पस्तीस वर्षाचे होणाराय.

तसे राखले आहेत, काही देशात नदीकाठी 'हरीत विभाग' शस्त्रधारी सैनिकांच्या पहाऱ्यात.

अतिदुर्मिळ पाणी, सोन्या–हिऱ्यापेक्षा महागलंय.

पाऊस तर गायबच झालाय. पडलाच तर तो आम्लपर्जन्याच्या रुपात. विसाव्या शतकानी, औद्योगिक प्रदूषणाने आणि अणूचाचण्यांनी निसर्गाला बदलून टाकलंय आरपार.

घसा फोडून, सांगायचे काही सुजाण लोक त्यावेळी. माणसाला जागे करण्याचा प्रयत्नात. पण, झोपेचे सोंग घेतले तेव्हा अन दुर्दैवी जिणे नशिबी आता.

मुलाला सांगितल्या, एकदा बालपणीच्या आठवणी. हिरवी शेते, रंगीबेरंगी फुले, मस्त धुवांधार पाऊस, धो धो वाहणारे नदीनाले, त्यात पोहणारे मासे इ. इ.

"बाबा, कुठे आहे ते पाणी?" त्याचा निष्पाप चेहरा विचारतो. तेव्हा, माझ्या घशात हुंदका दाटून येतो.

किती अपराधी आहोत आम्ही ! केलं सोयिस्कर दुर्लक्ष धोक्यांच्या सुचंनांकडे अन वाट लावली नव्या पिढ्यांची. त्यांनी आता जबरदस्त किमत मोजायची.

पृथ्वीचा नाश अटळ आहे. तरी अजूनही वेळ आहे – समजून घेण्याची पृथ्वीमातेला वाचविण्याची !

(डॉ. ए. पी. जे. कलाम यांच्या चिंतनावर आधारित) "रंग रक्ताचा" या विज्ञान कथासंग्रहातून साभार.

**■ जोसेफ तुस्कानो, गास**

# स्वच्छता ही आत्म्याची अवस्था असते

*नाताळ जवळ येत चाललाय. येशूचा जन्म जेथे होतो तेथे सारं काही नवीन होऊन जाते. नाताळची तयारी फार आधीपासून करावी लागते. सर्व गाठी सोडून टाकायच्या, झालं गेलं विसरून जायचं, कुणाबद्दल राग नाही, द्वेष नाही, कुणाकडून कसली अपेक्षा नाही. आपल्या घराचे दरवाजे सताड उघडे ठेवायचे. आपल्या मनाचं अंगण साफ करायचं आणि सगळी शक्ती एकत्र करून बाळजन्माची वाट पहात थांबायचं. मग आपल्याही कानात बाळजन्माची गाणी रुंजी घालू लागतात. मग आपल्यालाही दूर आभाळात तारा दिसू लागतो. त्याच ताऱ्याचा माग काढत प्रवास करायचा. जेथे कोठे आपण पोहचू तेच आपलं बेथलहेम असते.*

*एकदा येशू भेटला की आपला नव्याने जन्म होतो आणि नव्याने जन्मल्याशिवाय स्वर्गराज्यात प्रवेश नसतो. फारच सोपी गोष्ट असते. आपल्या घराचं अंगण आणि आपल्या मनाचं अंगण साफ करायचं.*

*सध्या आपण स्वच्छ भारत हा मंत्र घेऊन उभे आहोत तेच ध्येय साध्य करण्यासाठी हा नाताळ आपल्याला प्रेरणा देईल...*

गाडीने वसई स्टेशन सोडलं. नेहमीसारखीच गाडी खच्चून भरलेली होती. नायगाव यायच्या अगोदर एका सुशिक्षीत दिसणाऱ्या गृहस्थाने तब्बल चार-पाच किलो वजनाचा पुडका दरवाज्याजवळ सरकवला आणि नायगावच्या खाडीत टाकण्याची विनंती केली. त्या गृहस्थाला सांगितलं, हे समुद्रात टाकता येणार नाही. त्यामुळेच समुद्राचं प्रदुषण वाढत चाललय. तुझ्यासारखाच विचार करणाऱ्या असंख्य देशवासियांनी समुद्र आणि नद्यांची पार वाताहात करून टाकली आहे. गृहस्थ ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. भांडण विकोपाला जाऊ लागलं...

रोजच अशा घटना घडत असतात. सांडपाणी आम्ही रस्त्यावर सोडतो, घरातला कचरा रस्त्यावर टाकतो, फळं खाऊन साली, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या इतस्तस्त: टाकतो. प्रत्येक वेळेला आमच्यावर सावली धरणाऱ्या, आम्हाला प्राणवायू पुरवणाऱ्या पृथ्वीच्या अंगावर आम्ही कृतघ्नतेनं थुंकत असतो. ह्यात पाप आहे हे आम्हाला कधी जाणवतच नाही. चोरी, लबाडी, खुन, ममारामारीप्रमाणेच पृथ्वी विद्रुप करणे हे महापाप आहे. निसर्गाची योग्य काळजी न घेता केलेला विनाश हे पाप आमच्या गळ्याभोवती फास आवळत आहे. आध्यात्मिक कोणाला म्हणायचं, जे अती संवेदनशील असतात त्यांना. ज्यांच्या मनात करूणा आणि कृतज्ञता असते तेच देवाच्या जवळ असतात. आपण देवधर्मापासून कोसो योजने दूर गेलेलो आहोत कारण आपली प्रत्येक कृती निसर्गाच्या र्हासाला कारणीभुत ठरत आहे.

आपल्या नद्या पार विद्रुप झाल्या आहेत. आपले डोंगर पार म्हातारे झाले आहेत आणि आपला परिसर दरिद्री झालाय. आता वेळ आलीय स्वत:मध्ये परिवर्तन करण्याची, आपण बदल घडवू शकतो. त्यासाठी जनचळवळीची गरज आहे. आपण ठरवलं तर भारताचा कायापालट करू शकतो.

पंतप्रधानानी योग्य वेळी योग्य हाक दिली आहे. ती हाक ऐकणे म्हणजे देशाप्रती कृतज्ञ असणे आहे. त्यासाठी ह्या देंशातील सर्वच धार्मिक पुढाऱ्यानी जनतेला उद्युक्त करावे. हे देवाचचं कार्य आहे हा विचार आपल्या डो्क्यात शिरत नाही तोपर्यंत आपली घाण साफ होणार नाही. आपला संपूर्ण देशच मुळी एक भव्य

कचराकुंडी झालीय, ह्याचं मुळ खरं म्हणजे आपल्या मानसिकतेत आहे. आपल्या घराचा आपण उकीरडा करत नाही कारण आपलं घर आपलं आहे ही भावना त्यामागे असते. स्वातंत्र्यानंतर हा देश माझा आहे, तो मला प्राणप्रिय आहे ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजवायला आपण अपयशी ठरलेलो आहोत. भारतासारखी निसर्गातली विविधता अन्यत्र अभावानेच आढळते पण आमचं जल, जंगल आणि जमीन आम्ही पार विटाळून टाकली आहे. ज्यांना स्वच्छता आवडते तेच यशस्वी होतात. आपल्याकडे आर्थिक सुबत्ता आली पण जगण्यात गुणात्मक फरक पडला नाही. आपण सर्वत्र घाण करायची आणि सरकारने स्वच्छता करायची असं कितीकाळ चालणार? आपल्यातल्या प्रत्येकाने किमान पथ्ये पाळली तर आपल्या परीसराचा स्वर्ग होईल.

अस्वच्छता हे गरीबीचं बायप्रॉडक्ट आहे असं म्हटलं जाते पण ते सर्वच ठिकाणी खरं ठरत नाही. आंत्यतिक गरीबीत राहणारे आदिवासी बांधव स्वच्छतेचे भोक्ते असतात. त्यांच्या झोपड्या सुंदर, नेटक्या आणि स्वच्छ असतात. त्या स्वच्छ असतात म्हणूनच तेथे थांबावसं वाटते.

उशिराने का होईना आपण हा विषय घेतलेलाच आहे तर पुढच्या चार दोन वर्षांनतर आपलाही देश फ्रान्स, जर्मनी, जपानसारखा स्वच्छ, चकचकीत होईल. त्यासाठी शालेय शिक्षणातच या विषयावर भर द्यायला हवा पण केवळ शिक्षणामुळे बदल होईल ह्या भ्रमात देखील राहू नये कारण मुळात आपण भारतीय फारच बनावट आहोत. सर्वप्रकारच्या भ्रष्टाचाराचं आपल्याला प्रचंड आकर्षण आहे आपण सर्वत्र घाण करीत सुटलेलो आहोत हा देखील आपल्या जगण्यातला टोकाचा भ्रष्टाचारच आहे. तो कसा निपटून काढायचा? कारण आपल्याला लगेच श्रीमंत व्हायचं असते. आपल्याला कमी कष्टात भरपूर मोबदला हवा असतो. आपल्याला रांगेशिवाय तिकीट हवं असते. आपल्याला अभ्यासाशिवाय यश हवं असते. अशाप्रकारचा विचार करणारी माणसंच पृथ्वीचं वस्त्र फेडत असतात.

स्वच्छतेचा संबंध आपण धर्माशी जोडला नाही. स्वच्छ आचार, स्वच्छ विचार ही आध्यात्मिक गोष्ट आहे. पण नेमकं त्याकडे दुर्लक्ष झालं. पाप झाकण्यासाठी आणि भितीपासून संरक्षण व्हावं एवढ्यापुरताच धर्माचा आसरा घेतला जात असल्यामुळे धर्म आणि स्वच्छता ह्यांचा सांधा तुटला.

**स्वच्छता कशासाठी हवी आहे?**

स्वच्छता ही आत्म्याची अवस्था असते. जेव्हा अंतर्बाह्य परिवर्तन होते तेव्हाच आपलं जग बदलते.

स्वच्छता हे समृद्धीचं लक्षण आहे. स्वच्छतेने मनाचं उन्नयन होते. प्रसन्न वातावरणात अधिक आनंद मिळतो आणि देश प्रगतीपथावर जातो. जपानचं उदाहरण त्यासाठी जगभर घेतलं जाते. इस्त्रायलचा प्रत्येक नागरीक जसा सैनिक असतो तसाच जपानचा प्रत्येक नागरिक हा स्वच्छता कर्मचारी असतो. तेथल्या नागरिकांला संपूर्ण देशच आपलं घर वाटते. देशावर तेथला नागरीक जीवापाड प्रेम करतो. टोकीयो हे राजधानीचं शहर पूर्णपणे गजबजलेलं असते पण ते इतकं पॉश व चकचकीत आहे की आपण कल्पनाही करू शकत नाही. न्यूयॉर्क, पॅरीस, लंडन, म्युनिक ही शहरं त्यापुढे फीकी पडतात. आपण जसे देशाच्या अंतर्भागात जातो म्हणजे नागासाकी, क्युटो, ओसाका, तर तेथे तशीच डोळ्यात भरणारी सुंदरता दिसते अर्थात जगातला हा बलाढ्य आणि श्रीमंत देश आहे हे खरं असलं तरीही संपूर्ण देश म्हणजे एक अप्रतीम सजावट केलेलं विशाल नंदनवन करण्यात जपानी माणसं कमालीची यशस्वी झाली आहेत. नागासाकीला असताना जपानमधली मैत्रीण मिहारूला विचारलं, हे तुम्हाला कसं शक्य झालं? मिहारू वर्षाला एकदा भारतात येत असतात. त्यांचा मुंबईला मुक्काम असतो; त्या मला म्हणाल्या, भारतात मी मागील पंधरा वर्षांपासून येत आहे. तुमचा देश तुमचा आहे ही भावनाच भारतींयामध्ये आढळत नाही. केवळ गरीबच नाहीतर सर्व थरातील मंडळी प्रचंड बेजबाबदारपणे वागतात. मी त्यांना विचारलं आमचा देश कधी स्वच्छ होऊ शकेल काय? त्यावर त्या म्हणाल्या, तुमच्या देशातल्या प्रत्येक माणसाने तसं ठरवणं आवश्यक आहे. केवळ काही माणसं स्वच्छताप्रिय असून चालत नाही. आमच्या देशात स्वच्छतेचं महत्व

कुणालाही सांगावं लागत नाही. अस्वच्छता हा विचारच आम्हाला सहन होत नाही. जपानमध्ये देश बलाढ्य करण्यासाठी स्पर्धा लागलेली असते पण त्याआधी आमची स्पर्धा स्वच्छतेसाठी असते. खोटं बोलणे हे आमच्या येथे महापाप समजलं जाते. मी विचार केला खोटं बोलणे हा आमचा राष्ट्रीय धर्म आहे. आम्ही खोटारडे आहोत म्हणूनच आमचं मन, शरीर आणि परिसर अस्वच्छ आहे. जपानमध्ये देखील भ्रष्टाचार आहे पण भारतात जसे सर्वत्र रस्ते उखडलेले असतात तसे तेथे चुकूनही कुठे आढळणार नाही. बुलेट ट्रेन हे जपानचं वैशिष्ट्य मानलं जाते ही ट्रेन लेट झाल्याचं आजपर्यंत उदाहरण नाही. ह्याच महत्त्वाचं कारण येथील जनतेच्या विचार करण्याच्या पद्धतीत आहे. देशाला प्रथम प्राधान्य जेथे असते ते देश फारच पुढे निघून गेले आहेत.

मिहारू मला म्हणाल्या, भारताला जेव्हा स्वच्छतेचं महत्व कळेल तेव्हा भारत महासत्ता झालेली असेल. भारत जगातला सुरक्षित देश असेल आणि जागतिक स्पर्धेमध्ये मग तो खेळ असो, उद्योग असो की तंत्रज्ञान असो सर्वत्र भारत अव्वल स्थानावर असेल. कॉमनवेल्थ गेममध्ये आपल्या येथे खेळापेक्षा कलमाडी गँगच्या भ्रष्टाचाराचीच चर्चा अधिक झाली. ज्या देशात सर्वत्र कलमाडीच असतात त्या देशाचा उकीरडा नाही होणार तर काय होईल?

म्हणून रस्ते झाडून देश स्वच्छ होणार नाही. खरोखर देश सुंदर, नीटनेटका करायचा असेल तर देशाला झालेल्या जखमावर आधी उपचार केले पाहिजेत. चेहऱ्यावर रंगरंगोटी करून काही काळ सजता येईल पण आतमध्ये जे सडलेलं आहे त्यावरही उपाय झाला पाहिजे. वसईच्या रस्त्यावरून जात असताना एक कोटीचा बंगला बांधलेला एक गृहस्थ त्याच्या आवारातला कचरा रस्त्यावरच्या गटारात टाकत होता. मी थांबून हिमंत करून त्याला एवढचं म्हणालो की तुझ्या आवारातच कचऱ्याची व्यवस्था करता येणार नाही काय? गटार हे सांडपाणी वाहून नेण्यासाठी असते. प्रत्येकजण गटारात घरातला कचरा टाकू लागला तर कसं व्हायचं? पण असं किती लोकांना आपण सांगणार? आम्ही घाण करायची आणि शासनाने स्वच्छता करायची असं चालत नाही. किमान आपला परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे असं प्रत्येकाने ठरवलं तर चित्र वेगळं दिसेल.

देश भ्रष्टाचाराने पोखरलाय म्हणून आपण कायम  ठणठणाट करीत असतो. ते खरंही आहे पण याच भ्रष्टाचारामध्ये आपणही गुंतलेलो असतो. बदल होऊ शकतो पण त्याची सुरूवात स्वत:पासून व्हायला हवी. कुणीतरी मसिहा येऊन आम्हाला प्रकाश दाखवील ह्या मानसिकतेतून आम्ही बाहेर यायलाच तयार नाही.

दुष्काळग्रस्तासाठी जमवलेली मदत घरी पळवणारे भ्रष्ट नेते, परिक्षेत अफरातफर करणारे शिक्षणसम्राट, रस्त्यावर एकटी गाठून बाईवर बलात्कार करणारे नराधम आणि रस्त्यावर कचरा टाकणारी जनता ह्या सगळ्यांची जातकुळी एकच असते त्यामध्ये कधीही डावं उजवं करायची गरज नाही.

गरज आहे ती व्यक्तीगत परिवर्तनाची. देवापुढे आमच्या रांगा वाढत चालल्या आहेत पण आम्ही आध्यात्मिक होऊ शकलो नाही. हा भीतीग्रस्त समाज जेव्हा स्वत:च्या पलीकडे जाऊन इतरांचा, आपल्या देशाचा विचार करू लागेल तेव्हा देश खुप सुंदर होईल. भारताएवढा सुंदर देश जगात अन्यत्र कुठेही नाही हे आपल्याला पुन्हा पुन्हा स्वत:लाच सांगायची आवश्यकता आहे.

**■ सायमन मार्टिन**

# शिक्षणातील विवेक

शिक्षणाचा सर्व खटाटोप माणसाला विवेकी बनवण्याचा असला पाहिजे. त्याऐवजी अंधश्रद्धा व अविवेकाला खतपाणी घालण्याचे काम आजचे शिक्षण करीत आहे. बालपणापासूनच लिखित शब्दांची घोकंपट्टी करणे आणि त्याची परीक्षा घेणे यापलीकडे आपले शिक्षण जायला तयार नाही. केवळ शालेय शिक्षणातच नव्हे तर महाविद्यालयातून दिले जाणारे तथाकथित उच्च शिक्षण काही वेगळे नाही. तेथेही गाईड्सची व कोचिंग क्लासची रेलचेल आढळते. शिक्षण स्वतःला शिकायला शिकवणारे असले पाहिजे.

लहान मुले अतिशय निरीक्षणक्षम असतात. कधीकधी आपण त्यांच्या निरीक्षणक्षमतेने अचंबित होतो. घरातल्या प्रत्येक माणसाचे कपडे, पादत्राणे व इतर साहित्य त्यांना अचूक माहीत असते. एखादी वस्तू कोठे ठेवली ते मोठी माणसे विसरतात पण लहान मुले अचूक शोधून देतात. याचे कारण ती आपली ज्ञानेंद्रिये पूर्णांशाने वापरतात. ही त्यांची सवय आपण लिखित शब्दांच्या घोकंपट्टीमध्ये हळूहळू नाहीशी करतो. निसर्गदत्त निरीक्षण क्षमता हा ख-या शिक्षणाचा पाया आहे हे आपण विसरतो.  त्यामुळे शिक्षणाने नवी माणसे घडण्या ऐवजी बिघडलेली माणसे तयार होतात.

मानवात असलेले पूर्णत्व बाहेर काढणे म्हणजे शिक्षण असे विवेकानंदानी म्हटले आहे. आपण बाहेरून माहितीचा डोंगर त्याच्या डोक्यात कोंबत असतो. त्यालाच आपण ज्ञान म्हणतो. खरे ज्ञान हे सामर्थ्य असते. (Knowledge is power) पण नुसती माहिती म्हणजे विचाराला विश्रांती व कृतीला शांती. ज्ञान म्हणजे काय? माहिती आणि कौशल्य एकत्र असणे म्हणजे ज्ञान. तुम्हाला रोगांची माहिती असेल. त्याच्यावर कोणती औषधे द्यावी याचीही माहिती असेल पण त्या महितीचा वापर करण्याचे कौशल्य डॉक्टरांकडे असते. म्हणून डॉक्टरांकडे रोगी बरे करण्याचे सामर्थ्य असते ते तुमच्याकडे नसते. शिक्षणाने नुसती माहिती देऊन काहीच उपयोग नाही. मुलांना ज्ञानी बनवले पाहिजे.

ज्ञानी बनवण्याची प्रक्रिया सूक्ष्म निरीक्षणातून सुरू होते. आपण जे पाहतो, ऐकतो, हुंगतो, चाखतो व स्पर्शतो त्याचा निरीक्षणाशी संबंध आहे. ही ज्ञानेंद्रिये अधिकाधिक एकाग्रपणे वापरायला शिकवले पाहिजे. मुलांना ही सर्व ज्ञानेंद्रिये वापरता येतील अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. पुस्तकात असलेली माहिती ही ज्ञानेंद्रिये वापरून मिळवायची असते हे त्याला स्वानुभवाने कळले पाहिजे. केवळ लेक्चर देऊन हा अनुभव कधीच देता येणार नाही.

शाळेतील प्रत्येक पायरीवर मुलाना काहीतरी कौशल्य प्राप्त झाले पाहिजे. त्यामुळे त्याचे शिकणे अर्थपूर्ण होईल. आजकालचे शिक्षण मुलांना निरुपयोगी बनवते. शेतक-याचा मुलगा शिकला तर शेतात काम करण्या पासून दूर राहतो. त्याला शेतीत सुधारणा करून अधिक चांगली शेती करण्यास सक्षम बनवणारे शिक्षण मिळाले पाहिजे. त्याअभावी शेतक-याची शेती आहे तेथेच राहाते आणि त्याची  मुले बेकार राहतात.

ज्याच्याकडे कौशल्य आहे त्याला नोकरीच्या शोधात फिरावे लागत नाही. नोकरी त्याला शोधत येते. आपण इलेक्ट्रीशन शोधतो, प्लंबर शोधतो, डॉक्टर शोधतो. ज्याच्याकडे कौशल्य आहे त्याची आपल्याला गरज लागते. ज्याच्याकडे फक्त घोकंपट्टी केलेली माहिती आहे त्याला कोण शोधणार? आपली शिक्षण पद्धती अशी निरुपयोगी माणसे घडवते.

यावर उपाय म्हणजे अगदी शालेयस्तरावर मुलांना स्वयंपूर्ण बनवण्यावर भर दिला पाहिजे. स्वतःसाठी उपयोगी कौशल्ये जसे, स्वच्छता, आरोग्य, स्वयंपाक इत्यादी मुलाना अवगत व्हायला पाहिजेत. स्वतः अभ्यास कसा करावा याचे कौशल्य त्यांना मिळायला हवे. विवेकाने आपले प्रश्न आपणच कसे सोडवू शकतो हे त्याला कळायला हवे तरच आपली शिक्षण व्यवस्था सार्थ होईल व आपल्या समाजाला समर्थ बनविल.

**■ फ्रान्सिस आल्मेडा सर, निर्मळ**

# इनवेस्टमेंट

अही गोष्ट बघण्यात आले की थॉडॅफार पैशॅ जमलॅ गा आपला कुपारी लोक फ्युचर प्लॅनिंगश्या दृष्टीनॅ इनवेस्टमेंट कऱ्या बगित्यात. अहीस एक इनवेस्टमेंट मंजॅ जमिनी मिनॅ...

**एक अनुभव...**

“शिमा, वाड्याला एक प्लॉट हाय रॅ... हॉना हाय हॉना, एक वहारात डबल, हा कडॅ” माव दोन नंबरवालॉ मित्र काल बाजारात भेटलॉतॉ, तॉ बोयलॉ...

“का बॉलाता, कॉड्याला रॅ?” मॅ जरा विसार करीत विसारला…

“१ करोड, तू २५ टाक, बी मा दरी ३ पार्टनर हात, डन करतॅ” त्यानॅ माई हा हाय आहा समजॉन हांगीला..

“ओडी माय ऐपत नाय रॅ, १० पोत हायदॅ तॅ बोल” माव विसार अजून हॉत नॉतॉ मनून मॅ बॉयलो...

“मा दरी बी एक प्लॉट हाय, वानगावला.. स्टेशनपासून १० मिनिटोर.. ५० पोत.. मा दरी बी पार्टनर हात.. अडे तॅ पुढश्या वहारा एमआयडीसी येतॅ.. मग ५० शॅ ५ करोड लगेस”

मायॅ डॉळॅ गरगरलॅ.. २-३ वहारान १० शॅ १० पट...

“ठीक हाय, डन.. पन माला कागदपत्रे आन जमीन दावड” मा मनासॉ संशय बोयलॉ...

मग २-३ दिहानंतर आमॅ ४-५ पार्टनर त्या टोयोटा फ्रंटरनर मिनॅ (या लोकायी ओळख मंजॅ फ्रंटरनर गाडी आन व्हाइट शर्ट, ता पन फूल स्लीव) एका हीनवारॅ गेले.. त्यानॅ खुटे गाडलेलॉ एक प्लॉट दावडलॉ, मॅपवरनॅ आमाला समजाविला.. आन ७/१२ उतारॉ दावडलॉ.. ३ वहारामिनॅ ती जमीन ५ वेळा रि-सेल जालती... ओरिजिनल कुन एक्सवायझेड.. नंतर आदी लोपीस, मग लुद्रिक, मग गोन्सालवीस, मग ब्रिटो...

“कागदोर जमिनी किम्मत ५ दिखाते ती रॅ?”

“अरॅ शिमा, ई ग्रे मार्केट हाय रॅ, २०% चेक आन ८०% कॅश व्यवहार”

मंजॅ थॉडक्यात सुरूवातीला एकानॅ ३/४ ला घेतली, बियाला १० ला दिली.. त्यानॅ २० ला.. आहा दोन वहारात ३-४ जनाई डबल कमाविलॅ... थॉडक्यात एक कुपारी बिया कुपाऱ्या खिशातनॅ कमायासॉ..आन बिऑ अजून बिया...

तरी पन १ करोड माला खुनावतोतॅ, माहनू ओळखीऑ, आपलॉस, कडे जासॉ?...

आमॅ डन कॅला, दोन दिहात त्याने ५० फोन केले.. “पैशे लवकर द्या.. जमीन हातशी जायदॅ, मा दरी बी २ जने हात, ६० द्यादो तयार हात, पन शिमा, तुला एकदा जबान दिली मंजॅ खपला..”

शिमा आन त्या पार्टनर्सनॅ एफडी, पीएफ ॲडजस्ट करॉन त्याला पैशॅ दिलॅ.

थॉडॅ दी शिमा मनाश्या मनामिनॅ फ्रंट रनरमिनॅ फिरलॉ.. युरोप टुर मारॉन आलॉ, आन नवॉ बंगलॉपन बान्धॉन झालॉ..

“जमीन नावोर कर्ते कऱ्याशी रॅ?”

“लगेस, तडसॉ तलाठी आपलॉ खास” आज-उद्या करता करता ६ मयनॅ गॅलॅ..

एक दी तॉ आमाला घॅवॉन तडश्या तलाठ्या तडे गॅलॉ, ओडी ओळख.. ओडी ओळख.., कडसा का?, याला तडॅ कुन कुत्रा ऑळखात नॉता.. आमॅ तहेस परत आले.. वहरी झाला...

“का रॅ?” मॅ काय केल्या पाठ होडीत नॉतॉ..

“अरॅ, त्या प्लॉटसॉ प्रॉब्लेम झालॅ, ओरिजिनल मालका भाहा-भाहासा लफडा, त्यामुळॅ जमीन नावोर हॉवॅ नाय”

(चार जना नावोर फिरलेली जमीन ओरिजिनल मालका दरी परत आलीस कही ऑ प्रश्न आमाला पडलॉ)

“जाऊन्दे, माला माये पैशे परत दे,” शिमानॅ जमीनिऑ नाद हॉडॉन दिलॉ.

“अरे, मा दरी बिऑ एक प्लॉट हाय, उसगावला”

“माला पा नाय, मायॅ पैशॅ दे”

“मायॅ अडकाल्यात रॅ.. एक व्यवहार झालॉ गा देतॅ, १० दी थांब”

आज बी एक वहरी झाला.. १० शॅ १०० हॉयाशॅ स्वप्न बगणारॉ शिमा, १-१ करॉन ५ वसुल कॅल्यात.. बियॅ ५ कार्ते यात कुना गायी?...

■ **सायमन रॉड्रिग्ज, आगाशी, क्रॉसनाका**

# माहितीचा अधिकार: काही महत्वाचे मुद्दे :समज,गैरसमज आणि वापरण्याची योग्य पद्धत.

भारतीय संसदेने सामान्य नागरिकांना शासनाला काबूत ठेवण्यासाठी माहितीचा अधिकार कायदा २००५ पारित केला आणि या कायद्या च्या आधारे,कॉमन वेल्थ घोटाळा,२ जी घोटाळा तसेच सध्याचा कोलगेट इत्यादी घोटाळे बाहेर आले.हा कायदा जास्तीत जास्त नागरिकांनी वापरला तर शासन यंत्रणे मधील बराचसा भ्रष्टाचार कमी होईल.परंतु असे निदर्शनास आले आहे कि बऱ्याच वाचकांना या अधिकाराचा फारसा फायदा होत नाहीये आणि त्यांना येणाऱ्या अडचणींची पत्रे वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध होत आहेत. हे सर्व वाचून, माहिती अधिकार चळवळीमधील एक कार्यकर्ता म्हणून सर्व वाचकांच्या माहितीसाठी माहिती अधिकार कायद्याबाबतचे काही महत्वाचे मुद्दे इथे मांडण्याचे ठरविले.

१. माहिती अधिकार कायद्याचा अर्ज निकाली काढण्यासाठी /माहिती देण्याचे टाळण्यासाठी सरकारी अधिकारी "विहित नमुन्या"मध्ये अर्ज नसल्याची पळवाट काढतात. परंतु जर आपण भारतीय संसदेने पारित केलेला "माहिती अधिकार कायदा २००५" चे अधिकृत मराठी भाषांतर (भारत सरकारचे असाधारण राजपत्र भाग १२ अनुभाग १, दिनांक २२ डिसेंबर २००५-"प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम,१९७३ (१९७३ चा अधिनियम ५०) कलम २ खंड (क) अन्वये मानलेला अधिकृत अनुवाद), अथवा मूळ कायदा बारकाईने पहिला तर कलम ६ (१) मध्ये माहिती मिळविण्याची पद्धत नमूद केलेली आहे .त्यात कुठेही **"विहित नमुना"** किंवा **"Prescribed Format"** चा उल्लेख नाही**.** अर्जदाराने त्या त्या राज्याच्या राजभाषेत किंवा इंग्लिश मध्ये व्यवस्थित वाचता येण्याजोग्या कुठल्याही नमुन्यात अर्ज करून जर त्याला रुपये १० ची फी जोडली असेल तर असा अर्ज वैध अर्ज मानला गेला पाहिजे. हा सर्व "विहित नमुन्या" चा गोंधळ जुन्या "महाराष्ट माहिती अधिकार अधिनियम २००२"पासून सुरु झाला. कारण भारतीय संसदेने देश पातळीवरील कायदा पारित करण्याआधी महाराष्ट्राने स्वतःचा "माहिती अधिकार अधिनियम" पारित केला होता आणि त्या कायद्यात एक "विहित नमुना" किंवा "prescribed format" मध्येच अर्ज करणे आवश्यक करण्यात आलेले होते. परंतु आपली संघराज्यीय पद्धती असल्याने जेव्हा भारतीय संसदेने "माहिती अधिकार कायदा २००५" पारित केला तेव्हा तो कायदा आपोआपच महाराष्ट्र या राज्याला लागू झाला म्हणूनच केवळ माहिती देण्याची जबाबदारी झटकण्यासाठी सरकारी अधिकारी "विहित नमुन्याचे" लंगडे कारण देऊ शकत नाहीत. त्यामुळे जर कुठला अधिकारी असे करत असेल तर त्याला वर नमूद केलेल्या राजपत्राचा संदर्भ देऊन त्याच्या जबाबदारीची जाणीव करून द्या**.** तसेच आपल्या अर्जावर **"**भारत सरकारचा माहिती अधिकार कायदा २००५ नुसार अर्ज **"** असा उल्लेख करण्यास विसरू नका**.**

२. अर्ज नाकारण्यासाठी दुसरी एक पळवाट सर्रास वापरली जाते ती म्हणजे "तुमचा अर्ज प्रश्नोत्तरांच्या स्वरुपात असल्याने माहिती देण्याचे बंधन नाही".हा मुद्दा जरा नीट अभ्यास करण्याजोगा आहे. माहिती अधिकार कायदा-२००५ मध्ये कुठेही या मुद्द्याचा स्पष्ट उल्लेख नाहीये. परंतु "माहिती" या व्याख्येत (kalam १) जी काही माहिती समाविष्ट केलेली आहे, ती फार व्यापक आहे. माहितीचा अर्थ केवळ "उपलब्धं कागदपत्र" अथवा "अभिलेख" नसून "शासनाकडे असलेली कोणतीही माहिती" जी देण्यास बंधन घालण्यात आलेले नाही (उदा: देशाच्या सुरक्षेशी निगडीत/एखाद्या व्यक्तीच्या जीविताला हानी पोहोचेल अशी माहिती,इत्यादी इत्यादी) असा होतो. परंतु या माहितीमध्ये सरकारी अधिकाऱ्यांचे "मत" (Opinion) अथवा "समज" (Interpritation) चा समावेश होत नाही. त्यामुळे आपण जे प्रश्न विचारू त्याचे उत्तर हे एका निश्चित माहिती कडे निर्देश करणारे असले तर त्याचे उत्तर देणे हे माहिती अधिकाऱ्यास बंधनकारक असते.

उदाहरणार्थ **:** जर आपला रेशन कार्ड मिळविण्यासाठीचा अर्ज प्रलंबित असेल आणि तुम्हाला तुमचा अर्ज का मंजूर होत नाही याचे कारण जाणून घ्यायचे असेल तर तुम्ही माहिती अधिकार अर्जामध्ये "माझा रेशन कार्डसाठीचा अर्ज का मंजूर झाला नाही आणि यास कोण जबाबदार आहे ? " असा प्रश्न विचारलात तर त्याची अनेक उत्तरे आणि करणे असू शकतात .त्यामुळे तुमचा प्रश्न "Open Ended " जो कुठल्या तरी एका विशिष्ट माहितीकडे निर्देश करत नाही असा होतो. तसेच "अर्ज का मंजूर झाला नाही" या विषयीचे "मत" हे विविध अधिकाऱ्यांचे वैयक्तिक असू शकते आणि त्यांना जे वाटेल तसा अर्थ ते काढू शकतात.त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर देणे बंधनकारक नसेल.पण हीच माहिती तुम्ही जर वेगळ्या प्रकारे विचारलीत तर काम होऊ शकते.जसे " माझा रेशन कार्ड साठीचा अर्ज मी दिनांक ______ रोजी आपल्या कार्यालयात जमा केल्या पासून त्या त्या अर्जाच्या फाईल ची संपूर्ण प्रत मला देण्यात यावी.तसेच माझ्या अर्जा नंतर किती अर्ज आपणास प्राप्त झाले व त्यापैकी किती अर्ज मंजूर होऊन त्यांना कार्ड देण्यात आले त्याचा लेखा जोखा मला देण्यात यावा.माझा अर्ज सध्या कुठल्या विभागात आणि कुठल्या अधिकार्याकडे प्रलंबित आहे आणि ती तिथे प्रलंबित कुठल्या कारणामुळे आहे याची माहिती/फाईल नोंद/अंतर्गत पत्रव्यवहार याची प्रत मला देण्यात यावी " असे प्रश्न विचारले तर त्याचे उत्तर हि "माहिती" म्हणून मान्य असणार्या व्याख्येत येते .

याच मुद्द्यावर केरळ माहिती आयोगाने एका अपिलाचा निकाल देताना (Order AP No.594(4)SIC/2008 dated 27-5-2008 ) स्पष्टपणे नमूद केलेले आहे कि माहिती अधिकार कायदा २००५ च्या कलम ७ (९) अन्वये माहिती अधिकार्यास अर्जदाराने मागितलेल्या नमुन्यात माहिती देण्याचे बंधन आहे (मात्र या साठी शासकीय साधन सामुग्री "प्रमाणा बाहेर" वळविण्याचे त्याच्या वर बंधन नसेल -कलम ७ (९) ).या प्रकरणा मध्ये अर्जदाराने एका प्रश्नावलीच्या स्वरुपात माहिती मागितली होती आणि त्याचा अर्ज "प्रश्नोत्तरांच्या स्वरुपात" अर्ज स्वीकारता येणार नाही म्हणून माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांनी फेटाळला होता.तेव्हा अर्जदाराने माहिती आयोगासमोर असा युक्तिवाद केला कि त्याची प्रश्नावली हा एक "नमुना" (Form) असून त्याच्यात उत्तरे भरणे म्हणजे "अर्जदाराला अभिप्रेत असलेल्या नमुन्यामध्ये" माहिती देणे असे होईल जे कलम ७ (९) अंतर्गत येते.

तेव्हा प्रश्न जरूर विचार पण ते नेमके आणि ज्याला केवळ एक विशिष्ट उत्तर आहे अथवा ज्याला उत्तर म्हणून एक शासकीय दस्तावेज संदर्भ म्हणून वापरला जाऊ शकतो असेच प्रश्न विचारा**.**या विषयावर कायद्यात स्पष्ट तरतुदी नसल्याने अजूनही हा मुद्दा विविध माहिती आयुक्त विविध प्रकारे हाताळतात**.**त्यामुळे आपणच जागरूक राहून नेमकी माहिती विचारलेली बरी**.**

३. आता आपण वळूया ते कुठली आस्थापने या कायद्याअंतर्गत येतात आणि कोणाला हा कायदा लागू नाही. या कायद्याच्या व्याख्येत कलम २-क मध्ये नमूद केल्याप्रमाणे, केंद्र व राज्य- शासनाचे सर्व विभाग, सर्व सरकारी आस्थापने तसेच सर्व अशी आस्थापने ज्यांची स्थापना केंद्र अथवा कुठल्याही राज्या सरकारच्या सार्वभौम लोकप्रतिनिधी सभागृहांनी मंजूर केलेल्या कायद्याने झाली आहे आणि ज्यांना प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मोठ्या प्रमाणावर निधी पुरवठा **("Substancially Funded")** कुठल्याही सरकार कडून होतो अश्याच संस्था/कार्यालये/महामंडळे आणि सरकारी कंपन्या या कायद्या अंतर्गत येतात. त्यामुळे खाजगी बँका अथवा कंपन्या या माहिती अधिकारच्या कायद्या अंतर्गत येत नाहीत. परंतु जर अश्या खाजगी आस्थापनांची एखादी माहिती जी सरकारच्या कुठल्याही विभागाकडे/नियामक आयोग (SEBI/RBI/IRDA इत्यादी) कडे जमा केलेली असेल आणि जी स्वामित्वहक्क अथवा बौद्धिक संपदा (copyright and Intellectual Property) कायद्यानुसार संरक्षित

नसेल, तर ती माहिती अश्या सरकारी विभागाकडून माहिती अधिकार अंतर्गत मागवता येते.त्यामुळे उगीचच खाजगी कंपन्यांना माहिती अधिकाराचे अर्ज करून आपला वेळ आणि पैसा फुकट घालवू नका.

४. त्रयस्थ व्यक्ती/पक्ष (सरकारी प्राधिकरणे ) बद्दलची माहिती सुद्धा माहिती अधिकार कायद्या च्या कक्षेत येते.परंतु जन माहिती अधिकाऱ्याने ज्या व्यक्तीबद्दल अशी माहिती अर्जदाराने मागितली आहे तिला तशी नोटीस देऊन तिचे म्हणणे/हरकत/ना-हरकत मागविणे बंधनकारक आहे (कलम ११ (१)).अश्या त्रयस्थ व्यक्ती अथवा पक्षाने जर माहिती देण्याची परवानगी नाकारली, परंतु जर अशी माहिती सार्वजनिक हितासाठी जाहीर करणे योग्य आहे असे जर माहिती अधिकाऱ्याला वाटले आणि जर अशी माहिती स्वामित्वहक्क अथवा बौद्धिक संपदा **( copyright and Intellectual Property )** कायद्यानुसार संरक्षित नसेल **,**तर ती माहिती जन माहिती अधिकारी देऊ शकतो **.**

५. एखाद्या प्रकारांची माहिती नक्की कुठल्या फाईल मध्ये आहे आणि तुम्हाला नक्की कुठल्या कागदपत्रांची प्रत हवी आहे हे माहित नसेल तर माहिती अधिकार कायदा कलम १(ज-१) नुसार तुम्ही सरकारी कागदपत्रांच्या पाहणीची मागणी करू शकता.अर्ज करण्याची पद्धत तीच असून,तुम्ही एखादी प्रत मागण्याऐवजी "सदर विषयाचे सर्व सरकारी अभिलेख/दफ्तर मला पहायचे आहे" अशी विनंती करू शकता **.** पहिला एक तास मोफत पाहणी असून नंतरच्या प्रत्येक १५ मिनिटांना रुपये ५ अशी फी यासाठी लागू होते**.** या विषयाच्या फाइली पाहताना जर तुम्हाला हवा असलेला एखादा कागद हवा असेल तर त्याची प्रत तुम्ही रुपये २ प्रती पण अशी फी भरून तिथेच ताब्यात घेऊ शकता.त्यामुळे सामान्य नागरिक सुद्धा एखाद्या आमदार खासदारा सारखा सरकारी कार्यालयात बसून फाइली पाहू शकतो**.**

६. "माहिती" म्हणजे नुसतेच कागदपत्र नव्हेत तर तुम्ही एखाद्या मटेरियल चे नमुने/मायक्रो फिल्म /सीडी सुद्धा मागवू शकता व त्याची योग्य ती फी भरून ते नमुने ताब्यात घेऊ शकता.तसेच जर आपली माहिती कुठल्या विभागाशी संबंधित आहे हे नक्की माहिती नसेल तर,कुठल्याही सरकारी कार्यालयात आपला अर्ज जमा करून त्याची पोच घेऊ शकता.असा प्राप्त झालेला अर्ज जर त्या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येत नसेल तर तो अर्ज योग्य त्या दुसऱ्या सरकारी कार्यालयाकडे ५ दिवसांत पाठविण्याची जबाबदारी त्या जन माहिती अधिकाऱ्याला देण्यात आलेली आहे **(**कलम ६ **(**३**) (**२**)).** त्यामुळे जर तुमचा अर्ज एखाद्या कार्यालयात स्वीकारण्यास नकार देण्यात आला तर या कलमाची त्यांना आठवण करून द्या**.** अर्थात याचा दुरुपयोग नागरिकांनी करणे अपेक्षित नाही**.** त्यामुळे शक्यतो आपली माहिती कोणत्या कार्यालयाशी संबंधित आहे याचा नीट अभ्यास करून तिथे अर्ज करा. अगदीच जर अडचण असेल तरच नजीकच्या तहसीलदार/जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये अर्ज जमा करा.

७. तसेच हल्लीच केलेल्या नवीन नियमांनुसार महाराष्ट्र राज्यामध्ये राज्य सरकारच्या अंतर्गत येणाऱ्या माहिती अधिकार अर्जांना १५० शब्द मर्यादेचे तसेच केंद्र सरकारच्या बाबतीतल्या अर्जांना ५०० शब्दांची मर्यादा घालण्यात आलेली आहे. माहिती अधिकार चळवळीतील कार्यकर्त्यांनी यास विरोध केलेला आहे आणि हि मर्यादा मागे घेतली जाईल कि नाही ते माहित नाही. तरीही तो पर्यंत, या नियमास आधीन राहून नागरिकांनी आपले अर्ज नेमक्या शब्दात लिहून दिले तर तुमचा अर्ज नाकारायला हे पण कारण सरकारी बाबूंना मिळणार नाही.
त्यामुळे जर नागरिकांनी हे सर्व मुद्दे नीट लक्षात ठेऊन आपल्या अधिकाराचा वापर केला तर निश्चितच आपण सरकारी यंत्रणेवर अंकुश ठेव शकू.

**- चिन्मय गवाणकर, जागरूक नागरिक संस्था, वसई**

# आस्वादकाच्या भूमिकेतून

कलेला कलाकाराचा स्वाद असतो आणि आस्वादकाच्या जिव्हेवर तो सार्थ होत असतो. -- रायनर मारीया रिल्के

कोणतीही कला, निर्मिती ही कलाकाराच्या, निर्मात्याच्या स्वानुभवातून, प्रगाठ चिंतनातून, उद्भवत असते. कलाकाराच्या नेणीवेतून, त्या अज्ञात, अंधाऱ्या गुहेतून एक एक दालनं उघडली जातात. कलाकार निर्मितीच्या, सृजनाच्या प्रांतात प्रवेश करतो आणि तो अनुभव शब्दबद्ध, रंगरेषाबद्ध, शिल्पबद्ध, काव्यबद्ध, स्वरबद्ध करीत जातो. आपल्या कलेच्या स्वभावानुसार साहित्य, शिल्प, चित्र, संगीतादी कलांच्या माध्यमातून स्वत:ला अभिव्यक्त करत जातो. या अर्थाने कला हा कलाकाराचा अतिशय खाजगी विषय ठरावा. किमान निर्मितीच्या प्रक्रियेदरम्यान तरी कला ही कलाकाराशीच पूर्णत: संबद्ध असते असे म्हणता येईल.

मात्र एकदा का निर्मिती पूर्ण झाली की, त्या निर्मितीला वैश्विकता प्राप्त होते. तो त्या कलाकाराची खाजगी बाब राहत नाही. जी. ए. कुलकर्णी म्हणतात, ‘‘कथा लिहून पूर्ण झाली की, मी त्या कथेपासून वेगळा होतो, नाळ तोडून टाकतो.’’ इथून पुढे आस्वादकाची भूमिका चालू होते. वर उद्धृत केल्याप्रमाणे आस्वादकाच्या जिव्हेवर कलेचा स्वाद सार्थ होतो. आस्वादकाच्या ठिकाणी निर्मितीच चक्र पूर्ण होतं. म्हणून आस्वादकाची भूमिका कलेच्या प्रांतात फार महत्त्वाची आहे.

आस्वादकाच्या दृष्टीकोनातून (समीक्षकांच्या नव्हे) कलेकडे पाहत असताना निखळ आस्वादन करता आले पाहिजे. त्या वेळी ‘अमुक एका कलाकृतीतून काय अर्थबोध होतो?’ ‘कोणत्या अनुभवाचं संचीत घेऊन ही कलाकृती जन्माला आली असावी?’

‘कलाकाराच्या वैयक्तिक जीवनाचे काही संदर्भ त्यात सापडतात का?’ ‘अमूक एक कलाकृती ही आत्मकेंद्री आहे की समाजाभिमुख?’ ‘ती कलावादी आहे की सामाजिक आशयसंपन्न?’ ‘ती मनोविश्लेषणात्मक आहे की जीवनभाष्य करणारी आहे?’ हे आणि हयासारखे अनेक प्रश्न फिजूल ठरतात, ठरायला हवेत. आपल्याला मानसिक व भावनिक पातळीवर ती कलाकृती काय अनुभव देते, तो अनुभव पूर्णाशाने अनुभविणे हे माझ्या मते निखळ आस्वादन ठरू शकते आणि अशाप्रकारे कलास्वादातून निर्भेळ आनंद मिळतो.

कलास्वादातून मिळणारा आनंद हा तर खूप मोठा चर्चेचाच विषय आहे. अनेकदा एखादा शोकांत सिनेमा किवा नाटक पाहताना प्रेक्षकांच्या डोळ्यात अश्रु जमा होतात. काहीजण रडतात सुद्धा! हा जो अनुभव प्रेक्षक घेत असतो त्याला काय म्हणावं? प्रेक्षकाला रडायला झालं म्हणजे दु:ख झालं ते कोणत्या घटनेमुळे? नाटकातील किवा सिनेमातील ती दु:खद घटना ही तर काल्पनिक आहे, तिचा वास्तवतेशी काही संबंधच  नाही. हे तर आपल्याला माहीत असतं. पण तरीसुद्धा आपण त्यावेळी दु:खाचाच अनुभव घेतो, तो का ? कदाचित असं होत असावं का, की सदर प्रसंग पाहताना आपल्या जीवनातला एखादा अनुभव, प्रसंग आपल्याला आठवत असावा आणि त्यामुळे आपल्याला रडू येत असावं किवा नेणीवेच्या पातळीवर काही उलथापालथ होऊन मनातलं दु:ख उचंबळून वर येत असावं, माहीत नाही, नेमकं सांगता येणं कठीण आहे पण कुठंतरी भावनांच आदानप्रदान कलास्वादनाच्या वेळी होत असावं.

एकदा ‘मराठी बाणा’ हा मराठी गाण्यांचा कार्यक्रम पाहायला गेलो होतो. त्यामध्ये मराठमोळ्या लग्न समारंभाचं वर्णन करणारा एक छान प्रसंग उभा केला होता. लग्नाघरी खूप धावपळ चालू आहे. गाना बजाना, धूम नाचना चालू आहे. प्रेक्षक त्या आनंदी वातावरणात रमू लागतो तोच अचानक मुलीच्या विरहाचा, आपल्या

आईवडिलांपासून दूर जाण्याचा तो ‘जिव्हाळ’ प्रसंग येतो, पार्श्वगायन चालू होतं , ‘गंगा जमुना डोळ्यात उभ्या का?’ बस! सगळं चिडिचूप... संपूर्ण नाटयगृह त्यावेळी शांत होऊन जातं. माझ्यासकट त्या प्रेक्षागृहातल्या प्रत्येकाच्याच डोळ्यांच्या कडा ओलावतात. घशात आवंढा दाटून येतो. हा जो अनुभव आहे, भावनेच्या पातळीवर घडून येणारी ही जी उलथापालथ आहे, त्यालाच ॲरिस्टॉटलने 'कॅथॉर्सीस' म्हटलं असावं (त्याने फक्त शोकांतिकेच्या संदर्भात 'कॅथॉर्सीस' हा शब्दप्रयोग वापरला आहे. मात्र शोकात्म भाव निर्माण करणाऱ्या कोणत्याही कलात्मक कृतीतून कॅथॉर्सीसचा अनुभव येऊ शकतो, असे मला वाटते) अशाप्रकारे अनुभव घेणे म्हणजेच भावनात्मक समाधान, आनंद मिळवणे आहे असा एक प्रवाद आहे. (असे अनेक प्रवाद 'कॅथॉर्सीस' ह्या शब्दाला घेऊन आहेत) आणि खरोखरच खूप जाणीवपूर्वक लक्ष दिलं तर वरीलप्रमाणे दु:खाचा अनुभव घेणे म्हणजेच भावनिक पातळीवर तो आनंदाचा अनुभव ठरतो. खरं तर आपल्याला त्यावेळी झालेलं दु:ख हे आत कुठेतरी समाधानच देउन जातं. कलेच्या अंगाने विचार करायचा झाल्यास वरील अनुभव येणे म्हणजे त्या कलेची एकप्रकारे यशस्वीता ठरते.

एकदा ‘काळोख’ हा विजय तेंडुलकरलिखित दिर्घांक पाहिला. लघुनाट्यगृहात सदर प्रयोग होता. एकूण प्रेक्षकसंख्या होती फक्त ३५ ते ४०, त्यामुळे रंगमंचाच्या अगदी जवळ बसून ते नाटक पाहता आले. (ह्याचासुद्धा एक वेगळा परिणाम साधला जात असावा असे मला वाटते) त्या नाटकातील नायिकेला तिच्या प्रियकराने सोडून दिल्यानंतर तिची होणारी वाताहत, मध्यंतरी तिचे डोळे जाणे, काही वर्षांनंतर तिच्या प्रियकराने परत तिला भेटणे, दरम्यान तिने स्वत:ला काळोखात डांबून घेणे आणि तिच्या मनात परत आपल्या प्रियकराविषयी ओढ निर्माण होत असतानाच तिच्या आंधळेपणाचं निमित्त करून पुन्हा प्रियकराचं दूर निघून जाणे, अशी गुंफण असलेल्या कथेचं ते नाटक उत्तरोत्तर ‘दु:खाचा’ ‘गडद’ अनुभव देत राहत आणि तरीसुद्धा नाटक संपल्यानंतर नाट्यगृहातून बाहेर पडताना काहीतरी विराट अनुभव घेतल्याचं समाधान चेहऱ्यावर झळकत राहतं.

असा अनुभव केवळ दृकश्राव्य कलांच्या बाबतीतच येतो असं नव्हे तर एखादी साहित्यकृती वाचताना, पेंटिग पाहताना, संगीत ऐकताना अशा कोणत्याही कलाप्रकाराचं रसिकतेने ग्रहण करीत असताना समाधान मिळत राहते. मग किशोरी आमोणकरांचा 'मल्हार' ऐकताना तिच्या तानेबरोबर आपणही उत्तुंग अशा वायुलहरींवर स्वार व्हावं, आपल्याला कोणी अलगद वरचेवर तोलून धरावं, आपण पिसासारखं हलकं होऊन तिच्या स्वरलहरीबरोबर भरकटत रहावं, सर्व विचारांची जळमट फेकून देउन पूर्ण रिकामं होऊन त्या मल्हार रागाच्या अधीन व्हावं अशी भावावस्था निर्माण होते. आपल्याला आपल्या अंतर्विश्वाशी तदरूप व्हायला भाग पडण्याची ताकद संगीतात आहे. सर्व ललित कलामध्ये श्रेष्ठ मानल गेलेलं संगीत हे अनुभवाच्या पातळीवरसुद्धा सर्व  सर्वश्रेष्ठचं ठरतं.  जो भावानुभव संगीत ऐकताना आपल्याला येतो तो अशारीर असतो. लौकीकाच्या पलीकडे घेऊन जाणारा असतो. संगीताच्याद्वारे भावनांचे विशुद्धीकरण खचितच होते. त्यामुळेच कदाचित अलीकडच्या काळात संगीतोपचार पद्धती विकसित होत असावी.

साहित्याच्या रसास्वादातून सुद्धा तीच किमया साधली जाते. ग्रेसच्या कविता वाचताना (त्या दुर्बोध असल्या तरी) असाच वेगळा आनंद मनाला प्राप्त होतो. ‘ती आई होती म्हणून, घनव्याकूळ मीही रडलो.’ अशा ओळी पार हृदयात घुसतात. आपल्या आतील दु:खाला वाचा फुटल्यासारखे वाटते. दुसरं एक समदु:खी मन त्या कवितेच्या रूपाने गवसते. ग्रेसच्या अशाच अजून काही ओळी आहेत. ज्या मनाचा ठाव घेतात.

‘गाणे अस्से गावे बाई
गळा कोरून काढावा
आणि कोरणीच्या जागी
थेंब रक्ताचा नसावा’

या ओळींतून अर्थाचा किस पडावा असे मला कधीच वाटले नाही. मात्र जितक्यांदा मी वरील ओळी वाचल्या त्या प्रत्येक वेळी मनात एक सुप्त आनंद निर्माण झालेला मी अनुभवला आहे.

जी एं च्या 'इस्कीलार आणि प्रवासी' 'सांजशकुन' ह्या संग्रहातील कथा वाचताना आपल्या आवाक्याबाहेरचं, आकलनापलीकडचं आणि तरीही अटळ असं वास्तव (नियती नव्हे!) आपल्यापुढे उलगडत राहत आणि अवाक होण्याशिवाय आपल्यापुढे पर्याय राहत नाही. त्यांची कोणतीही कथा वाचून पूर्ण झाल्यानंतर काही वेळ निश्चितच सुन्न व्हायला होतं. आपल्या मानवी जीवनाची खरी ओळख कोणत्याही धर्मग्रंथापेक्षा जीएंच्या कथांतून फार प्रकर्षाने आणि अधिक ठळकपणे होते. एलकुंचवारांचे 'युगांत' हे नाटक वाचल्यानंतर सुद्धा (प्रत्यक्ष पाहायला मिळाले नाही) असाच प्रगाठ अनुभव घेतला होता. दोन दिवस त्या नाटकाचा हॅंगओव्हर माझ्यावर होता. युगांत ह्या नाट्यत्रयींतील शेवटचा भाग (युगांत) वाचताना एका बाजूने मनाची अवस्था 'कातर' होते. त्या गावात दुष्काळ पडलेला आहे. दुष्काळामुळे संपूर्ण गाव शुष्क झालेलं आहे. माणस गाव सोडून परागंदा होत आहेत. जे काही थोडे जण मागे उरलेत ते दोन घास अन्नासाठी मोताद झालेले आहेत आणि त्यामुळे ते गाव हळूहळू संपत चालल्याची जाणीव आतल्या आत बोचकारत राहते. दुसऱ्या बाजूला 'पराग' सारखं सडाफटिंग असलेले व्यक्तिमत्व त्या दुष्काळी परिस्थितीत 'माणूस' म्हणून अधिकाधिक उजळ होत चाललेलं पाहून बरं वाटतं. एका सामान्यातल्या असामान्यत्वाचं दर्शन परागच्या व्यक्तिमत्वाकडे पाह्यल्यानंतर घडून येतं. त्याचवेळी 'अभय' या पात्राबद्दल, जो संपूर्णत: विस्थापित मानसिक स्थितीमध्ये आहे. जो आपल्या कुटुंबापासून विलगलेला आहे, आपली जन्मभूमी आणि कर्मभूमि ह्या दोहोंपासून तुटलेला आहे. ज्याला श्रेयसही गवसलेलं नाही आणि जो प्रेयसही गमावून बसलेला आहे. त्या व्यक्तिमत्वाबद्दल उगाचच सहानुभाव निर्माण होतो. (हा सहानुभाव कशासाठी याचा शोध घ्यायला हवा) कणवही वाटत राहते. एकंदरीत हे संपूर्ण नाटक वाचून संपवताना अशी त्रिधावस्था अनुभवायला मिळते.

कलास्वादातून मिळणारा आनंद हा जितका निखालस, निर्भेळ असतो, तसाच कलाकृतीतून येणारा जीवनानुभवसुद्धा खूप सखोल असतो. कलेतून मानवी जीवनाची ओळख अगदी ठळक स्वरुपात होते. मानवी जीवनातील गुंतागुंत, अटळपणे वाट्याला येणारे दू:खाचे भोग, परिस्थितीवश असलेल आपलं जगणं, आपल्या व्यक्तिगत जीवनावर असलेला बाह्य घटकांचा, व्यक्तींचा, परिस्थितीचा प्रभाव व पकड, मनाची द्वैती अवस्था जीवनातील विरोधाभास, छोट्या छोट्या गोष्टींतून आनंद मिळवू पाहणारं आपलं दुबळं मन, सुखदु:खाच्या हिंदोळ्यावर झुलत असलेल आपलं जीवन, त्यामुळे जीवनात असलेली अनिश्चितता, आपल्या प्रिय व्यक्तींचा विरह, त्या विरहातून निर्माण होणारं दु:ख, परत काही काळानंतार त्या दू:खावर मात करीत आपलं उभं राहणं, आपल्या सहवासातील व्यक्तिविषयी आपल्याला वाटत असलेले प्रेम, आदर, द्वेष, मत्सर, लोभ, राग ह्या सगळ्या भावछटांची व जीवनछटांची ओळख आपल्या कलाकृतीतून होते. एरवी आपण स्वत:च्या जीवनाकडे किती डोळसपणे पाहतो हा संशोधनाचा विषय ठरेल मात्र अशाप्रकारच्या अभिजात कलेच्या आस्वादनातून आपल्यापुढे आपलचं जीवन सहजगत्या उलगडत राहतं आणि आपण आपोआपच अधिकाधिक उन्नत जीवन जगण्याच्या मार्गावरचे प्रवासी बनून जातो.

अर्थात एवढे सगळे शब्द खर्च करून मी कला, कलास्वाद, जीवनानुभव हयाविषयी जे काही लिहीत आहे त्या लिहिण्यालासुद्धा तसा काहीच अर्थ नाही. कारण वरील सार तपशीलवार वर्णन म्हणजे अनुभव नव्हे, अनुभव हा विजेप्रमाणे क्षणात चमकून जातो त्याला मुठीत बंदिस्त करणे तितकच कठीण असत. त्यामुळे ह्या शब्दबंबाळ वर्णनापेक्षा प्रत्यक्ष अनुभव घेणे कितीतरी अधिक चांगलं आहे. शिवाय रिल्केने म्हटलेलं आहे

'कला हा अनुभूतीचा प्रदेश आहे, वर्णनाचा नव्हे.'

**इग्नेशियस डायस, भुईगाव.**

# तर्क, गृहीतके आणि मते

काही वेळेला आपण एखाद्या व्यक्तीला त्याच्या नावाने, चेहऱ्याने किंवा दुसऱ्याकडून मिळालेल्या ऐकीव माहितीच्या आधारे जाणून असतो, परंतु आपला त्या व्यक्तीशी प्रत्यक्ष संवाद अन संबंध नसतो. कधी कधी तर आपण अशा व्यक्तीला पाहिलेले सुद्धा नसते. अशा वेळेला त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरून, त्याच्या सार्वजनिक ठिकाणच्या वागणुकीवरून किंवा दुसऱ्या कुणीतरी त्या व्यक्तीबद्दल सांगितलेल्या माहितीवरून आपण त्या व्यक्तीबद्दल एक तर्क काढतो अन त्याची एक 'पर्सनलीटी' मनात उभी करतो. अशा व्यक्तीची भेट होणार असेल तर भेटीअगोदर ती व्यक्ती आपल्याशी अशी वागेल, अशी बोलेल, अशी हावभाव करेल अशा अनेक अटकळी आपण आपल्या मनात बांधून ठेवतो. पण प्रत्यक्षात आपल्याला त्या व्यक्तीचा तसा अनुभव येतो का? त्या व्यक्तीच दिसण, असण, आपल्याशी वागण हे आपण मनात उभे केलेल्या त्या व्यक्तीच्या 'पर्सनलीटी' सारखे असते का? की काही वेगळा अनुभव.

आमच्या कंपनीच्या चीफ पर्चीसिंग ऑफिसरबद्दल मी खूप ऐकून होतो पण कधी त्यांना प्रत्यक्षात पाहण्याचा अन त्यांच्याशी बोलण्याचा अनुभव आला नव्हता. मूळ भारतीय वंशाचे पण ब्रिटनमध्ये जन्मलेले ते ऑफिसर त्याच्या कर्तृत्वाबद्दल कंपनीत अल्पावधीत नावारूपाला येऊन बोर्ड ऑफ डायरेक्टर बनले होते. त्यांच्या धोरणामुळे कंपनीने मोठ्या प्रमाणात खर्चकपात करून कंपनीचा नफा वाढवला होता. ते सिंगापूर कार्यालयात बसत होते अन सुदैवाने मला ट्रेनिंगसाठी सिंगापूरला जाण्याचा योग आला होता अन त्यामुळे त्यांच्या भेटीसाठी वेळ मिळाला होता. इतक्या मोठ्या व्यक्तीला भेटणार ह्यामुळे त्यांच्याबद्दल कुतूहल तसेच एक आदरयुक्त भीती मनात निर्माण झाली होती. जेव्हा त्यांच्या भेटीसाठी त्यांच्या केबिनमध्ये मी प्रवेश केला तेव्हा मी त्यांच्याविषयी निर्माण केलेल्या प्रतिमेला छेद गेला. समोरच्या खुर्चीत एक ४५ वर्षीय उंचपुरी तरुण व्यक्ती अंगात टी-शर्ट, जीन्स व पायात निळया रंगाचे बूट घालून चुन्गम चघळत होती. मला अपेक्षित असलेला सुटाबुटातला, टाय घातलेला अन वयस्कर चीफ पर्चीसिंग ऑफिसर तिथे प्रत्यक्षात नव्हता. त्या व्यक्तीने मला कॉलेजच्या मित्राप्रमाणे हस्तांदोलन केले अन चुन्गम पुढे केला. ते आपले वरिष्ठ नसून जणू जवळचे मित्र आहेत असे त्यांच्या भेटी दरम्यान मला जाणवले. एक आगळा वेगळा अनुभव.

दुसरा अनुभव त्यापेक्षा वेगळा. परदेशात गेलेलो असताना नवीनच ओळख झालेल्या मित्राच्या घरी जेवणासाठी जाण्याचा योग आला होता. त्या मित्राची बायको आमच्या परिसरातील एका मोठ्या श्रीमंत उद्योगपतीची मुलगी होती. त्यातल्या त्यात ती मुंबईत वाढल्याने तिला आमच्या गावातील स्थानिक भाषा अन आहार पद्धती ठाऊक नसेल, ह्याची मला कमालीची खात्री होती. थोडक्यात एका इंग्रजाळलेल्या महिलेचा पाहुणचार घ्यावा लागणार अशी अटकळ मी मनात बांधली होती. पण त्या मित्राच्या घरी पोहोचल्यावर आलेला अनुभव अचंबित करणारा होता. हा मित्र माझ्याशी मराठीमध्ये अन ती मुंबईत वाढलेली मुलगी चक्क गावच्या स्थानिक भाषेत आपुलकीने बोलत होती. तिला जेवण बनवता येत असेल का अशी शंका होती परंतु तिला चक्क आमच्या गावातल्या जुन्या पारंपारिक जेवणाची माहिती होती अन तिने स्वत बनवलेले पारंपारिक जेवण सुद्धा अतिशय रुचकर होते. इंग्रजी बोलणारी, न मिसळणारी अन श्रीमंत हावभाव दाखवणारी अशी जी प्रतिमा मी तिच्याविषयी बनवलेली होती, ती पूर्णपणे खोटी ठरली

होती. भाव खाणारी मुलगी अशी मनात असलेली तिची प्रतिमा लागलीच मोठ्या भावाला जेवण वाढणारी लहान प्रेमळ बहिण अशी बनली होती. एक आगळा वेगळा अनुभव.

तिसरा अनुभव, खूप शिकवून जाणारा. एक तरूणा बाबतीचा. तसा तो आमच्या जवळच्या गावातला. मला व्यवस्थित ओळखणारा. पण मित्र म्हणावा असा काही परिचय नाही. सहसा लोकल ट्रेन मध्ये आपण बसलेलो असताना जर आपल्या परिचयातील व्यक्ती जवळपास व्यक्ती आजूबाजूला उभी असेल तर काही स्टेशन गेल्यावर आपण उठून त्यांना बसण्यासाठी जागा देतो. ह्यामध्ये त्या व्यक्तीची उभे राहून प्रवास करण्याची अक्षमता हा भाग नसून तो एक आदराचा व आपुलकीचा संकेत असतो. ह्यामध्ये त्या सीटचे मोल जास्त नसते पण आपली सीट दुसऱ्याला देण्याची कृती अनमोल असते. तर हा तरुण अंधेरीवरून विरार कडे निघालेल्या ट्रेन मध्ये बसलेला होता. मी पुढच्या स्टेशनला गाडीत चढलो तर तो नेमका त्या तरुणाच्या समोरच्या जागेत आलो. सर्व जागा भरलेल्या असल्याने साहजिकच मी त्याच्या पुढ्यात उभा राहिलो. त्याने मला पाहून मंद स्मित केले अन थोड्या वेळाने आपल्या मोबाईलमध्ये डोके घातले. सहसा अंधेरीला बसलेली मंडळी दहिसर मिरारोड स्टेशन गेल्यावर उठून दुसऱ्यांना जागा देतात. आपल्याला ओळखणाऱ्या, पाहताच मंद स्मित देणाऱ्या त्या तरुणांकडून माझ्या मानाने काही तर्क केले होते. हा तरुण मिरारोड स्टेशन गेल्यावर उठून आपल्याला जागा ऑफर करेल, असे मनोमन वाटत होते. ह्यात बसण्यासाठी जागा मिळेल, ह्या छोट्या अपेक्षेपेक्षा आपला माणूस आपुलकीने आपल्याला त्याची जागा देऊन आपलेपणाची जाणीव करून देईल, अशी प्रेमळ अपेक्षा होती. परंतु हा तरुण चक्क शेवटचे स्टेशन विरार येईपर्यंत जागेवरून उठला नाही. शेवटच्या स्टेशनवर गाडी थांबल्यावर मला हलके स्मित देऊन ह्या तरुणाने मला 'बाय' केले अन तो स्टेशनवरील गर्दीत गायब झाला. आपला वाटणाऱ्या व्यक्तीने क्षणात त्याच्या कृतीने परकेपणा दाखवला होता. एक आगळा वेगळा अनुभव.

अशी अनेक उदाहरणे अन अनुभव आपण आपल्या आयुष्याच्या प्रत्येक पावलावर घेत असतो. आपण बनवलेल्या तर्कांच्या आधारे आपल्याला एखाद्या कमी परिचयाच्या व्यक्तीला जेव्हा सामोरे जायचे असते, तेव्हा आपण आपल्या मतांच्या आधारे त्यांच्या कडून एका विशिष्ट देहबोलीची, वागणुकीची अन व्यक्तिमत्वाची अपेक्षा करतो. कधी कधी आपले अंदाज चुकतात अन वेगळेच अनुभव येतात. काही मनाला आनंद देणारे सुखद असतात तर काही अनुभव अपेक्षाभंग करणारे काटेरी. कुणाविषयी काही मत बनवूच नये, असे मनात ठरवले तरी मानवी स्वभावानुसार एखाद्या व्यक्तीची त्याच्या नावाच्या वलयामुळे, चेहऱ्याने किव्हा दुसऱ्याकडून मिळालेल्या ऐकीव माहितीच्या आधारे आपल्या मनात प्रतिमानिर्मिती करणे अन अशा व्यक्तीबरोबरच्या भेटीत त्यांच्याकडून विशिष्ट वर्तनाची अपेक्षा बाळगणे, सहजासहजी टाळता येण्यासारखे नसते. आपल्याविषयी आपल्याला ओळखणारे पण जास्त परिचयात न येणारे लोक काय प्रतिमा बाळगून आहेत? आपल्याकडून कोणत्या वर्तनाची ते अपेक्षा बाळगतात?

सचिन मेंडिस

# जन्मदात्री

त्या दिवशी वसई परिसरात पाउस जरा जास्त होता. रात्री १२.३० चा सुमार असेल वसईचा ग्रामीण भाग रात्री लवकरच निर्मनुष्य होतो. त्यामुळे रस्त्याला चीटपाखरू नसते. एका गावातील तलावापाशी करकरीत चार चाकी येवून उभी राहते. एक महिला तोंड लपवतच त्यातून लगबगीने उतरते. हातात असलेली वस्तू ती त्या तलावात भिरकावणार इतक्यात पाठून कुणी तरी ओरडले...काय करतेस ?? काय आहे ते?? कोण तू??? अश्या प्रश्नाच्या भडीमारमुळे ते महिलागांगरली हातात नुकतेच जन्मलेले मुल होते. पाठून दिलेल्या आवाजामुळे ती महिला घाबरली. तो आवाज मंदाचा होता.. मंदा एक आदिवासी महिला होती. चार घरची धुनी भांडी करून आपला पोटार्थ साधणारी , त्या दिवशी तिला परतायला रात्र झाली. आणि एका जीवाचे प्राण वाचले. तिने रागाने हिसकावूनच त्या अनोळखी महिले कडून ते मुल घेतले. "होत नाही तर जन्माला घालताताच का?? " असा सवाल करीत तिने ते मुल स्वतः घेण्याची तयारी दर्शवली. त्या अनोळखी महिलेला रागाने शिवीगाळ करीत मंदाने चालते केले. त्या नंतर त्या महिलेने क्षणाचाही अवधी न घालवता गाडीतून पोबारा केला. हातातील मुल निरखून पहिले. ते निष्पापपणे झोपले होते. ती मुलगी होती.... तिला गळ्याशी गच्च धरून मंदा घरची वाट चालू लागली. मंदाच्या घरी कुणीच नसते पतीचे काही वर्षापूर्वीच निधन झाले. तिला मुलेही नाहीत. घडलेल्या या घटनेनंतर अनेकांनी तिला नावे ठेवली .."दुसऱ्याची लफडी घेतेच कशाला??" " उद्या कुणी पोलिसात गेला मंग काय करशील?" तिचे जात बांधव तिला हिणवू लागले पण मंदाने कुणालाच भीक घातली नाही.. तिच्या कडे पर्यायही नव्हता. कारण तिने जे पाऊल उचलले ते मागे घेणे तिला शक्य नव्हते. तिने पोटच्या पोरीसारखे तिला जपले. लोकांची धुनी भांडी करून त्या मुलीला मोठे केले. आज या घटनेच्या ८ वर्षानंतर ती मुलगी इतर मुली मुलांच्या घोळक्यात शाळेत जाताना तिचा गोरा चेहरा त्या चेहऱ्यात शोभत नाही. नशिबाने तिला येथे आणून ठेवले. त्या क्रूर आई वडिलांनी जन्म तर दिला पण अज्ञात कारणामुळे ते तिच्या जीवावर उठले. पण नियतीला ते मान्यच नव्हते. जगभरात अशा अनेक घटना घडतही असतील पण मी जवळून पाहिलेली, अनुभवलेली ही घटना.... कविवर्य नारायण सुर्वे यांची जन्म कहाणी अशीच... कुणीतरी जन्मताच सोडून जातो एका गिरणी कामगारने वाढवलेले ते मुल कविवर्य झाले. "आपले आई बाप कोण? या प्रश्नाची जिज्ञासा माझ्या मृत्युनंतर शांत होईल" असे ते सांगत असत. आज त्यांच्या मृत्यूनंतर हीच जिज्ञासा त्या सापडलेल्या मुलीच्या जवळपास फिरकू नये. असे मनोमन वाटत असले तरी नियतीच्या पुढे कुणाचे चालते......??

**-अमर म्हात्रे, वसई**

# वर्णुका

[वसई बोली भाषेनी नटलेली आहे. मराठीला जवळ असणाऱ्या दर 2 कोसावर बदलणाऱ्या अनेक बोली भाषा वसईत बोलल्या जातात. या बोली भाषेपेकी सामवेदी बोली भाषा. पूर्वी घरातील कोणाचा मृत्यू झाला की बाया त्या व्यक्तीच्या आठवणी सांगत हेल लावत मृत व्यक्तीचं वर्णन करीत शोक करायच्या... या वर्णन करून गाण्यात सांगितल्या जाणाऱ्या आठवणींना वर्णुका म्हणत... आणि या वर्णुका म्हणजे बायांच्या उस्फुर्त कविताच होत्या]

१.

| | |
|---|---|
| बारा वहराई बाय मायी | जणू आहेस तू  बारा वर्ष्याची |
| आंगळ्यशि राणी मायी | अंगणातली राणी माझी |
| तोंड अजून भिजलेला धुधाने | तोंड अजून भिजलेलं दुधाने |
| तू हारखी रूप हलॅली पोरी नवती गा | तुझ्या सारखी सुंदर मुलगी नव्हती |
| त्या दारी…  त्या स्वर्गासॉ | का त्याच्या दारी… त्याचा स्वर्गातला |
| माहाल उशिक  पडलॅ  गा | राजवाडा ओस पडला होता का |

२.

| | |
|---|---|
| तुला आते मॅ कडॅ शॉधॉ | तुला आता मी कुठे शोधू |
| तुआ शालीत एव गा तुला भेट्यादो | तुझ्या शाळेत येऊ का तुला भेटायला |
| तुला बॉल्व्या येद्याद  शालीत जादो | शाळेत जायला बोलवायला येतील |
| तू मयतरणि त्यांना आते | तुझ्या मैत्रणी त्यांना आता |
| मॅ का हानगो...हानगो गा | मी  काय सांगू...सांगू का |
| बाय गेले देवाश्या शालीत | पोरी गेलीय देवाच्या शाळेत |

३.

| | |
|---|---|
| पोरे तुला वाटला नाय गा | माझ्या मुली तुला वाटलं नाही का |
| मा आयी वाट बगिदे  तुई | माझी मम्मी वाट बघेल तुझी |
| एकटी घबरदॅ  .... डॉकरा केला | एकटी होईल कावरीबावरी ...म्हातारी    केलंस |

| | |
|---|---|
| ला माला तू | ग माला |
| कोडी ला तुई वाट बघॉ | अजून किती वाट बघू तुजी |
| ये ना मागारी | फिर ना परत माघारी |
| कडे ला गेली ….. | कुठे ग गेलीस…… |
| मा डोळे थकले लो | थकले ग माझे डोळे |

४.

| | |
|---|---|
| कादोला आॅडी रागावल्या | का एवढी रागावलीस |
| कयास कहा ना बॉ यली | काहीच कशी नाही बोलली |
| सगलास हन्गीतोतीना ला | सगळच सांगत होतीस ना ग |
| मॅ कय बॉयली तुला गा | बोलली का मी तुला काही कि |
| बाबा बॉयलो कय | पप्पा बोलले काही |
| बाबा तुम्ही कय बॉयलॅ गा तिला | पप्पा तू काही बोललास का तिला |
| मग तिने कदो केलॅ आॅडॉ राग | मग ती का रागावली आहे एवढी |
| बायलो रागावले हायदॅ ते | माझ्या मुली तू रागावली असशील |
| नाका बॉलॉ मा हरी वहरिभर | अबोला कर माझ्याशी वर्षभर |
| पण तू ये ना ...तू वाट्योर | पण तू परत ये....तुझ्या वाटेवर |
| मेणवात लावॉन ठुइले | ठेवलीये पेटती मेणबत्ती |
| आन दारे खिडक्यो उघड्यो हात | आणि दारं खिडक्या आहेत उघड्या |

५.

| | |
|---|---|
| तुला खुळखूळया खेलना हाडणे | तुला खुळखुळयाच खेळणं आणेन |
| रोज करॉन खावडीने तू आवडिआॅ शिरॉ | रोज करून भरवीन गोडधोड तुझ्या आवडीच |
| तू उरासा पारवा गा मा | तू माझ्या उदरातलं पारवा आहेस |
| तू हिंदाल्ल्योरसा गाना गा मा | तू माझं झोपळयावरचं गाणं आहेस |
| तूआ ओठाला अजून दुधाव वास | तुझ्या ओठाला अजून दुधाचा वास |
| तू जायदा तॅ दुधाई धार मातीत मिळदॅ | तू जाशील तर आटून जाइल दुधाची धार |
| मा एकटीला लागेदॅ वेड | मला एकटीला लागेल वेड |

६.

तुआ एन्तरला बारा गावाशे जमल्यात तुझ्या अंतविधीसाठी बारा गावातील लोक आल्यात
लोग निरव्याशी होस माथ्याशी माळ तुला सासरी सोडून येण्याची हॉस केसाची माळ
तहिस रेली मनात लो तशीच राहिली गं मनात
बाज्या आवाज येत्यात गा तुला ब्याण्ड चा आवाज येतो का तुला
देव आल्यात तुला घारा न्यादों दॅवळात देव आले आहेत तुला घरी न्यायला
बेजीमता पाण्याय देवळात पवित्र पाणी शिंपडलं जाइल तुझ्यावर
पड्शे हॉव्यादात गा तुला तीगाला त्या पाण्यानी तुला होईल सर्दी
तॉण्ड फ़ुह्यादो पदर कुणा धारदा ला तेव्हा कोणाचा धरशील गं तोंड पुसायला पदर

७

दॅवा घारा बयबाबा खित देवाच्या घरी आईबाबाची
येदे गा तुला येईल का तुला आठवण
मवाली वेंगेत जाओन भे मावलीच्या मांडीवर जाऊन बस
खादोप्यादो करदा गा मावली रगाजल खायला प्यायला करशील ना मावलीकडे हट्ट
जेजू बाळाच्या पाळण्यात निज येशु बाळाच्या झोपाळ्यावर झोप
शांत आण सॉक शांत आणि खुशाल
आते मॅ सुल कुनादो पेटवॉ आता मी चूल कोणाकरता पेटवू
कुणा तोंडात घालो मॉडकॉ. कोणाला भरवू घास.

**- फेलिक्स डिसोजा, भुईगाव**

# व्हेन ट्रेन लेफ्ट चर्चगेट

*द बेस्ट प्लेयर ऑफ द सिझन, अवार्ड गोज टू 'आशुतोष देशपांडे'*. माईकवरून झालेल्या अनाउन्समेन्टने माझे सर्वांग शहारून गेले. मी इतका खुश होतो म्हणून सांगू!!! आणि का असू नये? मुंबईतील काही मातब्बर खेळाडूंमधून बेस्ट प्लेयर म्हणून माझी निवड झाली होती. आमचा क्लब लागोपाठ दुसऱ्यांदा चॅम्पियन बनला होता आणि त्या चॅम्पियन संघाचा कर्णधार होता 'आशुतोष देशपांडे' म्हणजे थोडक्यात 'मी'. मुंबईतील नावाजलेल्या चोवीस संघामधून जेव्हा आपला संघ विजयी होतो तेव्हा आपल्याला नक्कीच आनंद होतो. आणि त्या चोवीस संघात खेळलेल्या जवळ पास तीनशे खेळाडूमधून बेस्ट प्लेयर म्हणून जेव्हा तुमचं नाव अनाउन्स होते तेव्हा त्या आनंदाला सीमा राहत नाही.

धावतच मी स्टेजवर पोहचलो, बेस्ट प्लेयरची ती ट्रॉफी उचलताना मी अक्षरशः भारावून गेलो होतो. गेल्या रविवारी विम्बल्डनची ट्रॉफी सिकारताना रॉजर फेडररची जी अवस्था होती, अगदी तशीच अवस्था माझी होती... हातात ट्रॉफी, डोळ्यात पाणी, तोंडावर हसू, टाळ्यांचा कडकडाट.....

उप्स! मी कुठल्या खेळाविषयी बोलतोय ते सांगायचंच राहून गेलं. मी फुटबॉल ह्या खेळाविषयी बोलतोय.

क्रिकेटवेड्या भारतात फुटबॉल हा शब्द थोडा अभावानेच घेतला जातो. अभावाने म्हणण्यापेक्षा पावसाळ्यात घेतला जातो हे म्हणणे जास्त सोयीचे राहील. मुंबईकरांसाठी फुटबॉल पावसाळ्यातील एक मजेचा क्षण असतो किंवा फारतर एक व्यायाम प्रकार. पण माझ्यासाठी तो पावसाळ्यातील मजेचा क्षण नव्हता किंवा कुठला व्यायाम प्रकार नव्हता. खरं सांगायचं तर फुटबॉल हा माझ्यासाठी खेळही नव्हता. फुटबॉल माझ्या जीवनाचा एक भाग होता. ज्यासाठी मी काहीही करायला तयार होतो. माझ्या पहिल्या जॉब इंटरव्ह्यूवर पाणी सोडायलाही.

मी ट्रॉफी घेऊन घरी आलो तेव्हा संध्याकाळ होऊन गेली होती. बेलचा आवाज ऐकून आईने दार उघडले. आनंदाच्या भरात मी आत शिरलो, मला वाटलं होतं माझ्या हातातील ट्रॉफी पाहून आईसुद्धा आनंदित होईल पण आज काही वेगळंच घडलं. मी काही बोलण्याआधीच तिने मला प्रश्न केला.

"आज तुझी इंटरव्ह्यू होती ना?"

मी तिच्या चेहऱ्याकडे पहातच राहिलो, मी इंटरव्ह्यू बुडवल्याचे फक्त मलाच माहित होते. मी तिला लगेच प्रश्न केला "तुला कोणी सांगितलं?"

"फोन केलेला त्या बाईने, आयेशा की काय नाव सांगितलं. तू डॉक्टरकडे गेलाय असं खोटं बोलले मी तिला"

"त्यात खोटं कशाला बोलायचं, सांगायचं होतं माझी फायनल मॅच होती ते" हातातील ट्रॉफी शोकेसमध्ये ठेवत मी उत्तरलो.

"तु स्वतःला काय सचिन तेंडूलकर समजतोस? म्हणे फायनल मॅच होती. ती ट्रॉफी तुला पोट भरायला मदत करणार नाही. आशु एक वर्ष होईल तुला घरी बसून, तुला तुझ्या भविष्याची काही चिंता आहे की नाही?"

“कम ऑन आई, वर्षभरात किमान तीनशे साठ वेळा तू मला हे बोलून दाखवलं आहे.” अंगावरील जर्सी काढून त्याचा वास घेत मी म्हणालो. त्याला येणारा घामाचा वास आईच्या बोलण्यापेक्षा पत्करणारा होता.

“तुझ्यामुळे मला बाबांचं ऐकावं लागतं त्याचं काय. तू नोकरीचं का नाही मनावर घेत आशु?”

“घेईन माझ्या आई पण प्लीज आता बडबड बंद कर. आणि मी स्वतःला सचिन तेंडूलकर समजत नाही. तो क्रीकेटर आहे आणि मी फुटबॉल प्लेयर आहे.”

“कुणी का असेना, मला काय करायचंय त्याच्याशी?”

“तू काही करू नको, फक्त माझ्या आंघोळीसाठी पाणी काढ, मी थकलोय खूप.”

आईची बडबड बंद करायची असेल तर तिला कामाला लावणे हा एक उत्तम मार्ग होता. तिचं लक्ष कामामध्ये वळवण्यात मी यशस्वी झालो असलो तरी माझं संपूर्ण लक्ष उद्याच्या इंटरव्ह्यूकडे लागलं होतं.

आयुष्यातील पहिल्या वहिल्या इंटरव्ह्यूला सामोरे जाण्यासाठी मी सर्व तयारी केलेली असली तरी मनाची तयारी झाली नसल्याची जाणीव मला झाली. कदाचित सकाळी केलेल्या प्रवासाचा हा परिणाम असेल किंवा मरीन ड्राईव्हच्या सौंदर्याचा हा परिणाम असेल, कदाचित वुडन फ्लोअरवर होणाऱ्या बुटांच्या टकटक आवाजाचा हा परिणाम असेल किंवा समोरच्या रिसेप्शनिस्टच्या मनमोहक हास्याचा हा परिणाम असेल. त्यामागील कारण काहीही असले तरी प्रत्येक मिनिटाला माझं दडपण वाढत चाललं होतं. मी टिपॉयवरील ‘टाईम्स’ मॅगझिन उचलले व ते चाळण्याचा प्रयत्न केला. त्यामधील फोटोज बघताना एक गोष्ट मला प्रकर्षाने जाणवली, मी आयुष्याच्या एका वेगळ्याच वळणावर उभा होतो व थोड्याच दिवसात मीसुद्धा त्या फोटोमधील लोकांसारखा बनणार होतो. चेहरा क्लीन शेव केलेला, केस व्यवस्थित भांग पाडून सेट केलेले, अंग सूट बुटाने झाकलेले, डोके कामामध्ये अखंड बुडालेले आणि ओठ कितीतरी वर्ष न हसल्यामुळे गंज लागलेले....

नंतरच्या दीड तासात माझी इंटरव्ह्यू व्यवस्थित पार पडली. मी नोकरीसाठी पात्र ठरलो होतो. माझ्यासाठी नोकरीसाठी पात्र ठरण्यापेक्षाही आनंदाची गोष्ट होती, ती म्हणजे ‘मी मंगेश देशपांडे ह्यांचा मुलगा म्हणवून घेण्यास पात्र ठरलो होतो’. माझ्या बाबांनी मला बजावून ठेवलं होतं की जोपर्यंत घरी आहेस तोपर्यंत माझा मुलगा म्हणून कुणाला ओळख देऊ नकोस. मी नोकरीला जात नव्हतो म्हणून ते गेल्या चार महिन्यात माझ्याशी एक शब्दही बोलले नव्हते. बाबांच्या भीतीने आईनेही माझे लाड करणे सोडून दिले होते. नोकरी न करणाऱ्या युवकाचे आत्मचरित्र लिहायचे झाल्यास ते माझ्यापेक्षा चांगले कुणीच लिहू शकणार नाही.

नोकरीचा पहिला दिवस व त्यानंरचा संपूर्ण आठवडा हा भलताच वैताग देणारा होता. लहान असताना मी इंजक्शनचा शोध लावणाऱ्या व्यक्तीला शिव्या द्यायचो. मागच्या संपूर्ण आठवड्यात मी ऑडीटोरीअममध्ये बसून इंडक्शनचा शोध लावणाऱ्या व्यक्तीला शिव्या देत होतो. संपूर्ण आठवडा इंडक्शनमध्ये घालवल्यावर माझी रवानगी फ्लोअरवर करण्यात आली. गेल्या पाच दिवसात फ्लोअर हा शब्द मी निदान तीस ते चाळीस वेळा तरी ऐकला होता, त्यामुळे ज्याठिकाणी काम करायचे आहे त्या जागेला ‘फ्लोअर’ म्हणतात हे मला लक्ष न देताही समजले होते.

ज्यादिवशी मी फ्लोअरवर आलो त्याच दिवशी मला प्रेमाचा अनुभव आला. आमची टीमलीडर माझी ओळख सर्वांशी करून देत असताना त्यातील एक चेहऱ्याने माझे लक्ष वेधून घेतले. सुंदर मुली लक्ष वेधून घेतात ह्यात वाद नाही पण काहीतरी वेगळेपण होते तिच्यात. त्या मुलीने माझ्याकडे पाहून न पाहिल्यासारखे केले, कदाचित ती फोनवर बोलत होती म्हणून असेल. मी तिच्याकडेच पहात होतो, फोन ठेवल्यावर तिने पुन्हा एकदा माझ्याकडे पाहिले. तिचे ते सुंदर, निळे डोळे पाहून असंख्य फोनच्या घंटा एकाच वेळी माझ्या हृदयात वाजू लागल्या होत्या.

"आशुतोष"

धन्नोने हाक दिली त्यावेळी मी कीबोर्डवरील 'एक्स' बटन शोधण्यात मग्न होतो. फेअर फायलिंग डिपार्टमेंटमध्ये येऊन आम्हाला पंधरा दिवस पूर्ण झाले होते तरीही मला बटणं शोधून प्रेस करावी लागत होती. 'एक्स' बटन सापडताच त्यावर जोराने बोट दाबत मी धन्नोकडे पाहिले.

"तुम्हे अलायव्हाने बुलाया है" हातातील रिसिव्हर खाली ठेवत धन्नो म्हणाली.

मी खुर्ची किंचित बाजूला सरकवली व रितिककडे पाहिले. तो आपल्या बोबड्या आवाजात कसले तरी गाणे गुणगुणत होता. 'र' ला 'ल' बोलणाऱ्या ह्या मुलाचे नाव त्याच्या आईवडिलांनी नेमके 'र' वरूनच ठेवावे हे फार मोठे दुर्दैव होते.

"रितिक, ही अलायव्हा कोण आहे?" मी त्याला प्रश्न केला.

"आपली क्वालिती लीडल" कॅल्सीवर कसली तरी आकडेमोड करीत तो म्हणाला.

"कुठे बसते ती?"

"तिकडे त्या कोपल्यात" उजव्या बोटाने त्याच्या डावीकडे निर्देश करीत तो म्हणाला.

"ती निळ्या डोळ्यांची?" मी चमकून विचारले.

"हं." गालातल्या गालात हसत त्याने माझ्याकडे पाहिले. माझ्या चेहऱ्यावरील प्रश्नार्थक भाव मी लपवू शकलो नव्हतो, ते त्याला अचूक समजले. हात लांब करून आळस देत तो म्हणाला,

"एलल सापडले असतील तुझे."

"अच्छा, त्यासाठी बोलावलं का?"

"हं, तुला काय वाटलं जेवायला बोलावलं" स्वतःच्या जोकवर स्वतःच हसत तो म्हणाला. "जा लवकल. आणि हे तिला दे"

त्याने त्याच्या खिशातील दोन मँग्गो बाईटच्या गोळ्या माझ्या हातावर ठेवल्या. मी त्या वरच्या खिशात ठेवून पी.सी. लॉक केला. केस व्यवस्थित असल्याची खात्री करूनच मी जाण्यासाठी उठलो.

मी अलायव्हाच्या डेस्कपाशी पोहचलो तेव्हा ती आपल्या कामामध्ये अगदी मग्न होऊन गेली होती. पहिल्यांदाच मी तिला इतकं जवळून पहात होतो. मी आल्याची चाहूल लागताच तिने माझ्याकडे पाहिले व मागे असलेल्या खुर्चीकडे निर्देश करून ती म्हणाली,

“कम, टेक दॅट चेअर”

मी चेअर माझ्याजवळ ओढून त्यावर बसलो.

“कसा वाटला नवीन जॉब?” तिने सुरुवात केली.

“ऍक्सिलेंट”

“कामामध्ये काही डिफीकल्टीज्?”

“थोडेसे डाऊट्स आहेत, पण एक दोन दिवसात क्लीअर होतील”

“टेक युअर टाईम. सुरुवातीला टार्गेट नाही मिट केलं चालेल पण क्वालिटीवर लक्ष दे”

“ओ.के.” मी मान हलवली.

“मी तुला अशासाठी बोलावलं, तुझ्या बॅचमध्ये मला काही एरर सापडले आहेत.”

तिच्याकडे अपराधीपणाने भरलेली दृष्टी टाकत मी खेद व्यक्त केला पण मनातल्या मनात मात्र मी खूप खुश होतो. एररच्या निमित्ताने का होईना ज्या मुलीच्या दिसण्यावर मी फिदा झालो होतो तिच्याशी बोलण्याचे माझे स्वप्न पूर्ण झाले होते. असे क्षण जर पुन्हा पुन्हा येणार असतील तर एक काय, मी हजार एरर करायला तयार होतो.

“यु हॅव टू क्लीअर इट बाय टुडे. मी तुला दाखवते कुठल्या बॅचमध्ये आहेत......” कल्लूसारखा दिसणारा काळाकुट्ट माउस हातामध्ये घट्ट पकडत ती म्हणाली. “जस्ट राईट डाऊन द बॅच नंबर.”

तिने तिच्यासमोरील एक कोरा कागद माझ्याकडे दिला, मी खिशातील पेन काढून ती सांगत असलेले बॅच नंबर त्यावर लिहू लागलो. ती बोलत असताना मी तिच्याकडे टक लावून पहात होतो. देवाच्या हस्त कौशल्याचा एक सुंदर असा नमुनाच मी प्रत्यक्ष न्याहाळत होतो. पहिल्याच नजरेत मला वेड लावणारे तिचे निळे डोळे स्क्रीनवर खिळलेले होते. एखाद्या मरणाऱ्या व्यक्तीलाही जगायला प्रेरणा देतील इतके ते सामर्थ्यशाली होते. पोनीटेल स्टाईलने बांधलेले तिचे सोनेरी केस तिच्या गोऱ्या वर्णाला अगदी खुलून दिसत होते. त्यातील एक दोन बटा तिच्या गालावर घोळत होत्या, ज्यामुळे तिच्या सौंदर्यात अजून भर पडली होती. तिच्या गुलाबी ओठावरील ओलसरपणा उगाचच मला ‘भिगे होट तेरे’ गाण्याची आठवण करून देत होता. तीने आपल्या उजव्या हातामध्ये काळाकुट्ट माउस घट्ट पकडला होता व त्यावरील चक्र ती बोटाने फिरवत होती. त्या माउसने गेल्या जन्मी नक्कीच काहीतरी पुण्य केलेले असावे.

तिने सांगितलेले बॅच नंबर कागदावर लिहून मी उभा राहीलो. उठण्याची अजिबात इच्छा नव्हती; खूप काही बोलावसं वाटत होतं पण काय बोलावं तेच कळत नव्हतं. नाईलाजास्तव खुर्ची मागे ढकलली व ‘थँक यू’ बोलून मी जाण्यासाठी वळालो. मी दोन पावलं पुढे सरकलो नव्हतो तोच तिने पुन्हा हाक मारली

“आशुतोष”

मी जागीच थांबलो व मागे वळून पाहिले

“कॅन यु सेंड साहिल हिअर?”

“शुअर.” खिशाला पेन लावत मी म्हटले.

पेन लावत असताना खिशामध्ये असलेल्या मँन्गो बाईटची मला आठवण झाली. मी पुन्हा मागे सरकलो व ते दोन्ही चॉकलेट तळहातावर ठेवून तो हात तिच्यासमोर धरला.

“धिस इज फॉर यू”

“ओ, थँक्स. तुला पण त्या रितिकने वेड लावलेले दिसते” त्यातील एक गोळी उचलत ती म्हणाली.

“मी नाही खात कधी, त्यानेच पाठवले होते तुझ्यासाठी.” मी माझा हात तिच्यासमोर तसाच ठेवला होता. “हे दुसरं पण तुझ्यासाठीच आहे.” मी म्हटले.

“ते तूच खा. आवडेल तुला”

“पण ते तुझ्यासाठी आहे; मी कसं खाणार”

“मी दिलंय असं समज”

“तसं असेल तर तुझ्या हाताने दे” मी ते मँन्गो बाईट तिच्या डेस्कवर ठेवत म्हटले. तिने ते मँन्गो बाईट उचलले व तिच्या तळहातावर ठेवून तो हात माझ्यासमोर धरला.

“धिस इज फॉर यू” ती माझी नक्कल करीत म्हणाली.

तिच्या चेहऱ्याची कळी खुलली होती व तिच्या ओलसर ओठांमधून दिसणाऱ्या शुभ्र दातांनी तिच्या चेहऱ्याची चमक अजून वाढवली होती. मी हसतच ते मँन्गो बाईट उचलले व जायला निघालो. रॅपर काढून गोळी तोंडात टाकत असतानाच तिने मला पुन्हा हाक मारली, मी लगेच वळून पाहिले.

“हे पण तुझ्यासाठी,”

तिने हात पुढे केला होता पण तिची मुठ आवळलेली होती. थोड्याशा आश्चर्याने मी माझा हात पुढे केला. हसतच तिने तिची मुठ उघडली व तिच्या हातातील चॉकलेटचे रॅपर माझ्या हातावर ठेवले. त्यावेळी माझ्या हाताला झालेला तिच्या बोटांचा ओजळता स्पर्श आजही माझा जीव घेऊन जातोय. तिची बेधुंद नजर माझ्याकडे वळली होती व मी तिच्याकडे आकर्षिल्या जाणाऱ्या माझ्या वेड्या मनाला रोखण्याचा अयशस्वी प्रयत्न करीत होतो.

***

एखादी गोष्ट पहाताक्षणी आपल्याला आवडते. ती गोष्ट आवडणे किंवा त्या गोष्टीच्या प्रेमात पडणे हा निसर्गाचा मोठेपणा ठरू शकतो. परंतु ती गोष्ट आपलीच झाली पाहिजे ही आशा बाळगणे किंवा त्या गोष्टीच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करणे ह्यामध्ये मग आपला वेडेपणा सामील होत असतो.

अलायव्हाच्या प्राप्तीसाठी माझ्या मनात असलेली आशा, हा त्याच वेडेपणाचा भाग होता. कधी वाटायचं आपण उगाचच हा वेडेपणा करतोय, चिमणीचे पंख घेवून गरुडाबरोबर उडण्याची स्वप्नं बघतोय. पण माझा तरी काय दोष होता त्यात, गरुडाला वाटल्यास तो चिमणीबरोबर उडू शकणार नाही काय? हीच एक आशा मला हा वेडेपणा करण्यास साथ देत होती.

अलायव्हा डिकोस्टा माझ्या स्वप्नातील राजकुमारी बनली होती. दोन महिन्यापूर्वी नोकरीवर रुजू झालेला एक सर्वसामन्य मुलगा, जो नोकरीत कन्फर्म होण्याआधीच आपल्या क्वालिटी लीडरच्या प्रेमात पडला होता.

खरं पाहता माझ्यात आणि अलायव्हामध्ये फार मोठी तफावत होती. ती माझ्यापेक्षा वयाने मोठी होती, तीची जात वेगळी होती, तीचं राहणीमान उच्च दर्जाचं होतं, माझ्यापेक्षा कितीतरी पटीने ती सुंदर होती.

फ्लोअरवर कामानिमित्ताने आमचे एकमेकांशी येत असलेले सबंध औपचारिक असले तरी तिच्या नजरेत काहीतरी वेगळंच असल्याचं मला दिसलं होतं. तीचं माझ्याकडे टक लावून पहाणं ही गोष्ट माझ्या मनातील आशेची ज्योत पेटती ठेवायला पुरेशी होती.

एक दिवस मजेमध्ये तिच्या लग्नाविषयी चौकशी कुणीतरी चौकशी केली तेव्हा *मी माझ्यासाठी मुलगा आधीच बघून ठेवलाय* असं ती म्हणाली होती. त्या वाक्यामुळे मी खूप अस्वस्थ झालो होतो. माझं कुठल्याच गोष्टीवर लक्ष नव्हतं. परंतु खरं सांगायचं तर त्या वाक्यात किती खरेपणा आहे ह्याचा साधा विचारही मी केला नव्हता. कदाचीत तिने ते वाक्य मजेमध्ये बोललं असल्याची शक्यता होती, कदाचित तिने तिच्यासाठी पाहिलेला मुलगा मीसुद्धा असण्याची शक्यता होती. शक्यता आणि अशक्यता ह्यांचाच खेळ होता हा सगळा...

परंतु आज जे घडणार होतं ते नक्कीच मला अशक्यतेकडून शक्यतेकडे घेऊन जाणार होतं.....

एन्युअल डेच्या निमित्ताने आज आमची पार्टी होती. पार्टी संपल्यावर मरीन ड्राईव्हला फिरायला जाणे हा सर्वांचा दरवर्षी ठरलेला कार्यक्रम. गेल्या कित्येक वर्षात पार्टीचं ठिकाण बदललं गेलं नसल्यामुळे ह्या कार्यक्रमात खंड पडला नव्हता. ओबेरॉय हॉटेलमधून बाहेर पडताच आम्ही मरीन ड्राईव्हवर पोहचलो. साधारण अकरा वाजण्याचा सुमार असावा, तिथलं वातवरण कुणालाही वेड लावेल असंच होतं. एरवी लोकांच्या गर्दीमुळे व वाहनांच्या रहदारीमुळे गजबजलेला तो परिसर त्यावेळी एकदम शांत होऊन गेला होता. अथांग सागरानेही उसंत घेण्यासाठी हीच वेळ निवडली असावी. डोक्यावर पसरलेल्या निरभ्र आकाशातील शुभ्र चांदणं मनमोहक वाटत होतं, त्या चांदण्याचं पाण्यामध्ये परावर्तीत झालेलं सुंदर असं प्रतिबिंब, लाटावर स्वार होऊन शांतपणे हेलकावे खात होतं. मध्येच वाहणाऱ्या मंद वाऱ्याची झुळूक अंगावर घेताना मनावर आज वेगळीच धुंदी चढली होती.

मी संथ पावलं टाकत एकटाच किनाऱ्याकडे चालत गेलो. आमच्या टीमची तीनचार मुले सिगारेटचा धूर उडवत मागेच रेंगाळली होती. अलायव्हासह टीमच्या तीन-चार मुलींनी तिथल्या धक्क्यावर आपले स्थान ग्रहण केले होते. दारू सिगारेटला न शिवणारी आमच्या टीमची सभ्य मुलेही मुलींच्या गँगमध्ये सामील झाली होती. मी त्यांच्याकडे मुद्दामून दुर्लक्ष केलं. मला त्यांच्या गप्पांमध्ये कुठलेही औत्सुक्य नव्हते, ते सर्व माझ्यापासून काही अंतरावरच असले तरी त्यांची बडबड माझ्यापर्यंत पोहचणार नाही ह्याची मी दक्षता घेतली होती. कल्लूकडून एक सिगारेट घेवून मी ती पेटवली व समुद्रात पाय मोकळे सोडून मी माझ्याच विश्वात रमून गेलो. ते क्षण खूपच आल्हाददायक होते.

माझ्या खांद्याला कुणाचा तरी स्पर्श झाला तेव्हा माझी तंद्री भंग झाली. ती अलायव्हा होती, तिने मला पाण्यात ढकलल्यासारखे केले. मला दचकलेलं पाहून ती मनसोक्त हसली. तिला त्याठिकाणी पाहून मी थोडासा आश्चर्यचकित झालो, मी आजूबाजूला पाहिले तिच्या जोडीला कुणी नव्हते. बाकी सर्वजण होते त्याच स्थितीत बसलेले होते, टीममधील एक मुलगी थोडी कलंडली होती, मला वाटतं ती झोपून गेली असावी.

“जीव द्यायचा विचार आहे का?” तिने हसतच प्रश्न केला.

“माझा तसला काही विचार नाही परंतु मला वाटतं, तुझा जीव घ्यायचा विचार आहे.” मी हसत म्हणालो. ती पुन्हा मनसोक्त हसली.

“इथे एकटा काय करतोयस?”

“मला आवडतं असं एकटं बसायला.”

“कधी कधी तुझं वागणं विचित्र वाटतं मला.” बोलत असताना तिने चप्पल काढून माझ्या मागे ठेवले व तिसुद्धा पाय मोकळे सोडून माझ्या बाजूला बसली.

“तू काय करतेयस इथे?” मी तिला विचारले.

“मला आवडते कुणी एकटा असेल त्याला साथ द्यायला” ती डोळा मिचकावत म्हणाली. तिच्या उत्तराने एक चैतन्याची लहर माझ्या शरीरात सळसळली.

“ह्या आयुष्याच्या वाटेवरही मी एकटाच आहे, अलायव्हा.” मी आकाशाकडे तोंड करून पहात म्हटले.

“तुझं ब्रेकअप झालंय का?” तिने प्रश्न केला.

“नाही. मला प्रेम झालंय” मी माझी मान तिच्याकडे वळवली.

“वाव, मलाही ड्रिंक्स केल्यावर असंच काहीतरी होते.” माझ्या खांद्याला खांदा लावत ती म्हणाली. मला काय बोलावे तेच सुचले नाही.

“हे आशु.... तू सिगारेट ओढलंस ना”

“हो”

“तू मला सांगितलं होतं, तू सिगारेट ओढणार नाही”

मी काही बोललो नाही, तिनेही मग काही विचारलं नाही. मघाशी तिने बोललेलं वाक्य तिला बोलून दाखवावे असं माझ्या मनातही आलं परंतु कदाचित तिने माझा पुन्हा कचरा केला असता. दोन मिनिटं अशीच शांततेत निघून गेली. वाऱ्याने उडणाऱ्या केसांना खांद्यावरून एका बाजूला घेत ती जहाजावरील दिव्याकडे पहात राहिली.

“आज तू मला पहिल्यांदा आशु नावाने हाक दिलीस” माझी नजरही त्याच दिव्यावर खिळली होती.

“आवडते का तुला आशु बोललेलं?”

मी फक्त होकारार्थी मान डोलावली.

“पण मला नाही आवडत कुणी मला ‘आलू’ बोललेलं. म्हणजे आलू फक्त मला माझ्या बॉयफ्रेंडने बोलायला पाहिजे असं मला वाटतं”

“म्हणजे तुला आलू बोलायची संधी मला आयुष्यात मिळणार नाही.” मी हसत परंतु वेदनेने तिच्याकडे पाहिले.

“असं काही नाही, नशिबात असेल तर मिळेलसुद्धा.”

“पण त्या नशिबालाही कुणाची तरी साथ असायला लागते.”

“कुणाची?” तिने फक्त माझ्या डोळ्यात पाहिलं.

“तुझी”

ती काही बोलली नाही. ती फक्त लाजली. खरं म्हणजे ती काहीही न बोलता सर्वकाही सांगून गेली होती... आणि अचानक सर्व काही बदलल्यासारखं वाटू लागलं होतं... आज पहिल्यांदा हवेत सुगंध दाटला होता आणि समुद्राच्या पाण्यालाही गोडवा निर्माण झाला होता... क्षितिजावरच्या चंद्रानेही आज गुलाबी रंग धारण केला होता... आणि त्या गुलाबी रंगात मी न्हाहून निघालो होतो...

काळोखातही अलायव्हाचे डोळे तितकेच सुंदर दिसत होते. कितीतरी क्षण असेच निघून गेले, मी हळूच माझी मान खाली घेतली. पुन्हा एकदा आमची नजर त्या जहाजावरील दिव्याकडे लागली होती. जहाज जसजसे दूर निघून जात होते तसतसा दिव्याचा उजेड मंद होत चालला होता, जवळच बसलेल्या आमच्या ग्रुपमधून अचानक गाण्याचे सूर उमटू लागले होते...

दो दील मिल रहे है... मगर चुपके चुपके...

***

आमच्या प्रेमकथेची सुरुवात मरीन ड्राईव्हच्या त्या रम्य किनारी झाली होती आणि दुर्दैव म्हणजे, वर्षभराने त्या कथेचा अंतही तिथेच झाला. त्या एक वर्षात मी प्रेमाचा अस्सल अनुभव घेतला, जीवन किती सुंदर असते ते मी त्या बारा महिन्यात अनुभवले. जीवन कितीही सुंदर असले तरी काही गोष्टी नियतीला अजिबात मान्य नसतात.

आमच्या सुंदर प्रेमकथेने त्यादिवशी अचानक वेगळेच वळण घेतले होते. त्यादिवशी मरीन ड्राईव्हवर बसलेलो असताना मी माझ्या प्रेमाला उराशी घट्ट आवळून एकजीव होण्याचा प्रयत्न करीत होतो. तिच्या सानिध्यातील ही घटका आमच्या प्रेमरुपी आयुष्यातील शेवटची घटका होती, हे मला त्यावेळी ठाऊकही नव्हते. समोर सूर्याचा लालसर गोळा समुद्राच्या पाण्यात नाहीसा होत होता. त्याचा शिल्लक तांबूस प्रकाश तेवढा सगळीकडे पसरला होता. बघता बघता काळोखाचं साम्राज्य ह्या धरतीवर पसरू लागलं होतं. उद्या जेव्हा हा सूर्य पुन्हा उगवेल तेव्हा धरतीवर उजेडाचं सम्राज्य घेवून येईल. नवचैतन्याची एक रम्य पहाट प्रत्येकाचं जीवन उजळवून टाकेल. परंतू माझं जीवन ह्या भीषण अंधारात तळमळत राहील, समोर पसरलेल्या अथांग सागराप्रमाणे.

(व्हेन ट्रेन लेफ्ट चर्चगेट ह्या कादंबरीतील प्रेमकथेचा हा निवडक भाग आहे. ११ जुलै २००६ रोजी झालेल्या ट्रेन बॉम्ब हल्ल्यात आपले सर्वस्व गमावणाऱ्या एका मराठी तरुणाची ही कथा असून ह्या कथेचा संपूर्ण सारांश तुम्हाला कादंबरीत वाचावयास मिळेल.)

***

**- केविन आल्मेडा, नवाळे, निर्मळ**

# बालपणाच्या शीतल आठवणी !

सुट्टीचे दिवस, विशेष करून शालेय जीवनातील मे महिन्याची सुट्टी म्हटली की आठवतात ते म्हणजे पहिली ते आठवीत असेपर्यंत नव्वदीच्या दशकात घालवलेले 'ते मोरस्पर्शी दिवस'. विरोधाभास वाटेल, पण, भर उन्हा-तान्हात घालवलेले ते दिवस आठवताना मात्र खुप आल्हादायक वाटते. परीक्षा संपून शाळेला सुट्टी लागण्याचा तो काळ. पण खरं ज्ञानार्जन ह्याच काळात होत असे. शाळेत 'मार्क' मिळत असले तरी बहुतेक वेळेला 'गुण' अंगभूत करण्याचे काम मात्र ह्या सुट्ट्याच करायच्या. परीक्षा संपली रे संपली, की शाळेचा युनिफॉर्म, बॅग, आणि टेबलावर इतस्ततः पसरलेली वह्या-पुस्तके दोन-अडीच महिन्यासाठी कपाटात बंद करून ठेवली जायची. मे महिना म्हणजे रजा हे समीकरण तोपर्यंत मनात इतके पक्के बसलेले असायचे कि, ही मोठी माणसं मे महिन्यात सुद्धा कामाला जातात याचेच खुप अप्रूप वाटायचे.

मामाकडे, मावशीकडे राहायला आलेले नवीन ३-४ मुले, आम्ही १२-१३ जण, आणि बाकीचे 'कच्चा लिंबू' असे करून, १५-२० मुलांमुलींचा गोतावळा आमच्या परिसरात होता. आम्ही सर्वजण समोरील काकाच्या घरी जमायचो. त्यांच्या घरी जमण्याचे कारण म्हणजे, घराच्या बाजूला, नारळाच्या सावलीत खेळण्यास असलेली मोकळी अशी जागा. क्रिकेट, पकडा-पकडी, दगड, विटी-दांडू, कॅरम, पत्ते, असे जे जे खेळ तेव्हा माहित होते ते सगळे खेळ खेळले असले तरी खरी मज्जा मात्र 'कु-का-कू' किंवा लपाछपीच्या खेळाला यायची. लपण्याच्या जागा ठरविल्या जायच्या आणि मग, आंबा-चिंचाच्या झाडाच्या मागे, विहीरीच्या पल्याड, बाजूला नवीन बांधायला घेतलेल्या घरामध्ये, पायरीच्या मागे, जिकडे जागा असेल, तिकडे, आम्ही, इवलेसे हडकुळे स्वत:ला लपवून ठेवत असू. कधी कधी एखाद्या कोपरयात लपलेल्या मुलाला, रस्त्यावरून जाणारी त्याची आई किंवा मोठी बहिण बघत असे, आणि आमच्या नकळत, त्याला तेथून परस्पर घरी घेउन जात असे. आणि इथे, तो न सापडल्यामुळे खेळ अपूर्ण किंवा जोपर्यन्त तो सापडत नाही तोपर्यन्त म्हणजे २-२ दिवस सुद्धा चालत असे! दुपारी खेळ एकदम असा हा भरात आलेला असताना, कुणीतरी आंब्याचा विषय काढांयाचा आणि मग सगळे 'टॅम्प्लीस' (तो शब्द 'time please'चा अपभ्रम्श आहे हे मात्र नंतरच कळलं!) असे बोलून, 'त्या' तोतापुरी आंब्याच्या झाडाखाली येत असे. दुसरयाचे आंबे त्याच्या नकळत पाडण्यास मात्र खुप कौशल्य लागत असे. कुणीतरी, चांगले दगड शोधून आणणार, ज्याचा नेम चांगला आहे, तो दगड अलगदपणे (पानाची जास्त सळसळ होवून न देता) पण अचूकपणे मारणार, आणखी दोघे तिघे ते आंबे पटकन उचलणार, आणि राहिलेले बाकीचे कोण येतेय का नाही यावर पाळत ठेवत बसणार. तोपर्यंत तिकडे, दोघा-तिघांनी मीठ मसाला आणि सुरी याची व्यवस्था केलेली असायची. अशा प्रकारे पूर्ण teamwork होवून आंब्याची चटनी पार पडत असे.

तोच, टिंग टिंग करून, रंगेबेरंगी बर्फाचे गोळे बनवणारा 'उन्डेवाला' यायचा. अर्थात, चाराणे, आठाने असे एक-दोन नाणी 'दूरदृष्टी' ठेवून, अगोदरच आम्ही सदरयाच्या खिशात ठेवलेली असायची. बर्फाच्या पांढऱ्या शुभ्र गोळयावर, ते लाल, निळे, हिरवे, जांभळे, रंगाचे पटटे पाहत असताना, मनात 'हया उंडेवालाच्या घरची मुलं किती नशीबवान आहेत.' असा बालसुलभ विचार उमटायचा. भेंडीच्या पानावर तो थंडगार गोळा ठेवून खात असताना, अगोदर कच्चे आंबे खाऊन आंबलेल्या दातात एक लहर उमटायची. उमममहहा.. असा आवाज काढून मग तो गोळा संपविला जायचा. कधी कधी शेतकरी असलेल्या काकांना

मदत करण्यासाठी आम्ही सर्वजण, शेतातही जात असू, कुदळ-फावडा कसा धरणे, जमिनीत वाफे कशे करणे, भाजीपाल्याला पाण्याचे शिंपण करणे, ह्या गोष्टीही या मे महिन्याच्या सुट्टीत शिकायला मिळाल्या.

आमच्या अशा ह्या हुंडारण्यात संध्याकाळ कशी व्हायची ते पण कळायचे नाही. अर्थात कितीही खेळात असले तरी, संध्याकाळ झाली म्हणजे आमची स्वारी घराकडे यायची, कारण मम्मी-पप्पा कामावरून यायची वेळ झालेली असायची. घरी आल्यावर मात्र, ‘बय’ म्हणजे आमची आजी, ‘आख्खो दि भरलो, तुमाला हाक देवोन थकली, थाम्ब, त्यांना कामोरसा येवूदे कहा नाव हान्गीते बघ आज’ असं दटावून, अंघोळीला पाणी द्यायची. अंघोळ झाल्यानंतर, मग, गोष्टीचे पुस्तक वाचायला बसायचे. गोष्टीचे व अभ्यासाचे पुस्तक यातला, फरक, बयला काही कळायचा नाही, आणि, मुलांनी, पुस्तक हातामध्ये घेतले आहे हे बघून, तीची स्वारी खुश व्हायची. मम्मी-पप्पाने ‘आज यांनी दिवसभर काय केलं?’ असं विचारल्यावर, मग ती ‘कय नाय, अडेस होते’ असा चांगला रीपोर्ट द्यायची.

एखाद रविवारी मम्मी, ‘एकदा मुलांना घेवून माहीमच्या देवळा नोव्हेनाला जाऊ’ असे पप्पांना सांगायची. नोव्हेना हा बुधवारी असल्यामुळे त्याच दिवशी आमची मग ‘मोस्ट-अवेटेड’ मुंबईची वारी व्हायची. माहीमच्या नोवेनानंतर museum, मत्सालय, तारांगण, राणीची बाग, किंवा एखादं नाटक यापैकी काहीतरी करून, जेवून घरी यायचो. मग कधीतरी मम्मीच्या ऑफिसमध्येही आमची वर्णी लागायची. मम्मीच्या टेबलावरील टेलीफोनचे तेव्हा मला खूप आकर्षण वाटायचे. पण तेव्हा आमच्या घरी वा नातेवायीकांकडे कोणाकडे फोन नव्हता मग मम्मीच्या ऑफिसमधून 'हा विनामूल्य असलेला फोन कुणाला बरं लावावा? ' असा उनाड प्रश्न पडायचा. मग त्या दिवसाचे वर्तमानपत्र उघडून त्यातील विविध जाहिरातीतील नंबर्सना फोन करण्याचे उद्योग चालायचे. आपल्या आई-वडीलाना किती मेहनत करायला लागते, ऑफिसमधले साहेब आणि त्याचे सहकारी, हे सरकारी ऑफिसमधील कोर्पोरेट दृश्यही अनुभवण्यास मिळायचं. ऑफिसमधून घरी येताना मात्र ट्रेनमधील प्रवास पाहून खूप भीती वाटायची व आपलं पुढील आयुष्य कसं असणार आहे ह्याची पुसटशी जाणीव व्हायची. ह्याच सुट्टीत, मामाच्या घरी राहण्यास जाणे, किंवा गावातून वा चर्चमधून, अर्नाळा, कळंब, वसईचा किल्ला, ह्या ठरलेल्या ठिकाणी पिकनिकला जाणे, अशा प्रकारे, वेगवेगळ्या ठिकाणीही ह्या सुट्टीत फिरायला मिळायचे.

आता मोठे झालो, ‘समज’ आली. पण तो लहानपणीचा काळ, कधी कधी मनात रुंजी घालतो, आणि वाटते मोठे होण्याची खुप मोठी किंमत आपल्याला चुकवावी लागली आहे. तेव्हा आपण निरागस, निष्पाप, आणि जगाच्या चालीरीतीविषयी अज्ञानी होतो आणि त्यामुळे आनंदी होतो. आज, समज आलेल्या ‘मोठ्या’ लोकांनी चालवलेला प्रत्येक अन्याय, स्वार्थीपणा, पाहिला कि मला माझे लहानपण आणि तो निरागसपणा आठवतो. लहानपण खूप गोष्टी शिकविते. त्या अनंतात हरवलेल्या बालपणास उद्देशून, कवी ग्रेस ह्यांनी लिहिलेली एक कविता या पार्श्वभुमीवर खुप समर्पक वाटते.

‘भय इथले संपत नाही,
मला तुझी आठवण येते,
मी संध्याकाळी गातो,
तु मला शिकविली गीते...’ !!.....

**डॅनिअल फ्रान्सीस मस्करणीस, वाघोली**

# धर्मगुरूपदाचं मार्केटिंग

लेखाचं शीर्षक थोडसं विचित्र वाटेल आणि तसं ते आहे देखील ! धर्म आणि धर्मगुरू हि काही विकावयाची वस्तू किंवा सेवा नाही आणि त्यामुळे धर्मगुरूपदाचं मार्केटिंग हा काय प्रकार आहे अशी शंका किवा कुतूहल वाटणे साहजिकच आहे.

मित्रहो, आजकाल जगभर ख्रिस्ती धर्मगुरूची वानवा भासत आहे. वाढत्या लोकसंखेला पुरेश्या प्रमाणात नवीन धर्मगुरू मिळत नाहीयेत. ‘हम दो हमारे दो’ ही छोट्या कुटुंबाची संकल्पना प्रबळ झाल्यामुळे पालक आपल्या एकुलत्या एका मुलाला धर्मगुरु व्हावयाला पाठवण्यास राजी नसतात. लहानपणापासून ऐषा-आरामाची सवय लागलेली मुलंही धर्मगुरू होण्यासाठी उत्सुक नसतात. हे आपणा सर्वांस विदित आहेच. आपल्या वसईपुरते पाहू गेल्यास साधारण इसवी सन २००० पर्यंत प्रत्येक गाव / आळीतील एखादा तरी तरुण सेमिनरीमध्ये धर्मगुरूपदाचे शिक्षण घेत असायचाच. आज हे प्रमाण धर्माग्रामातील एखाद-दुसरा एव्हढ्यावर आले आहे. ही खरोखर चिंतेची बाब आहे. साधारणतः एक हजार लोकसंखेसाठी एक धर्मगुरू असावा असं मानलं जाते. धर्मगुरूंच्या तुटवड्यामुळे हे प्रमाण दिवसेंदिवस व्यस्त होत आहे. भविष्यात आधुनिक काळाशी सुसंगत धार्मिक भूमिका घेणा-या सक्षम आणि पुरेश्या धार्मिक नेत्याअभावी आपला समाज धार्मिकदृष्ट्या सैरभैर होवू शकतो.

आपण पाहतो कि एखादा व्यवसाय (Profession), एखादा उद्योग, एखाद्या प्रकारची संस्था समाजाच्या दृष्टीने फायद्याची आहे परंतु पुरेसे लोक त्या प्रकारचा व्यवसाय, उद्योग किंवा संस्था सुरु करण्यास / चालविण्यास उत्सुक नसतात तेव्हा सरकार अश्या उद्यमांना प्रोत्साहन देण्यासाठी काही योजना जाहीर करते, काही सवलती देऊ करते, काही बक्षिसे जाहीर करते जेणेकरून जास्तीत जास्त लोकांनी त्या व्यवसायात उडी घ्यावी. उदाहरणच द्यायचं  झालं तर सध्या महाराष्ट्रीय तरुण IAS / IPS व्हावेत म्हणून महाराष्ट्र सरकार आणि इतर समाजसेवी संस्था कितीतरी प्रयत्न करीत आहेत. एखाद्या ठिकाणाची औद्योगिक प्रगती व्हावी म्हणून SEZ तयार केले जातात. परदेशी चलन मिळवून देणा-या कंपन्यांना विविध करसवलती दिल्या जातात. आणि ह्या सगळ्या गोष्टींची माध्यमाद्वारे खूप प्रसिद्धी केली जाते. थोडक्यात काय तर समाजहिताच्या व्यवसायात जास्तीत जास्त लोकांनी यावे असं वाटत असेल तर त्या व्यवसायासाठी लोकांना उद्युक्त (motivate) करावं लागते आणि त्यासाठी सदर व्यवसायात उतरण्याचे फायदे, त्यासाठी मिळत असलेल्या सवलती, भरभराटीच्या संधी ह्या सगळ्या गोष्टींचे व्यवस्थित मार्केटिंग करावे लागते.

वरील संदर्भात जास्तीत जास्त तरुणांनी धर्मगुरू व्हावे म्हणून आपण काय करतो? काहीच नाही ! लोकांनी कुटुंब नियोजन केले म्हणून त्यांना नावे ठेवतो. आजची तरुण पिढी कशी आत्मकेंद्रित आणि पुंजीवादी होत चालली आहे याबद्दल बोटे मोडतो. वर्षातुन दोन वेळा (सेंट जॉन मारी वियानी ह्यांच्या सणाच्या दिवशी आणि शुभ-गुरुवारच्या दिवशी) अधिकृतपणे धर्मगुरूला उपसावे लागणारे कष्ट, हाल-अपेष्टा,

एकाकीपणा इत्यादीवर धर्मुगुरू स्वतः किंवा प्रापंचिकापैकी कुणीतरी जाहीरपणे चर्चच्या व्यासपीठावरून गाऱ्हाणे गातात. ह्या सगळयांचा एकत्रित परिणाम म्हणजे आधीच घटलेली धर्मुगुरूपदाच्या इच्छुकांची संख्या आणखीनच रोडावते. म्हणजे ज्या दिवसाचा उपयोग जास्तीत जास्त तरुणांना धर्मगुरू होण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी करावयास हवा त्या दिवशी आम्ही ह्या तरुणांना आणि त्यांच्या पालकांना हतोत्साहित आणि नाउमेद करतो.

धर्मगुरुपदाचं मार्केटिंग करायचं म्हणजे नक्की काय करायला पाहिजे? खोटी आश्वासनं द्यायची किंवा भूलथापा मारायची गरज नाही. परंतु असे काही मुद्दे लोकांसमोर ठेवता येतील जेणेकरून निदान धर्मगुरू व्हावे कि नाही अश्या 'हो-नाही'च्या कुंपणावर असलेल्या उमेदवाराचं मनोबल वाढेल. धर्मुगुरूच्या जीवनातील हाल-अपेष्टा ऐकून मागे पडत असलेलं पाउल पुढे पडेल. असे काय मुद्दे आहेत, अश्या काय गोष्टी आहेत ज्या सामान्य प्रापंचिकाच्या जीवनापेक्षा धर्मगुरूच्या जीवनात अधिक आकर्षक आहेत? वानगीदाखल खाली काही मुद्दे मांडत आहे:

1. **शिक्षण**: धर्मगुरू होणा-या उमेदवाराला वसतिगृहात राहून उत्कृष्ट दर्जाचे उच्चशिक्षण विनामूल्य मिळते. धर्मगुरू झाल्यानंतर देखील धर्मप्रांताच्या परवानगीने धर्मगुरू देशात-किंवा परदेशात जाऊन वर्ष-दोन वर्ष study leave घेवून पुढील शिक्षण घेवू शकतो. सामान्य माणसाला अशा प्रकारच्या शिक्षणासाठी खूप पैसा खर्चावा लागतो. कधी कधी पैशा अभावी उच्च शिक्षणाचा ध्यास सोडावा लागतो. कधी कधी उच्च शिक्षण पूर्ण होईस्तोवर लग्नाचं वय उलटून जातं आणि मग तेथे compromise करावं लागतं.
2. **नोकरी धंद्याची चिंता**: खूप मेहनत करून, चांगले गुण मिळवूनदेखील सामान्य माणसाला योग्य ती नोकरी किंवा व्यवसायाची संधी मिळेलच याची काही खात्री नसते. मिळालेली नोकरी टिकेल याची खात्री नसते. कामाच्या ठिकाणी विविध प्रकारचे ताण-तणाव आणि कार्यालयीन राजकारणाला तोंड द्यावे लागते. याउलट धर्मगुरुपदाच्या उमेदवाराला ही काळजी करावी लागत नाही. बी एड, एम एड करून शिक्षक किंवा प्राध्यापक झालेला सामान्य माणूस २०-२५ वर्षे नोकरी करूनही मुख्याध्यापक होवू शकत नाही. परंतु बी एड, एम एड झालेला धर्मगुरू दोन-चार वर्षाच्या अध्यापनाच्या अनुभवानंतर मुख्याध्यापक, प्राचार्य किंवा शिक्षणसंस्थेचा प्रमुख होवू शकतो.
3. **घर आणि लग्न**: नोकरीला लागलेल्या सामान्य माणसाला वयाच्या तिशीच्या आत स्वतःसाठी घराची तजवीज करावी लागते आणि लग्नासाठीदेखील चांगल्याच खर्चाची तयारी ठेवावी लागते. याउलट धर्मगुरूला (निदान मुंबई आणि वसई धर्मप्रांतात तरी) सगळया सुखसोयीयुक्त घर तयार मिळते.
4. **घरकाम**: काही सुखवस्तू अपवाद वगळता वसईतील बहुतेक नोकरदार वर्ग, नवरा-बायको दोघेही नोकरी सांभाळून, चारेक तासाचा प्रवास करून आपलं घरकाम देखील स्वतःच करतात कारण त्यांना नोकर ठेवणे परवडत नाही. परंतु आपल्या मुंबई आणि वसई धर्मप्रांतात क्वचितच असं एखाद पॅरिश असेल जिथे धर्मगुरूकडे हक्काचा मेस्ता नाही.
5. **कामाची वेळ** : धर्मग्रामातील एखादा प्रोजेक्ट किंवा विशेष धार्मिक कार्याव्यातिरिक्त वर्षभरातील इतर वेळी धर्मगुरूच्या कामाच्या वेळा दिवसभरात पाच तासाहून कमी असतात.

6. **प्रवास**: बहुतेक वसईकराना आपल्या नोकरी-धंद्याच्या ठिकाणी जाण्या-येण्यासाठी किमान चार तासाचा रेल्वेचा जीवघेणा प्रवास करावा लागतो. धर्मगुरुला आपल्या धर्मग्रामाच्या बाहेर पडण्याची फारशी गरज पडत नाही.
7. **वैयक्तिक वेळ**: धर्मगुरूला आपले वाचन, चिंतन, मनन, प्रार्थना किंवा इतर छंद जोपासण्यासाठी वेळ मिळतो आणि अश्या वेळेला त्यांना कुणी डिस्टर्ब करू नये ह्याची काळजी त्यांच्या निवासस्थानातील कर्मचारी घेतात. सामान्य माणसाला हे सुख, ही privacy मिळत नाही.
8. **सांसारिक समस्या**: मुलांची आणि पालकांची जबाबदारी, मुलांचे शिक्षण, त्यांचे करियर, सासू-सुनेमधे सलोखा राखणे, भाऊ-बंदकी अशा सांसारिक समस्या पासून धर्मगुरू मुक्त असतो.
9. **भविष्याची चिंता**: वयस्कर आणि आजारी धर्मगुरूची जबाबदारी धर्मप्रांत घेत असल्यामुळे धर्मगुरुंना आपल्या वृद्धापकालासाठी किंवा आजारासाठी आर्थिक तरतूद करावी लागत नाही.
10. **आदर** : धर्मगुरुला केवळ आपल्या धर्मगुरू असल्याने जितक्या लवकर स्वीकृती (acceptability) आणि आदर मिळतो तितका आदर सामान्य माणसाला जीवनभराच्या मेहनतीने देखील साध्य होत नाही. धर्मगुरूने घेतलेले निर्णय आणि केलेला निवाडा फारशी खळखळ न करता मान्य केले जातात. तेवढी स्वीकृती सामान्य माणूस कितीही निस्पृह असला तरी त्याच्या निर्णय / निवाड्याला मिळत नाही.
11. **नेतृत्व आणि वक्तृत्वाची संधी** : आपले नेतृत्व, वक्तृत्व, लिखाण, गायन इत्यादी सुधारण्यासाठी धर्मगुरूला अगणित संधी मिळतात ज्या सामान्य माणसाच्या भाग्याला येत नाहीत.

मला हे खचितच म्हणायचं नाही कि धर्मगुरूचे जीवन हे खूप सुलभ (cakewalk) असते. सांगायचा मुद्दा हा आहे कि धर्मगुरूच्या जीवनातील ह्या आणि अश्या इतर अनेक सकारात्मक बाबी तरुणाच्या समोर मांडून त्यांना धर्मगुरू होण्यासाठी प्रवृत्त करता येईल. सदोदित धर्मगुरूंच्या कष्टमय जीवनाचा पाढा वाचत राहिलो तर आपल्याला भविष्यात धर्मगुरूंच्या भीषण टंचाईला तोंड द्यावे लागेल. "धर्मगुरूपद हे काही एखादा साबण किंवा कोल्डड्रिंक नाही कि ज्याची जाहिरात आणि मार्केटिंग करावे लागेल. ज्यांना वरून पाचारण होते त्यांना कुठल्याची भौतिक प्रलोभनांची गरज नाही" अशी भूमिका घेवून चालणार नाही. कारण हा युक्तिवाद मग सामान्य भाविकासाठीही लागू करावा लागेल आणि ज्यांना देवाने (भाविक म्हणून) निवडले आहे त्यांना धर्मगुरूंची गरज भासणार नाही, ज्यांना ख्रिस्त आणि ख्रिस्ती धर्म माहित नाही त्यांच्यापार्यात सुवार्ता पोहोचवण्याची जबाबदारीही आपण परमेश्वरावर सोपवून आपापल्या कोषात दंग राहू शकतो.

**■ सॅबी परेरा, भाटी, नानभाट**

# बहर

अंगणातील आंब्याच्या छोट्या कलमाला मोहर आलाय.. बायकोने बातमी दिली. मी लगेच खातरजमा करून आलो. मला खूप आनंद झाला होता, त्याचबरोबर मनावरचा ताणही हलका झाल्यासारखं वाटत होतं. त्यामागे कारणही तसंच होतं.

५ वर्षापूर्वी क्लासला येणाऱ्या मुलांकडून वसूल केलेल्या दंडातून ती कलमं मुलांनीच आणली होती, आमच्या अंगणात मुलांच्या हस्ते ती लावण्यात आली. पैकी एक चांगलं रुजलं, मातीशी त्याचं नातं जडलं, मोठं झालं. पण दुसरं मात्र खुजं राहिलं. मागच्या  पाच वर्षात त्याला एकदाही पालवी फुटली नव्हती. केवळ हिरवेपणा टिकून होता. हेच त्याच्या जिवंतपणाचं तेवढं लक्षण.

त्याला पुरेसा सूर्यप्रकाश मिळावा म्हणून गेल्या वर्षी आजुबाजूंच्या झाडांची छाटणी करून सूर्यप्रकाश मिळण्याची व्यवस्था केली, त्याला नियमितपणे पाणी देत होतो. नवसाच्या पोराप्रमाणे त्याची देखभाल करत होतो. मुलंदेखील भेटल्यावर विचारायची, "सर, आम्ही लावलेली रोपं कशी आहेत?"

काल सर्व गोष्टींचं सार्थक झाल्यासारखं वाटत होतं. बायको म्हणाली, "मोहर आंब्याचा झाडाला आलाय की तुझ्या मनाला?"

"अगं, दोन लेकरांपैकी एक उच्चशिक्षित झाला आणि दूसरा अप्रगत राहिला तर आईवडिलांची जी घालमेल होते ती मी अनुभवत होतो. पण आता दुसरादेखील यशस्वी होताना पाहून मनास जो हरवलेला होता तो सापडल्याचा आनंद होत आहे" मी उत्तरलो.

सध्या निसर्गात बहरण्याचा कालावधी आहे. सृष्टीचा निर्माणकर्ता सृष्टीतून प्रकट होत आहे. असाच बहर प्रत्येक मनास यावा, घर अंगण मोहरून निघावं हीच प्रार्थना आणि ह्याच नाताळच्या शुभेच्छा..

**■ एमेल जोसेफ आल्मेडा, चौकाळा**

# "दुनिया मे कितना गम है"

बघावे तेव्हा भाजी, डाळ, नाहीतर काही हलके फुलके; मासळी का नाही बनवलीस? अरे कालच रविवार गेला ! दोन्ही वेळेस नव्हते का जेवायला मटन चिकन? आई तुला सांगून ठेवतो तुला जे काही खायचे आहे ते दुपारच्या जेवणात पण मी जेवायला असलो की काहीतरी चटपटीत बनलेच पाहिजे. अरे राजा आपल्या मोलकरणीने आपले दुपारचे राहिलेले जेवण नेलं आपल्या मुलांसाठी, त्यांना कसे चालत असेल हे सगळे?ते मला काही सांगू नकोस, मी काय त्या मोलकरणीचा मुलगा आहे का? आईच्या शरणागतीने तो विषय तिथेच संपला.

दुस-या दिवशी सकाळी उठलो तर काय, काळ्याकुट्ट ढगाने आकाश वेढलेले. पावसाच्या दाट सरी जमिनीला झोडपून काढत होत्या. सगळी जमीन दलदलीत रुपांतरित झालेली. मुलाचे बूट आणि कपडे घाण होवू नये म्हणून त्याला कारमधुन शाळेत सोडले.घरी येवून तयारी केली, कामावर जाईपर्यंत पावसाची खेळी संपलेली. पावसाळा म्हणजे संताप, कपडे ख़राब, प्रवासाची दगदग , सगळीकडे चिखल आणि घाण. संध्याकाळी कामावरून विरारला पोहचण्या अगोदर पाऊस स्वागतासाठी परत हजर. कसाबसा पार्किंगमध्ये पोहोचून रेनकोट अंगावर चढवला. वाटेत पावसाच्या नावाने उद्धाराचा जप सुरु होता. माझा हा जप कदाचित पर्जन्यराजाने ऐकला असावा,, अर्ध्या वाटेत असतानाच जोराचा वारा , सोबत विजेचा कडकडाट आणि ढगाचा गडगअडाट ह्या आपल्या सेनेसह पर्जन्यराजा माझ्या वाटेत दत्त म्हणून उभा; मला घरी पोहोचण्यापासून रोखण्यासाठी.

तात्पुरती माघार म्हणून रस्त्याच्या कडेला असलेल्या मजुराच्या वस्तीचा मी आधार घेतला. घराकडे जाण्याची ओढ़, पावसाने केलेला हल्ला, त्या गरीब कुटुंबाची त्या परिस्थितीतही विना तक्रार चाललेली दिनचर्या , ह्या त्रिकोणी व्यूहात सापडलेला मी सुन्न आणि दिढ़मूडपणे तिथेच उभा राहिलो.बैनरच्या आडोशाने तयार केलेली ती झोपडी , त्या बैनरचाच रेनकोट बनवून स्वयपाक बनवणारी ती मजूर बाई, फाटकी जुनी छत्री घेवुन झोपडीच्या बाहेर बसलेला तिचा पती व जुन्या लोखंडी पलंगात अंगावर प्लासटिकचा तुकडा घेऊन आरामात लोळत पडलेली त्यांची ती मुले, ते दृश्य जणू माझ्या बुबुळावर बिंबित झाले . एक क्षणात एकझोस्ट पंख्याच्या आधुनिक सुविधेत बनलेल्या किचनमध्ये स्वयपाक बनवणारी माझी आई माझी बायको मला दिसली. हॉलमध्ये बसून टी व्ही वर दिवसभराच्या घडामोडी पाहणारे वडील मला दिसले. उबदार ब्लैंकेटमध्ये पहुडलेले माझे लाडके लेकरु माझ्या डोळ्यापुढून तराळून गेले. दोन कुटुंबातील ही तफावत, दोन परिस्थिति मधली ही भिन्नता माझ्या मनाला बधिर करून गेली. पावसा, वा-याचे भान न ठेवता मी तशीच बाइक सुरु केली. त्या मुसळधार पावसाने मनावर बाकी राहिलेला सुखाचा, ऐश्वर्याचा मळ साफ़ धुवून काढला. तसाच भिजत मी घराच्या दिशेने निघालो होतो,,,,आणि दुरवर कुठेतरी रेडिओवर गाणे सुरु होते, " दुनिया में कितना गम है; मेरा गम कितना कम है।" !!!!!!!!!

**राकेश परेरा, आगाशी**

# आंटी आंटी डांसलो, डांसलो।

दोन-चार दिवसाअगोदर मी व माझा बांग्लादेशातला एक साथीदार कामानिमित्ताने बाहेर गेलो असता , दुपारचे जेवण घेण्यासाठी आम्ही एका बांगला होटेलात गेलो होतो.जेवण झाल्यावर मी त्याला वेटरला बील किती झाले म्हणून विचारण्यास सांगितले. तेव्हा त्याने त्या वेटरला बोलावत विचारले , " देशी , बिल कथो टका होलो? " ते ऐकून मी गडबडून गेलो व त्याला विचारले , "क्या कहा आपने भाईसाहब ? क्या कहके बुलाया आपने ऊस वेटरको ? " त्यावर तो बोलला ," देशी ! वो मेरे देश ( बांगलादेशी ) का है ना, इसलिए देशी। " त्याच्या भाईसाहेबने (म्हणजे मी ) कपाळाला हाथ मारला .मी त्याला कँपमध्ये सोडले व मी घराच्या दिशेने निघालो.मात्र त्याच्या ह्या बोलण्याने मला त्यावेळेस माझे हाॅस्टेलमधले दिवस आठवले.

माझ्या काॅलेजच्या हाॅस्टेलमध्ये माझा एक काश्मिरी मित्र होता . एके संध्याकाळी मैदानावर खेळल्यावर तो मला बोलला , "चल यार , पाणी नहाते है। " मी त्याला गोंधळून विचारले , " क्या ? क्या कहा आपणे ? " मला प्रथम वाटले होते की तो ' पाणी से नहाते है ' असं बोलला असेल. पण त्याने मला परत तेच उत्तर दिले , " चल, पाणी नहाते है। "

पाणी नहाते है काय किंवा पाणी से नहाते है काय , आपल्या सगळयांसाठी सगळं सारखंच ! त्याच्या या बोलण्याने मात्र माझं लक्ष जेव्हा त्याच्या गो-या शरीरावर गेले तेव्हा मला माझा " भूमरो " अधिक "श्यामरंग" झाल्याची जाणीव झाली. आम्ही बाबा काय, ग़रीब माणसं, पाण्यानेच नहानार ! तुझे बाबा काय, काश्मिरच्या खो-यांत पाच-सहाशे म्हशींचे खो-याने दूध काढणारे श्रीमंत,तुम्ही दुधानेच नहाणार ! असो.

मी टाॅवेल घेतला व बाथरूमच्या दिशेने कूच केली. तिथे उसळलेली तोबा गर्दी बघून मी "कूच केली" हा शब्दप्रयोग वापरण्यात काहीच "चूक" न केल्याची खात्री पटली.नशिबाने आम्हा ज्युनियरसाठी तीन वेगळया रांगा लागल्या होत्या.बाजूच्या रांगेत जमिनीवर एक टाॅवेल ठेवला होता व त्याच्या मागे एक आँध्र प्रदेश वाला ऊभा होता. त्याच्या काळया तुकतुकीत अंगावर पाहिल्यावर त्याच्या आजीने नक्कीच " काश्मीर की काळी " चित्रपटात सहकलाकार म्हणून काम मिळावे म्हणून अर्ज भरला असावा असे क्षणभर वाटले.

मी त्याला टाॅवेल असा जमिनीवर ठेवण्याचे प्रयोजन काय म्हणून विचारले , तर त्यावर तो घाबरून बोलला , " अययययो , मैं लुंगी , य टावला , मैं नही, यूपी भैया। " च्या मायला , किती हे लुंगी प्रेम ! घालायला पण तीच व पुसायला पण तीच ! परंतु काय पण बोला तुम्ही राव , महाराष्ट्राबाहेरचा विद्यार्थी महाराष्ट्रात येऊन महाराष्टातल्या विद्यार्थ्याला घाबरलेला पाहून मला जरा अप्रूप वाटले.

बहुधा त्याच्याविषयीचे माझ्या मनात निर्माण झालेले लुंगी प्रेम हे त्याचेच फलित असावे आणि तो यूपी वाला भैया ! साला , त्याचे कुटुंब नक्कीच नाला सोपा-याला स्थायिक झालेले असावे. लोकल ट्रेनला डाऊनला येऊन फडके टाकून आम्हा विरारवाल्यांची जागा अडविण्याची त्याच्या बापाची सवय मुलात जिवंत ऊतरली असावी.

थोड्यावेळानंतर, त्याचा नंबर आला. शक्यतो आमच्यासारखे प्रोफ़ेशनल बाथरूम सिंगर पाणी अंगावर पडल्यानंतर गाणी गुणगुणतात. पण हा पठ्ठ्या, नळाचा पाणी बहुधा बादलीत पडायच्या अगोदरच गुणगुणायला लागला होता," मनवा डोले मेरा , तनवा डोले , मेरे ..."! च्या मायला , ईतक्या सुंदर गाण्याची त्याने त्याच्या बोलीभाषेत चक्क पुंगी वाजवली होती . पण त्याला त्याचा काहीच फरक पडला नव्हता व पडणारही नव्हता .मी बाजूच्या सम्या कडे पाहिले. तो हसत होता.

सम्या म्हणजे समीर ! सोलापूर, सातारा, कोल्हापूर येथे राहणा-या तमाम सर्व मित्रांना , आम्ही त्यांच्या ख-या नावाने कधीच बोलावले नाही. सम्या , रम्या (रमेश ) , पक्या ( प्रकाश ) यांसारख्यांच्या वडिलांनी त्यांच्या

नामविधीकरणासाठी केलेल्या खर्चाची तरी त्यांच्या मित्रमंडळींनी कमीतकमी आठवण ठेवायला हवी होती असे मला तेव्हा राहून राहून वाटायचे . असो.आमच्या दोघांच्या आंघोळीचा नंबर जवळपास समान आला .
माझे बाथरूम मधील त्यावेळेचे एक गाणे नेहमीचे ठरलेले होते, " ए दादा आवर ये , एवढा मोठा लावलाय वाटा । " त्याचं काय आहे ना , अंगावर पाणी टाकताना माव-याची आठवण केल्याने त्या पाण्याने मावरी ताज़ी व्हायची. मग त्या ताज्या माव-यावर गाणी बोलल्यास गाणी ताज़ी व्हायची.गाणी ताजी झाल्यावर गाणारा मी ताजा व्हायचा व मी ताज़ा झाल्याने अंघोळ केल्याबद्दल समाधान लाभायचे.
मी अंगावर पाण्याचा पहिला तांब्या ओतणार की नाही तोच मला , " ओ साथ्या रे....!" अशी सम्याच्या केबिनमधून बोंब ऐकू आली.आयला , माझ्या माव-याचा काटा याच्या घशात अडकला की काय , अशी मला थोडावेळ भीती वाटली . बरं , शिडी टाकून काय झालंय हे बघायची पण सोय नव्हती. एक मिनीट सर्व शांत आणि पुढच्या मिनिटाला , " ओ साथ्या रे , तेरे बिना भी क्या जीन्या " असे सुस्वर सम्याच्या केबिनमधून ऐकू आले . मी शीडी शोधत होतो आणि याने चक्क अमितजींना जीना टाकायला सांगितलं होतं.
हे सर्व क़िस्से आठवत असताना घरी कधी पोहचलो कळलेच नाही. काही पण बोला पण मला त्या सर्वांचे त्यांच्या बोली भाषेवरचे प्रेम भावले होते . मी देखील माझ्या कादोडी भाषेवरचे माझे प्रेम व्यक्त करण्याच्या संधीच्या शोधात लागलो. सुदैवाने, त्याच रात्री मुलीला झोपवताना तीने एखादी परिकथा ऐकवण्यापेक्षा एखादं गाणं ऐकवून तिला झोपवण्याची फर्माईश व्यक्त केली .मी देखील आनंदाने तिला ," मुगले , मुगले नास लो , नास लो " बोलून दाखवू लागलो. तर लगेच तीचा प्रश्न , " डॅडा , या गाण्याचा अर्थ काय ? तुम्ही कुठल्या भाषेत बोलता? " तीच्या ह्या प्रश्नाने एका झटक्यात माझी हौस फिटली.
मनात असंख्य विचारांनी थैमान घातले.खरंच मी कादोडीच्या -हासाला जबाबदार आहे का ? कि हि माझी अगतिकता आहे, आलेल्या परिस्थितीला स्विकारण्याची? मी कादोडी वाचवू शकतो कि वाचवू शकलो असतो? मला त्या वेळेला भुईगावचे प्रसिद्ध कवी ईग्नेशियस डायस ह्यांच्या कवितेतील काही ओळी आठवल्या .
माझ्या आठवणींतील बाय चित्रामध्ये
तशीच फुनत असते तांदूळ
बाबा वळत असतो दोर हिंदाळ्यात बसून
शेणाने सारवलेला ओटाही जसाच्या तसा
जिवंत होतो मनात
ओट्यावरच्या कोपऱ्यात अडगळीच्या वस्तूंमध्ये
नांगर असतो मनात रुतून बसलेला
त्याचवेळी वाजते रेकॉर्ड दुरवर
शेतकरीss आमी शेतकरीsss
शेतांमध्ये तरारून आलेल्या असतात
बिल्डिंगामागून बिल्डिंगा भरघोस
गावातील एकमेव मैदानातील कलकलाट
हळूहळू होत चाललेला असतो म्यूट

- **सिमसन रॉड्रिग्ज, परसाव, नंदाखाल**

# आजच्या वसईची पाणी परिस्थिती

वसईच्या हरीत पट्ट्यातील पाणी व्यवस्थेविषयी बोलताना ‘विहीर’या स्त्रोतांस वगळून वसईतील जल व्यवस्थापनाविषयी आपण लिहूच शकत नाही. हरित पट्ट्यातील ८०% लोकसंख्या पिण्याचे व इतर वापरासाठी लागणाऱ्या पाण्याचा पुरवठा स्त्रोत म्हणून विहीरीवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे अवलंबून आहे. वसईतील विहीरीविषयी लिहिताना सर्वप्रथम वसईची भूगर्भाविषयी व भौगोलिक स्थितीविषयी माहिती असणे आवश्यक आहे.

**वसईतील भूगर्भाविषयी.....**



वसईत एका ठराविक अंतरानंतर भूगर्भातील मातीच्या थरात बदल दिसून येतो. उदा. काही ठिकाणी मुरुम माती, तर काही ठिकाणी रेती दिसून येते व त्याचा परिणाम त्या भागातील पाण्याच्या गुणवत्ता व उपलब्धता या घटकांवर होत आहे. उदा.खडकाळ भागात वर्षभर पाणी उपलब्ध असते व त्याची गुणवत्ता सुद्धा चांगली असते.

वसईच्या तीनही बाजूला समुद्र व एका बाजूस खडकाळ व खारट अशी मिश्र जमीन आहे. त्यामुळ े पश्चिमेकडील फक्त हरितपट्ट्यात पिण्यायोग्य पाणी उपलब्ध आहे. याशिवाय आपल्या विहीरीची खोली ही साधारणता २०-२५ फुटापेक्षा खोल नाही. कारण आपण जितके खोल जाऊ तितके पाण्यातील क्षारांचे प्रमाण(saळinity) वाढत जाते. त्यामुळ े अशा उथळ व मर्यादीत भुजल साठयाचा विचार करून भूतकाळ ात अशा काही पंरपरा लोकांनी अंगीकारल्या होत्या.

साधारण २० वर्षा अगोदर आपल्या प्रत्येक गावात ४-५ सार्वजनिक विहीरी असत आणि त्या संपूर्ण गावाची तहान भागवत.  सार्वजनिक किंवा गावाच्या विहीरीतील पाणी ‘पोहऱ्याद्वारे’काढला जात असे. रोज सकाळ ी व संध्याकाळ ी आपल्या गावांतील महिला व विशेषत: मुली पिण्याच्या पाण्यासाठी या सार्वजनिक विहीरीचा वापर करत असत. या सार्वजनिक विहीरीचा फायदा खूप मोठा होता. या विहीरीद्वारे पाण्याचा वापर करत असताना पोहऱ्याने पाणी काढला जात असे. यासाठी मानवी श्रमाचा वापर केला जात असे.त्यामुळे मानवी श्रमाच्या मर्यादा लक्षात घेता, पाण्याचा उपसा कमी होतो व

आपसूकच भुजलपातळी चांगल्याप्रकारे सांभाळली जाई. त्याकाळी आपल्याकडे पाण्यात क्षारता खूप कमी प्रमाणात होती. शिवाय सर्वांना मुबलक व पिण्यायोग्य असे पाणी वर्षभर मिळत असे.

या सर्व व्यवस्थेत समाज व विहीर यांचे एक घनिष्ट नाते दिसून येत असे. त्यांचा परिणाम म्हणजे विहीरीच्या आजूबाजूला स्वच्छता असे. विहीरीतील गाळ वर्ष-दोन वर्षने गावकरी काढत असत.

आज आपल्या समाजात एकत्र कुटुंबपद्धती लोप पावत असून, विभक्त कुटुंबपद्धतीची समाज रचना आली. आपले जलस्त्रोतही विभक्त झाले. आज 'माझे कुटुंब माझी विहीर'अशी प्रथा समाजात रूढ झाली. शिवाय आपल्या विहीरीतील 'पोहरा'ही नामशेष होत चालला आहे. आता आपण विहीरीतील 'पोहऱ्याची'जागा इलेक्ट्रोंनिक पंपाने घेतली आहे. त्यामुळे पाण्याचा उपसा हा अगदी कमी वेळात खूप मोठया प्रमाणात होत आहे. पोहऱ्याचा वापर करून आपण २-३ तासांत ५०-६० लीटर पाणी विहीरीतून काढत असू, आज २०-३० मिनिटांत आपली पाण्याची ५०० लीटर टाकी पंपाच्या साहाय्याने भरून वाहते. विहीरीवरील पंपाचे नाते जसे-जसे घनिष्ट होत गेले तसे-तसे ते विहीरीसाठी 'कर्दनकाळ' ठरू लागले. हयामुळे आपल्या विहीरी मार्च-एप्रिल महिन्यात कोरडया पडू लागल्या. पाण्याच्या गुणवत्तेचे प्रश्न निर्माण होत आहेत व विहीरी शेजारी अस्वच्छता वाढत चालली आहे.

अजून एक महत्त्वाची समस्या म्हणजे भुजलात वाढणारा रोगजंतूचा प्रसार. आज आपल्याकडे जागेची कमतरता भासत आहे. अश्या परिस्थितीत जागेचे योग्य नियोजन करणे खूप गरजेचं आहे. आपल्या शौचालयाची टाकी व विहीर यामध्ये कमीत-कमी ४०-५० फुट अंतर असावे. परंतु आता आज आपल्याकडे शौचालयातील अतिरिक्त पाणी हे उघडयावर कोणतीही प्रकिया न करता जमिनीत अथवा गटारात सोडले जाते. त्यामुळे ते अशुद्ध पाणी जमिनीत मूरून विहीरीत येत असते. शिवाय बावखालाचे झालेले कचराकुंडीत रुपांतर, त्यामध्ये असलेला धोकादायक कचरा (इंजेक्शन, घनकचरा) शिवाय सांडपाणी यामुळे पाण्यामध्ये रोगजंतू वाढून, पिण्याद्वारे होणाऱ्या आजाराचे प्रमाण भविष्यात वाढण्याची शक्यता आहे.

आज आपल्याकडे निरनिराळया गावात पाणी शुद्धीकरणाचे प्रकल्प चालू झाले आहेत. या पाण्याचा बाजारीकरणाचा परिणाम त्या प्रकल्पाच्या आजुबाजूला असलेल्या विहीरीवर व भुजलावर होत आहे. शिवाय आपण घरी वापरत असलेल्या वॉटर फिल्टर एक पाण्याचा उपसा करणारे एक यंत्र आहे. वॉटर फिल्टरमधून मिळणारे पाणी किती प्रमाणात पिण्यायोग्य असते याबाबतीत मी तरी सांशक आहे आणि खरंच सर्व ठिकाणी या फिल्टरची गरज आहे का? हे तपासून पाहणे गरजेचे आहे.

आज पाण्याच्या गुणवत्तेबाबतीत जाणवणारी महत्त्वाची समस्या म्हणजे पुर्नभरण क्षेत्र (Recharging Zone) झालेले बदल. नजीकच्या काळात बोअरवेलमधून मिळणाऱ्या पाण्यात (४० फुटांपेक्षा खोल) विहीरीद्वारे मिळणाऱ्या पाण्यापेक्षा क्षारांचे प्रमाण अधिक दिसून आले आहे. त्याचे मुख्य

कारण म्हणजे बोअरवेलला पाणी पुरविणाऱ्या भुजलधारक थरांत (Aquifer) मध्ये पाण्याचा पुरवठा कमी होत चालला आहे व ही समस्या आता विहीरीला पाणी पुरविणाऱ्या जलधारक थराबाबतीत जाणवू लागली आहे. त्याचे परिणाम म्हणजे मार्च ते मे महिन्यात विहीरी कोरडया पडणे, पाणी पिवळसर होणे व खारटपणा वाढणे यासारख्या समस्या निर्माण होत आहेत. एकूण परिस्थिती लक्षात घेता असे दिसून येते की, जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण कमी झाले आहे, त्याचप्रमाणे पाण्याचा उपसाही तेवढयाच वाढल्यामुळे भुजल पातळी खाली चालली आहे.

आज आपली वसई विकासांच्या खूप फास्ट ट्रेन किंवा एक्सप्रेसच्या वेगाने धावत आहे. वसई-विरार महानगरपालिका क्षेत्राचा संपूर्ण भारतात अशा पहिल्या पाच शहरात समावेश होतो की, ज्याचा विकास मागील पाच वर्षात खूप झपाटयाने झाला आहे. अशा वेळी मात्र आपल्या विहीरीला पाणी पुरविणारे, पुर्नभरण क्षेत्र (Recharging Zone), भुजलाचे साठवण व पुर्नभरण (Recharge) करणारे तलाव, बावखाले आंकुचन किंवा नष्ट पावत चाललेली आहेत. आपला वाढता विकास, वाढती लोकसंख्या व त्याची वाढती पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता, आपली समस्या आज आपल्या हाताबाहेर गेली आहे. परंतु आपण पिण्याच्या पाण्याची या समस्याची तीव्रता कमी करू शकतो. त्यासाठी प्रत्येक कुटुंबापासून महानगरपालिकेने आपल्या पातळीवर कामे करणे गरजेचे आहे. उदा.कुटुंबपातळीवर पाण्याचा वापर कमी करणे व पाण्याचा पुर्नरवापर करणे, गावपातळीवर बावखालांचे संवर्धन करणे व गावाची प्रवर्तन व पुर्नभरण करण्यास पोत्साहन देणे, महानगरपालिकेने तलाव सुशोभिकरण करण्यापेक्षा त्यांचे संवर्धन कसे करता येईल, याविषयी आताच विचार करणे गरजेचे आहे.

आपण पाण्याचा विनामूल्य व अमर्याद असा वापर करत आहोत. आजपर्यंत त्यासाठी निसर्गाने आपल्याकडून कोणत्याही प्रकारची फी किंवा कर घेतला नाही. परंतु आपण एक माणूस, सुशिक्षित नागरिक म्हणून कमीतकमी प्रमाणात पाण्याचा वापर करणे, छतावरील पाणी विहिरीत सोडणे व कमीत कमी कॉन्क्रीटचा वापर करून पाण्याला जमिनीत शिरकाव करण्यास वाव देऊन आपल्या स्वत:साठी व पुढील पिढीसाठी पाण्याची बचत योजना चालू करू शकतो.

**■ सचिन मर्ती, भुईगाव**

# येशू येतोय...

“आई, परवापासून आगमनकाळ सुरू झाला आहे, माझ्या पृथ्वीवरील आगमनाची जय्यत तयारी आता सुरू होईल, पण मला या वर्षी जायलाच हवे का?” येशू ख्रिस्त स्वर्गात शांतपणे बसलेला असताना मरिया मातेला म्हणाला.

“हा असं का बोलत असावा?” मरिया बाजूलाच बसलेल्या योसेफाकडे पाहत म्हणाली.

“बेटा, का रे, काय झाले?, तुझ्या मनात अचानक असा विचार का आला?” मरिया येशूकडे वळत बोलली.

“आई, मला खूप कंटाळा आला आहे, दरवर्षी मी जातो खरा पण परत आलो की माझी कशी अवस्था होते, तू बघितलेय ना?, मी पार्थिव रूपात पृथ्वीवर अवतरतो तो सगळ्यांसाठी, फक्त पंचतारांकित मॉल/हॉटेल्स, बंगले यांच्यात नाही तर ठिगळ लावलेल्या झोपडीतही आणि रस्त्यांवर संसार मांडलेल्यांसाठीही, मग मला असा श्रध्देचा बाजार मांडलेला का बघावा लागतोय, माझ्या तत्वांशी तडजोड करणं आता मला जड जातंय” येशू बोलला.

“नाही रे, बेटा, आपल्याला असे बोलून कसे चालेल, अशी मनाची शांती ढळू देऊ नकोस, मी नाही का जात माझ्या वाढदिवशी?, अरे, सगळ्यांची मध्यस्थी घेता घेता जीव फार मेटाकुटीला येतो, पण आहेत काही मोजकी नीतिमान माणसं, आपल्या त्यागमय जीवनातून स्फूर्ती घेऊन आजही दीनदुबळ्यांच्या सेवेसाठी अनेक हात पुढे आहेत, त्या लोकांसाठी आपल्याला गेलेच पाहिजे” मरियेने त्याची समजूत काढली. येशू मंद स्मित करत तेथून ऊठून निघून गेला. त्याला माहीत होते की आई कधीही त्याला चुकीची पायरी ओलांडू देणार नव्हती.

"अहो, ऐकलंत का?" इतका वेळ मूकपणे दोघांचे संभाषण ऐकत असलेल्या योसेफाला मरिया म्हणाली, "बघा ना, हा ख्रिस्त असे का करत असेल बरं, जगाचा तारणारा हा, असा उदीग्न का झालाय".

"अगं मरिये, तसे नसेल कदाचित, तुला माहीत आहे ना, देवबाप्पाच्या मनाविरुद्ध हा कधी काही करत नाही… वयाच्या बाराव्या वर्षी येरूशलेमच्या मंदिरात धर्मपंडितांबरोबर कसा वादविवादात गुंतला होता हा... आपलाही विसर पडला होता ह्याला त्यावेळी... आठवतेय ना, त्याच मंदिरात बाजार मांडणाऱ्याना कसं हुसकावून लावलं होतं ह्याने.. आपलं पोर कोणावर रागावल्याचा हा एकमेव क्षण असेल… आणि बघ नं, आजच्या नाताळच्या काळात दुर्दैवाने आपल्या ख्रिस्ताऐवजी सांताक्लॉज फार गाजतो, घरोघरी, दुकानं-मॉलमधून त्याचेच राज्य आहे, अगदी गोठ्याच्या देखाव्यातही ख्रिस्तापेक्षा सांताक्लॉजचा फोटो मोठा असतो.

ख्रिसमस कॅरोल्स, गोडधोड पदार्थ यांच्या भारावलेल्या वातावरणात लोक रोजच्या समस्या, व्याप, टेन्शन बाजूला ठेवून येशूच्या आगमनाची तयारी करायचे, पण त्याच भक्तीत आता बिझनेस शिरलाय आणि येशूचा जन्मदिन एक इवेंट बनलाय... नक्कीच काहीतरी खटकलं असेल.. त्याशिवाय असे बोलणार नाही तो"...

"आणि हो, काल देवबाप्पाबरोबर काहीतरी हितगुज चालू होतं त्याचं... आता पण जाताना कसं स्मित करत गेला बघ, मला तर खट्याळ हसू वाटलं ते"... योसेफ मरियेची समजूत काढत बोलला..

मरिया, योसेफ आणि ख्रिस्त... एक पवित्र कुटुंब... एक मंदिर... आध्यात्मिक व नैतिक मुल्याची जोपासना करणारं... अंहकारापेक्षा नम्रतेला महत्व देणारं... स्वत: दु:ख सोसुन इतरांना सुख देणारं.. आत्मसुखापेक्षा आत्मत्यागाला स्थान देणारं... परमेश्वराच्या इच्छेसाठी काय त्याग करतं ते कुटुंब... मरियेच्या डोळ्यासमोरून सारा जीवनपटच उलगडत होता...

जोकीम, हन्ना आणि त्यांची एकुलती एक मुलगी, मरिया, इस्त्रायलच्या येरूशलेम प्रांतातील नाझरेथ गावातील तिघांचे हे एक धार्मिक कुटुंब.. त्या दिवशी दुपारचे बारा वाजत आले होते. मरियेने आईला स्वयंपाकासाठी मदत केली, बाबा बाजारात गेले होते, त्यांना यायला वेळ लागणार होता. "मी खोलीत जावून प्रार्थना करते, बाबा आले की सांग म्हणजे आपण एकत्र जेवायला बसू" असे आई, हन्नाला सांगून ती आपल्या खोलीत आली, ती नेहमीप्रमाणे प्रार्थना करायला सुरुवात करणार... इतक्यात खोलीत खूप उजेड झाला आणि त्याचवेळी तिला आवाज आला, "हे कृपापुर्ण स्त्रिये, तुझे भले होवो, देव तुझ्याबरोबर आहे" ती घाबरली, तीने समोर बघितलं तर एक देवदूत तिच्या पुढे ऊभा होता. गॅब्रीयल देवदूताने तिला परमेश्वर पित्याचा संदेश दिला, प्रथमत: मरिया घाबरली, गॅब्रीयल काय म्हणाला याचे आकलन व्हायला तिला वेळ लागला, पण ही देवाची इच्छा आहे हे ध्यानात येताच ती म्हणाली "मी देवाची दासी आहे, तू सांगितल्याप्रमाणे होवो."

योसेफ, एकदम भोळा, प्रामाणिक, निस्वार्थी आणि पापभीरू माणूस, मंदिरात अनेकदा मरियेला त्याने पाहिलं होतं, तिच्या चेहऱ्यावरील सात्विक भाव, तिचा निरागसपणा याद्वारे तो अगदी भारावून जात असे, प्रीतीचे बंध मग आपसूकच जुळून आले आणि मरियेची योसेफबरोबर रीतसर सोयरीक झाली. तिने त्याला देवाच्या संदेशाविषयी बातमी सांगितली, तो काहीच बोलला नाही आणि मरियेने तर होकारही दिला होता, त्याने विचार केला, उगाच मरियेची बदनामी नको, मी तिच्याबरोबरची सोयरीक मोडतो. पण मग देवदूताने स्वप्नात येवून त्याला वस्तुस्थिती सांगितली, सहनशील आणि चिकाटी असलेल्या योसेफमध्ये कुठल्याही आव्हानाला सामोरे जाण्याची कुवत होती. देवाची आज्ञा प्रमाण मानून त्याने मरियेबरोबर लग्न केले.

मरियेचा नववा महिना सुरू झाला होता आणि त्यात कैसर राजाने जनगणना करण्याचा हुकूम सोडला होता.. योसेफ मरियेला घेवून त्याच्या मूळ गावी, बेथलेहेमला गेला. तिथे त्यांना अजिबात कुठेच जागा मिळाली नाही आणि इकडे मरियेला प्रसूतिवेदना सुरू झाल्या होत्या... पुष्कळ जणांपुढे याचना, विनवणी केली, पण त्यांना जागा काही मिळाली नाही. शेवटी गावकुसाबाहेर असलेल्या एका गायीच्या गोठ्यात

गव्हाणीत गवताच्या शेजवर तीने येशूला जन्म दिला... देवदुतांनी त्याच्या जन्माची बातमी मेंढपाळांना दिली, ते लगोलग बाळ येशूला भेटायला आले. त्याचप्रमाणे आकाशात एक नविन तेजोमय तारा प्रकट झाला, त्याचा माग काढीत पूर्वेकडील तीन राजे आले, तान्हया येशूला बघून गेले…

"आई, काय झाले, एवढा विचार कसला करतेस?" येशूने मरियेच्या बाजूला बसत तिला विचारले.. मरिया भानावर आली..

"काही नाही रे, पोरा, असेच, तू जायची तयारी कर आणि जास्त मनाला लावून घेवू नको काही"' मरिया येशूला म्हणाली...

येशू त्याच्या खोलीत आला, पलंगावर बसत तो विचार करायला लागला….

'मी परत पृथ्वीवर जन्मा जायचं कशासाठी, माझ्या मनासारखं काहीतरी सुरू आहे का तिकडे? ज्या बेथलेहेम गावात मी जन्माला आलो तिकडे आज काय भयानक परिस्थिती आहे, माझ्याच घरी मला कोण विचारीत नाहीय... कितीतरी लोकांना सामूहिक हत्याकांड आणि अणुबॉम्बमुळे माझ्यासारखं सुळावर चढवलंय.. न्यायालयाच्या अजब न्यायप्रक्रियेचा पहिला शिकार मी होतो आणि आजही माझ्यासारखे असंख्य निरपराध बळी जात आहेत. मला निवस्त्र करून माझ्या वस्त्रांची चिठ्ठ्या टाकून वाटणी केली, आज माझ्या अनेक आयबहीणींची वस्त्रे भर रस्त्यावर फेडली जात आहेत… तारीख पे तारीख करत खऱ्या न्यायाचा गळा आवळला जात आहे… मी देवपुत्र पण माणूस म्हणून जन्म घेतला… का, तर माणसाचे सुख-दु:ख काय आहे त्याचा अनुभव घेवून त्यांच्यातलाच एक होण्यासाठी.. आणि देवबाप्पाला पण सांगितले, माझी नाही तर तुझी इच्छा पूर्ण होवो.. आज माणूस माणुसकी विसरलाय... आईची अडगळ झालीय आणि बाप जिन्याखाली खाटेवर खोकून खोकून हाडाचा पिंजरा झालाय, आणि मुलाचे हॉलमध्ये मांस-मटण वाया जातेय. गाडी, बंगला, सगळया सुखसोयी, पैशाचा माज सोकावला आहे.'

'पण नाही, आई उगाच विचार करत बसेल, काना गावात तिच्या पाहुण्यांच्या लग्नसोहळयात द्राक्षारस संपला आणि आईने सांगितले म्हणून माझी वेळ आली नसतानाही मी तिला नाही बोललो नाही. ती माझी जन्मदात्री आहे, तिचे ऐकायलाच हवे, त्यात आई सांगतेय तसा लोकांच्या श्रद्धेचा प्रश्न आहे. मला जायलाच हवे...'

येशू मग जायच्या तयारीला लागला, एवढ्या लोकांची श्रद्धा सांभाळायची म्हणजे खायचं काम नाहीय, तो देवबाप्पाकडे गेला. "बाप्पा, मी पृथ्वीवर चाललोय, मी तुम्हाला काल त्याची कल्पना दिली होती ना.... माझी झोळी घेवून आलोय मी.." देवबाप्पा म्हणाला, "चल, तुला काय हवे ते घे, ये माझ्या बरोबर".

ती एक खुप मोठी खोली होती. त्यामध्ये वेगवेगळे कप्पे होते, पहिला कप्पा होता, आशीर्वाद. देव बोलला, "किती हवेत?, तसा यातून अविरत ओघ चालू आहे पण तू तूझा जन्मदिन साजरा करण्यासाठी

चालला आहेस ना, तुला किती पाहिजे तितके घे.” येशूने डोळे बंद केले, प्रार्थना बोलली, आणि त्यातले आशीर्वाद त्या झोळीत जमा झाले. पुढच्या कप्प्यात येशूने नजर टाकली तसे त्याला हसू आले, त्या कप्प्यात “संपत्ती”चा स्टॉक होता. देव बोलला, “का रे का हसतोएस?, मला माहीती आहे, तुला सगळाच्या सगळा स्टॉक घेवून जावं लागणार आहे”… ते दोघे पुढच्या कप्प्याजवळ आले, त्यात यश आणि मानसन्मान होते, येशू बोलला, “हा पण जितका नेवू तितका कमीच... ज्याच्याकडे आहे त्याला अजून हवा आहे.”

आणखी पुढच्या कप्प्याजवळ आले ते दोघं, अन दोघाच्याही चेहऱ्यावरचं हसू गेलं, तो कप्पा होता “सद्सद्विवेकबुद्धी”चा, त्या कप्प्यात खूप धूळ, कोळयांची जाळं-जळमटं जमली होती, खुप दिवस त्याच्या बाजूला कोणी आलं असेल असे वाटत नव्हते... देव बोलला, “यातलं काही नेऊ नकोस, उगाच तुला वजन होईल, जसाच्या तसा तू परत घेऊन येणार आहेस हा, तिकडे कोण हे मागणार नाही, इतके दिवस बघ मलाही इथे यावं लागलं नाहीय.” पण येशू बोलला, “नको बाप्पा, थोडा स्टॉक नेतो, एखाददूसरा जरी भेटला तरी बस”...

देव येशूला पुढे घेऊन जाताना बोलला “हे सगळं जेव्हा लोक मागतील तेव्हा तुला द्यावं लागणार आहे, पण पुढच्या कप्प्यातील काही वस्तूसुद्धा घेऊन जा आणि खाली वाटून टाक”. तिकडून मग येशूने प्रार्थना, शांती, सत्कृत्य, परोपकार, त्याग, श्रद्धा, प्रेम, सत्य, सेवा, अहिंसा, संस्कार, पावित्र्य, लाज, पश्चाताप हे सगळं त्याच्या झोळीत घेतलं. तो देवाला बोलला, गेल्या वर्षी मी पृथ्वीवर जात असताना मला रस्त्यामध्ये सैतान भेटला होता, तो मला म्हणाला होता की तू कितीही चांगलं घेऊन जा, मी अगोदरच काम, क्रोध, लोभ, मद, मोह आणि मत्सर ह्या षड्रिपुंना माणसाच्या मनात सोडलंय. त्याचबरोबर संशय, संघर्ष, क्रूरपणा, तिरस्कार हे ही आहेतच. “पण बाप्पा, काही चिंता नको, जगात सगळयांपर्यंत तो काही पोहोचू शकत नाही, माझा देवबाप्पाच आहे जो सगळया ठिकाणी आहे, आणि जिकडे बाप आहे तिकडे मुलाने घाबरायचं कशाला?... मला पृथ्वीवर जायला खूप कंटाळा आला होता पण आई-बाबा आणि बाप्पा, तुमचे आशीर्वाद बरोबर असताना माझे काम मी चोख करणार असा मला ठाम विश्वास आहे.

येशू ख्रिस्ताने झोळी उचलली आणि तो पृथ्वीवर यायला निघाला आणि त्याने पाहिले, घरांघरावर चांदण्याच्या आकाराचे आकाशकंदील लागले होते, अंगणात, घराच्या हॉलमध्ये बायबलच्या गोष्टींचे, पर्यावरणाचे संदेश देणारे गोठयांचे देखावे मांडले होते, बाजूला सुंदर खिसमस ट्री सजलेले होते, चर्चमध्ये नाताळनिमित्ते अनेक धार्मिक कार्यक्रम आयोजिले होते, लोक उत्साहाने फिरत होते....

■ ख्रिस्तोफर मॅथ्यू रिबेलो

**कविता / चारोळया :-**

## शोध

कुणी म्हणतात तुझा वास
फुलांच्या कोषात असावा
कुणी म्हणतात तू गंधात रमत आहेस
पंचपक्वान्ने, धूप, गंध, नैवेदय
यांचा यथेच्छ आस्वाद घेत आहेस .
ताळ मृदंगात धुंद असावास
पण छे !
येवढे मोठे वैभव तू उपभोगत असशील
असे पटत नाही
मला वाटतं

- तू असावा मजूरांच्या हातांतून श्रम करीत.
- महारोग्यांच्या जखमांत वेदना भोगीत.

पतितांच्या अश्रूंत वेणा देत

- उपेक्षितांचे प्रहार पाठीवर झेलीत

पण याही पेक्षा मला नक्की वाटतं

- तू बसला असावास

भुकेलेल्यांच्या पोटात
उपाशी होऊन ! तडफडत ......

## वाकलेलं आभाळ

वाटतं
हे वाकलेलं आभाळ
एक तर , मोडून पडायला हवं,
नाही तर ,
ताठ मानेनं उभं तरी रहायला हवं
केवळ पाय टेकायला टीचभर,
भूमी दिली म्हणून ,
वर्षानुवर्षे लाचारपणे क्षितिजाला
लववून मुजरा करायचा ? ..... काय म्हणून !
आभाळाला आता जाण हवी
आपलं जग
क्षितिजाच्या मर्यादितपणापेक्षा ,
कितीतरी पट अमर्यादित आहे.
क्षितिजाचे चरण धरायचे ही वेडी आभाळमाया !
पण जळलेल्या मोहराला
आलेला हा विचाराचा पाड
कधी काळी बाज धरणार आहे का ?

**■ सी. बी. दोडती, निर्मळ**

# काटे

कसं जगायचं हो ?
कसं हसायचं कुणी ?
इथे फुलांपेक्षाही
काटेच अधिक प्रामाणिक आहेत.

फुले कोमेजतात संध्याकाळीच
करपून सुकून जाताना
बदलतात रंग-रूप नि गंधही

काटे हे बोचरे जरी
नाही फसवीत कुणा कधी
उगवतानाची बोच आपुली
राखिती कायम जातानाही सुकुनी
अन सुकल्यानंतरही

हिरवे असता झाडांवरुनी हातांना
अन सुकल्यावर धुळीत पडुनी पायांना
आयुष्यभर बोचत राहती
इतके प्रामाणिक !

अहो सांगा हो… सांगा कुणी …
कसं जगायचं हो ?
कसं हसायचं कुणी ?
काटे प्रामाणिकपणाचे अन
प्रामाणिकपणा काट्यांचा
असा बोचत असताना?

---- कु. सबिना फोस, गास

## “पुन्हा रक्त वाहायला लागलं...”

घाव कुऱ्हाडीचा
बसला त्याच्या जिव्हारी
एक अवयव वेगळा झाला
झटक्यात
भळाभळा रक्त वाहू लागलं...
तो उभा होता
कसलाही आवाज न करता
शांत.. निश्चल... स्तब्ध..

मधला काळ
यानंतर शांततेत..
रंगी - बेरंगी अजस्र झाडे
वाढली मोकळ्या जागेत ...
गुदमरला मोकळा श्वास..
म्हणूनच सुरु झालाय
शोध
जागेचा पुन्हा एकदा
विकासाच्या नावाखाली...

मग
अचानक आले वादळ
रानच सारे हादरले
सपासप वार होत होते
असह्यपणे..
पाहत होता तो
इतरांना मोडताना..
पाहत होता
ज्यांना विसावा दिला होता
ज्यांना अंगाखांद्यावर खेळवल होत
अशांनी सर्वत्र चालवलेली
अमानुष कत्तल
अचानक एक घाव
त्याच्यावरही झाला..
कळण्याआधीच
एकापाठोपाठ एक सारेच
कापले गेले अवयव
आणि
पुन्हा रक्त वाहायला लागलं
सतत... अविरत...

## प्रवास एकांताचा..

असं का व्हावं..
कुणी उत्तर देईल..
कुणी सांगेल का की
असं का होतं...

कळत – नकळत कुणीतरी
आयुष्यात आपल्या येतं
संवेदना बनून सर्वांगात जागतं
कुठेही.. कसेही.. असू आपण
आपल्या सोबत असतं

हळू हळू तयार करतो
आपण आपलं वेगळं विश्व
नि अलगेच जातो गुंतत

नियतीला हेच मान्य नसावं
बहुधा
म्हणूनच तर
नियती खेळते असा काही डाव
की कळू यायच्या आधीच
विस्कटल जातं सारं
क्षणार्धात...
नि सुरु होतो प्रवास
पुन्हा एकदा

एकांताचा... एकटेपणाचा...

## संहार..

संहार..
माणसांचा,
मानवी मुल्यांचा,
मालमत्तेचा,
निराधार झोपड्यांचा,
तहानलेल्या प्राणीमात्रांचा,
तुझा तर झालाच आहे
गुप्तकरार
मृत्यूशी
दलालांच्या संगनमताने
उघडपणे…

सुकून गेलीत उभी मने
जमिनीसारखी
भरतील कशा भेगा
सर्वांगाला झालेल्या
तसलं क्रिम, पावडर
बाजारात कुठेच विकत नाहीत

झालीय सवय
हवा बंद जागेत
स्थिरस्थावर होण्याची
तुझं, अडवलं गेल्यापासून
गायब झालंय स्वच्छंदी फिरणं
अडगळीतल्या म्हाताऱ्यासारखं…

सूर्य डोक्यावर घेऊन
भ्रमंती
जळत्या पायांनी
शोधासाठी तुझ्या
कुठवर यावं..?
कुठल्या दिशेने..?
किती दिवस..?

आश्वासक मनाने
नजर उंचावतात
पण तोही स्वच्छ, नितळ
कोरडाच…
कदाचित
त्याचीही झाली असावी
हातमिळवणी
अनौपचारिकपणे
तुझ्या दलालांशी..

**---- एडवर्ड डिसोजा, वाघोली**

# मरिये....

योसेफाबरोबर तुझं वाग्दान झालेलं
तू इतरांसारखी भावी आयुष्याची स्वप्नं रंगवत होतीस
परंतु दुताचा तुला निरोप आला आणि तुझ्या स्वप्नांना बदलायला लागलं
तू घाबरली असशील, भेदरली असशील,
पण एक अभूतपूर्व धाडसी निर्णय तू घेतला,
आणि देवाच्या शब्दास होकार दिला
बाळंतपणासाठी तुला सर्वांनी जागा नाकारली
तुला गोठयात आसरा घ्यावा लागला
किती राग आला असेल तुला देवाचा आणि स्वत:चा त्यावेळी !
परंतु गव्हाणीत जेव्हा ते दिव्य बाळ जन्मास आले,
तेव्हा तुझ्या हृदयातून आनंदाचे झरे वाहू लागले
राजे-महाराजे त्याच्यापुढे नतमस्तक होताना पाहून तुला कौतुक वाटले असेल
काना गावी केलेल्या चमत्काराने तुझा उर अभिमानाने भरला असेल
आपला “लेक” प्रस्थापितांविरुद्ध उघडपणे बंड पुकारतो हे पाहून
तुझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली होती का?
तो क्रूसावर मरणयातना भोगत असताना
तूही तीळ तीळ तुटत होतीस..
त्याचं कलेवर कुशीत घेऊन हमसाहमशी रडत होतीस
त्याच्या ‘उठण्याने’ मानव जात तारली
तू देखील ख्रिस्ताच्या आईऐवजी विश्वाची माता बनून उरली
मरिये, आज ख्रिस्ताची गरज आहेच
पण त्याहून जास्त मरियेची गरज आहे
हे देवमाते परत एकदा आम्हासाठी ख्रिस्त प्रसव, आमेन..

**■ एमेल जोसेफ आल्मेडा, चौकाळा**

## "हे देवा त्यांना माफ़ कर"

हे देवा त्यांना माफ़ कर कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही
हृदयाहृदयात चराचरात राहणारा देव
दगड धोंड्यात, लाकूड फाट्यात कधी सापडत नाही हे त्यांना का उमजत नाही.
दोन हजार वर्षापूर्वी तू पुनरुत्थित झालास
पण आजही आम्ही तुला क्रुसावर टांगलय.
आपल्या बापाच्या देवळातला बाजार तू उधळलास,
पण तुझ्याच देवळात आज बाजार आम्ही मांडलाय.
चाळीस दिवसांचा वनवास पत्करला होतास तू
अनेक वर्षाच्या आमच्या त्यागाचा आम्ही उतरवलाय जू
भक्तीला कृतीची जोड़ असावी हा शिकवितो आम्ही धर्म
कशिनी मधल्या नोटापुढे हलके ठरलंय आमच कर्म
पेन्टेकोस्टच्या पवित्र आत्म्याने आम्हाला तू तारलंय
सार्वकालिक जीवनाची कुणाला काय चिंता
भौतिक सुखाने आम्हाला भारलंय
कधी तरी मरायच आहे ह्यानेच आमच मन दुखलंय
शंभर वर्षाचे कमी आयुष्य दिलेस हेच खर तुझे चुकलंय
ढगावर आरुढ़ होवून देवा स्वर्गात तू का गेलास ?
माझ्या देवा माझ्या देवा तू माझा त्याग का केलास?

- **राकेश परेरा, आगाशी**

# प्रेम एक वाळवंट, तू एक मृगजळ

काही वर्ष्या पूर्वी चुकूनच एका प्रेमरूपी वाळवंटात प्रवेश केला..
जाणता न जाणता फार लांब हा प्रवास केला..
लागली होती तहान तिच्या प्रेमाची इतकी..
तिला मिळवण्यासाठी जीवाचा आटापिटा केला..
पण तिचे प्रेम फक्त एक मृगजळ निघाले..
लांबून फार जवळ दिसत असले तरी दुरून मात्र अशक्य भासले..
तरी जीवनाची एकच इच्छा समजून स्वताला समजावले..
ती नाही तर जीवन नाही असे क्षणभरासाठी वाटले..
तरी पण मी चालत राहिलो, प्रेमाला जिंकण्यासाठी झटत राहिलो..
दिवस गेले, रात्र गेली, महिने गेले, वर्षे गेली..
पण तिचे प्रेम मणजे एक दुरून दिसणारे मृगजळच निघाले..
जितके जवळ जावे, तितके ते लांब जावू लागले..
पण ती प्रेमाची तहान वाढचच गेली..
काही वेळी तर स्वताचे जीवन पण निअर्थक वाटले..
काही वेळी मनाला समजावले.. काही गोष्टी मिळण्यासाठी नसतात..
तर काही वेळी मनाने समजाविले.. तिच्याशिवाय सुद्धा की जीवन आहे काय?
आज इतकी वर्षे झाली.. मनाचा गोंधळ शेवटी तोच आहे..
तिच्या येण्याची वाट पाहताना डोळ्यातील अश्रू सुद्धा कोरडे झाले..
तिला हाक मारताना तोंडातील शब्द सुद्धा मुके झाले..
चालता चालता पाय सुद्धा सुन्न झाले..
हुर्द्यातील भावना अंत पाहू लागल्या..
पण तिच्यावरचे प्रेम हे वाढचच गेले..
आता तिला मिळवायचे प्रयन्त कमी झाले..
कारण प्रेम सर्वांना मिळत नाही हे तर आता नक्की झाले..

■ जॉन्सन लोपीस,

# “Virtual World”

हे प्रभू ख्रिस्ता,
तुला माझी ‘Friend Request’ मिळाली का रे ?
कारण त्याशिवाय आम्हाला पर्याय नाहीय
Facebook, Twitter, Whatsapp पलीकडचे जग
आम्हाला माहीतच नाहीय
“You Tube” व्हिडिओशिवाय दूसरा “”Source” च
नाहीय
रात्रीच्या रात्री त्यात व्यतीत करतोय
अजूनही “Online” आहे, हे गर्वाने सांगतोय

तुझे डोंगरावरील प्रवचन ऐकायला वेळ नाहीय
तुझ्या मागे यायलाही फुरसत नाहीय
आणि तुला आराधिताना आम्ही पेंगुळतोय

तू असे का नाही करत
Facebook, Twitter, Whatsapp आणि इतर
Social Networking जॉइन कर,
आम्ही तुला तेथेच भेटतो
बसल्या जागी आम्ही तुला “Follow” करतो
आणि वेळच्या वेळी “Status Update” करतो

तुझे राज्य या जगाचे नाही
आणि आम्हीही या जगाचे नाही
तू स्वर्गी चढलास अन
आम्ही “Virtual World” जगतोय.

# शून्य

जग निर्माण झाले शून्यातून
जन्म आपला त्या शून्यातूनच
भक्तीच्या बाजारात भगवंत शून्य
संपत्तीच्या प्रवाहात माणुसकी शून्य
नात्यांच्या गोतावळ्यात आप्तस्वकीय शून्य
आठवणींच्या भंडारात प्रेम शून्य
भरकटलेल्या आयुष्याची किंमत शून्य
अपयशाच्या गर्तेत आपुलकी शून्य
अपूर्णतेची जाणिव नेते शून्याकडे
प्रश्नचिन्हातही सापडते शून्य
असेच आहे माणसाचं जीवन, शून्यातून यायचं
आणि शून्यातूनच अनंतात विलीन व्हायचं

1) उमरसे बडा हो रहा था, पर मासूमियत छोटी होती गयी
दिमागसे बडा हो रहा था, पर दिल्लगी छोटी होती गयी
शोहरत से बडा होता गया, पर इन्सानियत छोटी होती गयी
ईन्सान मै छोटा होता गया और हवस बडी होती गयी...

2) संसार म्हणजे जणू क्रिकेटचा सामना असतो
स्ट्राईक सतत रोटेट करत राहायचा असतो
विकेटच्या भीतीने डाव कधी आवरायचा नसतो
फ़ॉलो ऑन नंतरही 'सेकंड इनिंग'चा चान्स असतो...

3) मजहब का यहाँ कोई मतलब नहीं होता
इन्सान का यहाँ कोई बटवारा नहीं होता
चंद गद्दारोने इसको इस कदर इसे ऐसा तोड़ा है
यही फिर हमने खूनकी किमत गिनना छोड़ा है...

4) पिलात म्हणाला कैसराला आपण मित्र
‘इलेक्शन’च्या जत्रेत धर्माचा 'गेम' खेळू
पिलाताच्या फॉर्मवर शिक्कामोर्तब झाले
कैसराने ख्रिस्ताला अडगळीत टाकले...


5) शब्दांशी माझ कधी पटलंच नाही
ओठांवर असताना ते आगावु उगवायचे
बोटांतुन कागदावर उतरताना माझेच असायचे
मी गप्प असलो की डोळ्यांतुन बोलायचे..

**--- सुनिल सोकाळकर**

## कलाकुसर :-

**ऑस्टिन डाबरे**









Austien Dabre 91

## समीर पावसकर










स्टीव्हन आल्मेडा









राजेश
शिंदे









## रॉजर रॉड्रिग्ज


Vasaivaibhav / Vasaiheritage


Vasaivaibhav / Vasaiheritage


www.vasaivaibhav.com


www.vasaivaibhav.com


Vasaivaibhav / Vasaiheritage


www.vasaivaibhav.com


www.vasaivaibhav.com